**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – १९**

**सभावृत्तांत**

दिनांक – २०.७.२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जुलै - २०१८ ची मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२०.७.२०१८ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे महापौर

२) मा.शैलजा अविनाश मोरे उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.साधना अंकुश मळेकर

६) मा.अश्विनी संतोष जाधव

७) मा.सारीका शिवाजी सस्ते

८) मा.राहुल गुलाब जाधव

९) मा.वसंत प्रभाकर बोराटे

१०) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

११) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१२) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१३) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१४) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१५) मा.गायकवाड निर्मला मनोज

१६) मा.सागर बाळासाहेब गवळी

१७) मा.गोफणे अनुराधा देविदास

१८) मा.बारसे प्रियांका प्रविण

१९) मा.अजित दामोदर गव्हाणे

२०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२१) मा.लांडगे सारिका संतोष

२२) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२४) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२५) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२६) मा.फुगे भिमाबाई पोपट

२७) मा. अॅड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२८) मा.सावळे सिमा रविंद्र

२९) मा.लोंढे नम्रता योगेश

३०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३१) मा.लांडे विक्रांत विलास

३२) मा.गीता सुशिल मंचरकर

३३) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३४) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३५) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३६) मा.अनुराधा गणपत गोरखे

३७) मा.केशव हनुमंत घोळवे

३८) मा.मंगला अशोक कदम

३९) मा.तुषार रघुनाथ हिंगे

४०) मा.अश्विनी भिमा बोबडे

४१) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४२) मा.संजय बबन नेवाळे

४३) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४४) मा.भालेकर प्रविण महादेव

४५) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४६) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४७) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४८) मा.घोलप कमल अनिल

४९) मा.उत्तम प्रकाश केंदळे

५०) मा.पवळे सुमनताई मधुकर

५१) मा.चिखले सचिन तुकाराम

५२) मा.जावेद रमजान शेख

५३) मा.यादव मीनल विशाल

५४) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५५) मा.राजू मिसाळ

५६) मा.बाबर शर्मिला राजू

५७) मा.अमित राजेंद्र गावडे

५८) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५९) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

६०) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६१) मा.ढाके नामदेव जनार्दन

६२) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६३) मा.करुणा शेखर चिंचवडे

६४) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६५) मा.भोईर सुरेश शिवाजी

६६) मा.अपर्णा निलेश डोके

६७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६९) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

७०) मा.जयश्री वसंत गावडे

७१) मा.कोमल दिपक मेवानी

७२) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७३) मा.सुलक्षणा राजू धर

७४) मा.शाम गणपतराव लांडे

७५) मा.सुजाता सुनिल पालांडे

७६) मा.योगेश मंगलसेन बहल

७७) मा.कदम निकीता अर्जुन

७८) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७९) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८०) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

८१) मा.नढे विनोद जयवंत

८२) मा.पाडाळे निता विलास

८३) मा.काळे उषा दिलीप

८४) मा.कोकणे संतोष अंकुश

८५) मा.पवार मनिषा प्रमोद

८६) मा.अभिषेक गोविंद बारणे

८७) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८८) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८९) मा.बारणे माया संतोष

९०) मा.निलेश हिरामण बारणे

९१) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९२) मा.दर्शले रेखा राजेश

९३) मा.कलाटे राहुल तानाजी

९४) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९५) मा.ममता विनायक गायकवाड

९६) मा.कामठे तुषार गजानन

९७) मा.चोंधे आरती सुरेश

९८) मा.कस्पटे संदिप अरुण

९९) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

१००) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१०१) मा.सुनिता हेमंत तापकीर

१०२) मा.कुटे निर्मला संजय

१०३) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०४) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०५) मा.कदम शशिकांत गणपत

१०६) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०७) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०८) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०९) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११०) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१११) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११२) मा.नवनाथ दत्तू जगताप

११३) मा.संतोष बबन कांबळे

११४) मा.सोनवणे शारदा हिरेन

११५) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११६) मा. वाबळे संजय मल्हारराव

११७) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

११८) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११९) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२०) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.प्रविण आष्टीकर-प्र.अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे-प्र.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.डॉ.अनिल रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.पठाण-सहशहर अभियंता, , मा.झगडे, मा.खोत, मा.दुरगुडे, मा.राऊत -सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे, मा.कुलकर्णी, मा.कांबळे, मा.गट्टूवार, मा.भोसले, मा.घुबे, मा.पवार, मा.सुपेकर-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.दांगट-प्रशासन अधिकारी व मा.माने-पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर-** मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक, सन्मा. नगरसेविका, सर्व अधिकारी वर्ग, पत्रकार बंधू, नागरीक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.विलास मडिगेरी** – मा. महापौर, उत्तराखंडमध्ये बस दरीत कोसळून झालेल्या अपघातामध्ये ४७ प्रवाशांचे निधन, आंबेजोगाईमधील २ वारकरी महिलांचे मोशी येथे झालेल्या अपघातामध्ये निधन, मुंबई-पुणे महामार्गावर कार्ला फाटा येथे झालेल्या अपघातामध्ये चिंचवडच्या ९ प्रवाशांचे निधन तसेच दादा जे.पी.वासवानी-साधु वासवानी मिशनचे प्रमुख आध्यात्मिक गुरु, रिटा भादुरी-ज्येष्ठ अभिनेत्री, संकेत उल्हास भोईर, सिताराम मारुती भोईर, ठुबे दिपक भालचंद्र-म.न.पा.चे तत्कालीन कार्यकारी अभियंता, भाऊसाहेब वाघेरे, पुंडलिक वाघेरे, कौसल्या जाधव, श्रीरंग काटे-दापोडी, महादेव लांडगे-सामजिक कार्यकर्ते, नानाभाऊ ताम्हाणे, ठकूबाई हरिश्चंद्र ढोरे, विजयमाला लक्ष्मण पार्टे-श्री संभाजी पार्टे, मुख्य लिपिक, मनपा यांच्या मातोश्री यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

आध्यात्मिक गुरु दादा जे.पी. वासवानी यांचे बाबतीत बोलायचे म्हटले तर त्यांचा जन्म १९१८ साली झाला. ते ९९ वर्षाचे होते. खर म्हणजे ते चालते फिरते संत होते. सच्चाईच्या रस्त्यावर चालण्याचा त्यांनी कायम संदेश दिला. त्यांच्यामुळे २५ नोंव्हेबर जगामध्ये शाकाहारी दिवस म्हणून साजरा केला जात होता. त्यांनी सर्व प्राणीमात्रांवर कायम प्रेम करा असा ते संदेश कायम देत राहिले. दादा नेहमी पक्षांना रोज दाना टाकून खायची सोय स्वत: करीत होते. प्रत्येकांने मानवतेची सेवा करा हा संदेश कायमस्वरुपी देत राहिले. कोणाशी ही प्रेम आदर भावनेने वागा हाही संदेश कायमस्वरुपी देत राहिले. त्यांनी जीवनामध्ये १०० पेक्षा जास्त विविध प्रकारची पुस्तके लिहीले. कायम मुलगी शिकली पाहिजे हा संदेश त्यांचा असायचा. मुलगी शिकली तर त्यांच संपुर्ण कुटूंब घर, परिवार सुशिक्षित होऊ शकते अशा प्रकारचा संदेश त्यांचा असायचा. त्यांनी सर्वांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी खूप मोठयामोठया प्रमाणामध्ये ब-याच ठिकाणी शाळा सुरु करायचा प्रयत्न त्यांनी केला. वासवानी मिशनचे अनेक सेंटर्स जगामध्ये उघडले. त्यामध्ये अनेक राष्ट्रामध्ये त्यांच्या मिशनचे सेंटर्स आहेत. त्यामुळे अमेरिकेसारख्या राष्ट्रामध्ये सुध्दा त्यांच्या सेंटरचे काम चालते. अशा प्रकारचे थोर संत आध्यात्मिक जे.पी. वासवानी यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाल. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करणेत यावी. ही श्रध्दांजली वाहिल्यानंतर १५ मिनिटांसाठी ही सभा तहकूब करणेत यावी अशा सूचना मी मांडतो.

**मा. बाबासाहेब त्रिभुवन -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा. महापौर -** सर्वांनी श्रध्दांजली वाहण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.
(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर-** आजची सभा शुक्रवार दि.२०/७/२०१८ रोजी दुपारी २.३० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

-----

**(**नितीन (आप्पा) प्रताप काळजे**)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – १९**

**सभावृत्तांत**

**(दि.२०/७/२०१८ ( दु.२.०० वा.) ची तहकूब सभा)**

**दिनांक – २०.७.२०१८** **वेळ – दुपारी २.३० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दिनांक २०.७.२०१८ रोजी दुपारी २.०० वाजताची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक २०.७.२०१८ रोजी दुपारी २.३० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | महापौर |
| २) | मा.शैलजा अविनाश मोरे | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ५) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ६) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ७) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ८) | मा.राहुल गुलाब जाधव | |
| ९) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| १०) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |
| ११) | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | |
| १२) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |
| १३) | मा.उंडे लक्ष्मण धोंडू | |

१४) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१५) मा.गायकवाड निर्मला मनोज

१६) मा.सागर बाळासाहेब गवळी

१७) मा.गोफणे अनुराधा देविदास

१८) मा.बारसे प्रियांका प्रविण

१९) मा.अजित दामोदर गव्हाणे

२०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२१) मा.लांडगे सारिका संतोष

२२) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२४) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२५) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२६) मा.फुगे भिमाबाई पोपट

२७) मा. ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२८) मा.सावळे सिमा रविंद्र

२९) मा.लोंढे नम्रता योगेश

३०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३१) मा.लांडे विक्रांत विलास

३२) मा.गीता सुशिल मंचरकर

३३) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३४) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३५) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३६) मा.अनुराधा गणपत गोरखे

३७) मा.केशव हनुमंत घोळवे

३८) मा.मंगला अशोक कदम

३९) मा.तुषार रघुनाथ हिंगे

४०) मा.अश्विनी भिमा बोबडे

४१) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४२) मा.संजय बबन नेवाळे

४३) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४४) मा.भालेकर प्रविण महादेव

४५) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४६) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४७) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४८) मा.घोलप कमल अनिल

४९) मा.उत्तम प्रकाश केंदळे

५०) मा.चिखले सचिन तुकाराम

५१) मा.जावेद रमजान शेख

५२) मा.यादव मीनल विशाल

५३) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५४) मा.राजू मिसाळ

५५) मा.बाबर शर्मिला राजू

५६) मा.अमित राजेंद्र गावडे

५७) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५८) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५९) मा.ढाके नामदेव जनार्दन

६०) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६१) मा.करुणा शेखर चिंचवडे

६२) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६३) मा.भोईर सुरेश शिवाजी

६४)  मा.अपर्णा निलेश डोके

६५)  मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६६)  मा.गावडे राजेंद्र तानाजी

६७)  मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६८)  मा.जयश्री वसंत गावडे

६९)  मा.कोमल दिपक मेवानी

७०)  मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७१)  मा.सुलक्षणा राजू धर

७२)  मा.शाम गणपतराव लांडे

७३)  मा.सुजाता सुनिल पालांडे

७४)  मा.कदम निकीता अर्जुन

७५)  मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७६)  मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७७)  मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७८)  मा.नढे विनोद जयवंत

७९)  मा.पाडाळे निता विलास

८०)  मा.काळे उषा दिलीप

८१)  मा.कोकणे संतोष अंकुश

८२)  मा.पवार मनिषा प्रमोद

८३)  मा.अभिषेक गोविंद बारणे

८४)  मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८५)  मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८६)  मा.बारणे माया संतोष

८७)  मा.निलेश हिरामण बारणे

८८)  मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८९) मा.दर्शले रेखा राजेश

९०) मा.कलाटे राहुल तानाजी

९१) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९२) मा.ममता विनायक गायकवाड

९३) मा.कामठे तुषार गजानन

९४) मा.चोंधे आरती सुरेश

९५) मा.कस्पटे संदिप अरुण

९६) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९७) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९८) मा.सुनिता हेमंत तापकीर

९९) मा.कुटे निर्मला संजय

१००) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०१) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०२) मा.कदम शशिकांत गणपत

१०३) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०४) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०५) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

१०६) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०७) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०८) मा.नवनाथ दत्तू जगताप

१०९) मा.संतोष बबन कांबळे

११०) मा.सोनवणे शारदा हिरेन

१११) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११२) मा. वाबळे संजय मल्हारराव

११३) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

११४) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११५) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११६) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.प्रविण आष्टीकर-प्र.अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे-प्र.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.डॉ.अनिल रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.झगडे, मा.खोत, मा.दुरगुडे, मा.राऊत -सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे, मा.कुलकर्णी, मा.कांबळे, मा.गट्टूवार, मा.भोसले, मा.घुबे, मा.पवार, मा.सुपेकर-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.दांगट-प्रशासन अधिकारी व मा.माने-पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा. महापौर :-** मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक, सन्मा. नगरसेविका, सर्व अधिकारी वर्ग, पत्रकार बंधू, नागरीक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा. नामदेव ढाके :-** मा. महापौर साहेब विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- १

दिनांक – २०/७/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.विलास मडिगेरी व मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२६४६ दि.९/०५/२०१८

३) मा.महापालिका सभा ठराव क्र. २०७ दि.२२/०६/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते विविध सेवा वाहिन्यां टाकण्यासाठी दर वर्षी रस्ते खोदले जातात. सदर रस्ते खोदल्यानंतर ते पूर्ववत दुरुस्ती करणेकामी बराच कालावधी जातो. खोदलेले रस्ते लवकरात लवकर पूर्ववत (दुरुस्ती) करणेकामी धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

**अ) धोरणः-**

१) सेवा वाहिन्यां टाकणा-या संस्थेकडून रस्ते खोदाईसाठी परवानगी मागण्यासाठी करण्यात येणारे अर्ज प्रत्येक वर्षी जुन, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या चार महिन्या मध्येच स्विकारणेत यावेत.

२) महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये अ,ब,क,ड,इ,फ,ग, ह व बीआरटीएस अशा प्रत्येक क्षेत्रिय कार्यालय/विभागानुसार सेवावाहिन्या टाकण्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते पूर्ववत करण्यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करावे.

३) रस्ता खोदाईपोटी प्राप्त होणारे शुल्क, त्याच क्षेत्रिय कार्यालयाच्या क्षेत्रातील सेवा वाहिन्या टाकण्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते दुरुस्तीकामी वरील लेखाशिर्षावर देणेत यावे.

४) परवानगी पत्र देणे पुर्वी संबंधित क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत विदयुत विभाग, पाणीपुरवठा विभाग, जलनिःसारण विभाग, वाहतुक विभाग या विभागांचे नाहरकत दाखले प्राप्त करून घेण्यात येऊन, ते शहर अभियंता कार्यालयाकडील तांत्रिक विभागास दिले नंतरच परवानगी पत्र देण्यात यावे.

५) एच डी डी (**Horizontal Direction Drill)** पध्दतीने खोदाईची परवानगी यापुढे कायमस्वरुपी देणेत येऊ नये.

६) परवाना धारक याच्याकडून एकूण खोदाईच्या दुरूस्ती पोटी येणा-या शुल्काच्या २५**%** रक्कम अनामत म्हणून परवानगी देणे पुर्वी डी डी/आर.टी.जी.एस. द्वारे मनपा कोषागारात भरून घ्यावी.

७) या पुढे शहरामध्ये विनापरवाना खोदकाम केल्याचे आढळल्यास/तक्रारी प्राप्त झाल्यास,सदर तक्रार स्थळाचा पंचनामा संबंधित क्षेत्रिय कार्यालय (स्थापत्य) विभागाने करून, खोदाई शुल्काच्या रक्कमेच्या दुप्पट रक्कमेचा दंड आकारणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर भागातील उपअभियंता यांनी अनधिकृत खोदाई करणा-यावर **F.I.R.** दाखल करावा.

८) दररोज काम सुरू करणे पुर्वी संबंधित कनिष्ठ अभियंता यांना परवानाधारक संस्था यांनी काम सुरू करणेबाबत कळविणे आवश्यक असून, संबंधित कनिष्ठ अभियंता किंवा स्थापत्य सहाय्यक यांनी दैनंदिन पाहणी करून, कामाचे फोटो व चलचित्र

खोदाई काम सुरु करणे अगोदर तसेच खोदाई चालू असताना व बुजविलेनंतर संपुर्ण फोटो व चलचित्र **(Video shooting)** संकलित करून नस्तीबध्द करावेत.

९) फक्त दुरुस्तीसाठी तातडीने रस्ता खोदणे आवश्यक असल्यास, मनपाकडील व खाजगी सेवावाहिन्यांची १०० मीटर पर्यंतचीरस्ते खोदाई शहर अभियंता यांची परवानगी घेवून करणेत यावी व त्यापुढील अंतरासाठी मा.आयुक्त यांची रितसर परवानगी घेण्यात यावी. (सदर तातडीचे कामासाठी **NOC** घेणे व्यतिरिक्त इतर सर्व अटी बंधनकारक राहतील.)

**ब) अटीः-**

**सेवा वाहिन्याचे रस्ते खोदाईचे परवाना देताना खालीलप्रमाणे अटींचा समावेश करावा.**

१) काम करण्याच्या ठिकाणी कामाच्या माहितीबाबत फलक लावणेत येवून त्यामध्ये कामाचे नाव, कामाची मुदत,एजन्सीचे नाव, एकूण रस्ता खोदाई करणेत येणारे अंतर, कामाचे ठिकाण, संबंधित एजन्सीच्या प्रतिनिधीचे नाव व मोबाईल नंबर व त्या प्रभागातील कनिष्ठ अभियंत्याचे नाव व मोबाईल नंबर इत्यादी माहितीचा समावेश असावा. तसेच फलक प्रत्येक दिवशी काम सुरू होणा-या ठिकाणी ते त्या दिवशीच्या काम पुर्ण होणा-या ठिकाणी तसेच किमान ४०० मी. अंतरावर असावा.

२) काम सुरू करणेपुर्वी संपुर्ण खोदाईचा बार चार्ट परवानगी धारक संस्था यांनी संबंधित कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांना सादर करावा.

३) वाहतूक पोलीस विभागाकडून परवाना घेणेत येऊन, सदर परवान्याची प्रत संबंधित कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांच्या कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

४) खोदाई काम सुरू करणेपुर्वी महाराष्ट्र नॅचरल गॅस **(MNGL)**, एम.एस.ई.बी., बी.एस.एन.एल. तसेच एम.आय.डी.सी यांना संबंधित परवाना सादर करून त्याची पोहोच संबंधित कार्यकारी अभियंता स्थापत्य विभागात देणे बंधनकारक राहील. (सदरची बाब त्यांनी त्यांचे सेवा वाहिनीची खोदाई काम चालु असताना दक्षता घेणेसाठी आवश्यक आहे.)

५) ज्या एजन्सीला खोदाई कामाची परवानगी दिली आहे त्यांनी कामाचे फोटो व चलचित्र (Video Shooting**)** खोदाई काम सुरु करणे अगोदर तसेच खोदाई चालू असताना व बुजविलेनंतर काढणे आवश्यक आहे व त्याच्या प्रती स्थापत्य विभागास काम पूर्ण झालेनंतर सादर करणे बंधनकारक राहील.

६) काम पुर्ण झालेनंतर परवानगी पत्राप्रमाणे काम झाल्याचा, संबंधित स्थापत्य कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित केलेला दाखला, अर्जदार एजन्सीने अनामत रक्कम परतावा अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

७) काम संपल्यानंतर परवाना धारक यांनी अनामत रक्कम परत मिळणेसाठी ४५ दिवसांच्या आतपरवाना देणा-या ठिकाणी अर्ज करणे बंधनकारक राहील. अन्यथा, कोणतीही पुर्व सुचना न देता अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

८) दिलेल्या परवानगी व्यतिरिक्त जादा खोदाई आढळल्यास वाढीव खोदाईस दुप्पट दराने दंड आकारून त्याची वसुली करणेत यावी.

९) सदर रस्ता खोदाईचे काम हे मनपाच्या कार्यालयीन वेळेतच (सकाळी १०.०० ते संध्या ५.४५) पर्यंत करावे.

१०) रस्ता खोदाईची परवानगी देताना मनपा कडून परवानगी पत्रात असणा-या यापुर्वीच्या अटी व शर्ती कायम राहतील.

तसेच ज्या वर्षात सेवावाहिन्या टाकण्यासाठी रस्ता खोदाईची परवानगी दिली जाईल, त्याच वर्षी सदर रस्ते पूर्ववत करण्याचे काम अंदाजपत्रकात ठेवून, पुरेशी तरतुद करुन काम पूर्ण करावे. मा.आयुक्त यांनी सर्व विभागास सदर धोरणानुसार कार्यवाही करणेचे परिपत्रक काढावे.  सबब वरीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा. लांडगे राजेंद्र -** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा. मंगला कदम** - मा. महापौर साहेब, उपसूचना ही शेवटी दयावी आता विषयावर चर्चा होऊ दया.

**मा.अश्विनी चिंचवडे पाटील -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. सभागृह पिंपरी चिंचवड शहरामध्ये रस्ते खोदाईच्या धोरणाबाबत स्थायी समितीचे सदस्य मा. विलास मडिगेरी व मा.सागर आंगोळकर यांचे मी स्वागत करते. वास्तविक हा प्रस्ताव प्रशासनाने मांडणे गरजेचे होते. आज रोजी सर्व सभागृहातील नगरसेवकांना माझी विनंती आहे की आपल्या सगळयांच्या प्रभागामध्ये फायबर केबल, एमएनजीएल, २४X७ व इतर खोदाईमुळे प्रभागातील

आबालवृध्द नागरीकांना त्रस्त आहेत. रस्त्यावर राडारोडा, केबलचे बंडल्स, खड्डे आणि त्यामुळे ट्रॅफीक जाम होत हे नित्याचेच झालेले आहे. चिंचवडमध्ये मागे पाणीपुरवठा विभागाने खोदाई केली. नगरसेवकांनी पाठपुरावा केला. डांबरीकरण झाले आणि दोन दिवसांनी परत एमएसईबीने रस्ते खोदाई केली. ते बुजविले तर फायबर केबलवाल्यांनी खोदाई केली. याचाच अर्थ महापालिकेच्या विभागाचा समन्वयाचा अभाव आहे. संबंधित विभाग एकमेकांकडे बोट दाखवत चुक प्रशासनाची आणि त्याचा त्रास मात्र नागरीकांना होतो, आपण सर्व नगरसेवकांनाही त्याचा त्रास होतो. माझ्याकडे माहिती आहे. मे. रिलायन्स, जिओ, इन्फोकॉम यांना रस्ते खोदाईची परवानगी दिली दि.४/३/२०१३ रोजीचे करारनाम्यानुसार महापालिकेच्या ११८ कार्यालयात इंटरनेट ब्रॉडबँड कनेक्शन उपलब्ध करुन दयावे याबाबत महापालिकेने तीन ते चार विनंती पत्र पाठविली आहेत. परंतु रिलायन्स, जिओने दि. ६/४/२०१७ पर्यंत महानगरपालिकेच्या कार्यालयात इंटरनेट कनेक्शन उपलब्ध करुन दिलेले नाही. दंडात्मक कारवाई का झाली नाही त्यांच्यावर. कंपनीने करारनामा वेळेवर पाळला नाही तरी देखील आज रोजी दि. २२/३/२०१८ पर्यंत कंपनीवर दंडात्मक कारवाई न करता नुसते कागदी घोडे नाचवत पुन्हा रस्ते खोदाईची परवानगी देण्यात आली आहे हे दुर्दैव आहे. याचाच अर्थ आर्थिक लागेबांधे आहेत हे लक्षात येते. आमचे एखादे नागरीकाने जर पिण्याच्या पाण्यासाठी, ड्रेनेज लाईनसाठी खोदाईची परवानगी मागितली तर परवानगी लवकर मिळत नाही. काहीतरी कारणे सांगितली जातात. की सगळीकडून परवानगी घ्यावी लागेल. मग रस्ते खोदाई होईल. परंतु हे रिलायन्स, जिओवाले आहेत त्यांना पोसण्याचे काम आपली पालिका करतेय का ? ते काय जावई आहेत का आपले ? आज रोजी वेगवेगळया एजन्सीने केलेल्या खोदाईमुळे ठिकठिकाणी पॅचवर्क करण्यात आले आहे. परंतु ते काम दर्जाहीन झाल्यामुळे खड्डेच खड्डे झालेले आहेत. त्यामुळे खोदाईची महापालिकेतील याच प्रस्तावातील अटीशर्तीनुसार व कंपन्यासोबत केलेल्या करारनाम्यानुसार गुप्तस्तरीय चौकशी व तपासणी व्हावी. त्याबाबत श्वेतपत्रिका काढावी अन्यथा आंदोलन करावे लागेल असे मला याठिकाणी सांगावेसे वाटतयं, धन्यवाद साहेब.

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक, सन्मा. सभागृह पिंपरी चिंचवडमधील खड्डे हा प्रकार आता खूप गाजलेला आहे. व्हॉटसअपला सर्व लोक खड्डे टाकतात. अक्षरश: बरेच लोकांचा काही खड्डयांमध्ये मृत्यू झालेला आहे. पाऊस लय पडल्यामुळे. पिंपरी चिंचवडचे आपल्या देशामध्ये एक वेगळे नाव आहे. मोठमोठे कारखाने

आहेत. जर बाहेर देशातले लोक आपल्या देशात आले किंवा पिंपरी चिंचवडमध्ये आले तर खूप खड्डेच खड्डे दिसतात. आता कोणत्या कॉन्ट्रॅक्टराने हे काम केले नसेल किंवा कोणत्या अधिका-याने काम केले नसेल तो विषय मागील वर्षाचा असेल पण मला रोडमधल्या खड्डयांबद्दल मनापासून सांगावेसे वाटते की आम्ही नवीन नगरसदस्य असताना सहा महिन्याचे नगरसेवक असताना काटेपुरम ते गांगुर्डेनगर असा अर्धा किलोमीटरचा रोड होता आणि त्या रोडमध्ये नुसते खड्डे असल्याने गाडया पडायच्या, एक्सीडेंट व्हायचे, कुणाला लागायचे कुणाला काय व्हायचे. तर मी एक माझ्या जवळच्या माजी नगरसेवकाला विचारले की हे खड्डे का बुजवीत नाहीत. ते म्हणले यांना कार्पोरेशनने पैसे दिलेले नाहीत. मग त्याच्यावर मी विचारले की कोण आहेत ते तर ते म्हणाले की निलेश गांगुर्डे यांना कार्पोरेशनने मोबदला दिला नव्हता. तर ते खड्डे आपण बुजवू शकतो. एखादयाचा जीव वाचवू शकतो तर मी स्वत: त्या निलेश गांगुर्डेच्या घरी गेलो. मेन गोष्ट आमच्याबरोबर त्याला उमेदवारी राष्ट्रवादीची होती. पण मी निलेश गांगुर्डेच्याकडे गेल्यानंतर निलेशला मी विनंती केली की बाबा रोड होऊ दे. आणि ते खड्डे बुजवून लोकांचा जीव वाचू दे. त्याने पण मोठापणा दाखवून तो रोड आम्हाला गेल्यावर्षी करुन दिला. तसं जर आपण सर्व अधिका-यांनी किंवा नगरसेवकांनी किंवा ठेकेदारांनी जर चांगला विचार केला तर प्रभागातला. मी जसा काटेपुरम चौक ते मयूरीनगर पर्यंतचा विचार केला तर सर्वांनी अधिका-याला किंवा कॉन्ट्रॅक्टदाराला विचारले की बाबा हा रोड तो खोदतोय या रोडमध्ये तू किती वर्षाची गॅरंटी देशील. तर त्याला आपण गॅरंटी मागायला पाहिजे. कारण खड्डा पडला तर लोक आपल्या पिंपरी चिंचवडचे त्याच्यात मृत्यू पावत्यात किंवा एक्सीडेंट होतो ही बेकार गोष्ट आहे. कॉन्ट्रॅक्टदाराला आपण विचारायला पाहिजे की बाबा पाच वर्षाची गॅरंटी दे. एक उदाहरण सांगायच म्हणलं तर पुण्याचा जंगली महाराज रोड. तो तीस वर्षापुवी झालेला होता. त्यांच्याकडे दहा वर्षाची गॅरंटी दिली होती तर त्या रोडची गॅरंटी तीस वर्षाची होती. तो खड्डा पडला नाही हे एक वैशिष्ट आहे. मला वर्षे झाले मी नवीन नगरसेवक असल्यामुळे मा. महापौर साहेब यांनी बोलण्याची संधी दिली आहे. सभागृहामध्ये भाऊसाहेब भोईर असतील किंवा अजित गव्हाणे असतील, राहुल कलाटे शिवसेनेचे असतील त्यांच सर्वांचं भाषण मी शांतपणाने ऐकतो. भाऊसाहेबांचे तर मी वर्षे झालं भाषण ऐकतो. कारण ते भाषण करताना पिंपरी चिंचवडचा काय विकास व्हावा हयाच्यावर भाषण करीत असतात ते दुसरं भाषण काहीही करीत नाहीत ते मी शांत रितीने ऐकतो. थोडफार घेण्यासारखं आहे आम्हाला नवीन

नगरसेवकांना. आमच्या ताई आक्रमक आहेत सावळेताई. त्यांनी पहिल्यापासून विरोध पण केला आहे की हे शहर चांगल बनाव, त्यांचंही मी भाषण ऐकतो, सर्वांचं भाषण ऐकतो. आता दत्ता साने नाहीत मी त्यांच्याबद्दल एक गोष्ट बोलू शकतो. कारण मी त्यांचा आदर करतो. कारण त्यांचं पेपरला आणि व्हॉटसअपला आलेल आहे की १००/- रुपये मिळवा खड्डा दाखवा. पण माझ्याकडे एक माणूस असाच आला आणि म्हणाला आहो दत्ता साने १००/- रुपये देतात. तुम्ही का नाही १००/- रुपये देत. आहो म्हणल तसं नाहीय आम्ही असं करतोय की खड्डा बुजवून या आणि मग १०० रुपये घ्या. कारण माणुस मरायला नको. कारण हे कस व्हायच आमचे पोर म्हणायचे मी खडडा पाडतो मला १०० रुपये तुम्ही दया. मी म्हणल, तस करु नको बाबा खड्डा बुजवून ये मग तुला १००/- रुपये देतो. मला महापौर साहेब यांनी बोलायला संधी दिला मी त्यांचे आभार मानतो, धन्यवाद.

**मा.अश्विनी बोबडे -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक, सन्मा. सभागृह मला रस्त्याबद्दल बोलायचं आहे. प्रभाग क्रमांक ११ एमआयडीसी तिथे रस्ता पहिलाच जशी एमआयडीसी झाली तेव्हाच रस्ता झाला होता. अतिक्रमण झाले आहे. अतिक्रमण थोडेफार उठविण्यात आले आहे. १०० मीटर रुंदीचा तो रस्ता थरमॅक्स चौकापर्यंत आहे. तर त्या रस्त्यामध्ये १० ते २० घर अशी आहेत की त्यांना आम्ही २००७ मध्ये बिल्डींगमध्ये घरे आणि दुकाने दिली असताना त्यांनी ती घरटी बसविलीत. ठेकेदाराला त्याचे पैसे दिलेले असताना ठेकेदारानी ती घरे काढलेली नाहीत. रात्रीअपरात्री, पाहटे पाच वाजता, साडेपाच वाजता तिथे रस्त्याची लाईट बंद केली जाते तेव्हा तिथे ऍक्सीडेंट होतात. ऍक्सीडेंट झाल्यानंतर आम्हाला तिथं रात्री-अपरात्री जावे लागते. फक्त ती १० च घरे तिथं राहिलेली आहेत. ठेकेदाराला त्याचे पैसे दिलेले आहेत किंवा नाहीत ते एक आम्हाला सांगण्यात यावे. आणि दुसरी गोष्ट तो रस्ता एवढे वर्षे झालेला असताना तो रस्ता महेशदादांनी पास करुन घेतला. त्याच्याबद्दल महेशदादांना धन्यवाद. आणि ती १० घरे १० दुकाने काढण्यात यावीत, हि विनंती. दुसरी गोष्ट आमच्या प्रभागामध्ये सीमध्ये डीपी आहे. त्यामध्ये २ ते ३ लोक मेलेत. आणि कोणीतरी तिथं काय तरी काय तरी करत असतं. आज १५ दिवस झाले तिथे लाईट नाही. अधिका-यांना फोन करुन पण अधिकारी तिथं आलेले नाहीत. तर ते का आलेले नाहीत, धन्यवाद.

**मा.सचिन चिंचवडे -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक, सन्मा. सभागृह मा. अश्विनीताई चिंचवडे यांनी आता जो विषय मांडला त्या विषयाला मी १०० टक्के सहमत आहे. महापौर साहेब, ज्या पध्दतीने खड्डे खोदले जातात आणि परत आपण जे काम करतो ते काम करताना स्थानिक नगरसेवकांना विचारात न घेता या गोष्टी केल्या जातात. परवानगी दिली जाते. ती परवानगी कोणाला विचारुन किंवा कोणाशी चर्चा करुन न घेता त्या परवानग्या दिल्या जातात. येथून पुढे किमान त्या परवानग्या देताना स्थानिक नगरसेवक असतील किंवा लोकप्रतिनिधी असतील त्या लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन किंवा विचारुन त्या केल्या जाव्यात. एवढीच अपेक्षा व्यक्त करतो, थांबतो.

**मा. सचिन चिखले -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक, सन्मा. सभागृह. खूप महत्वाचा आणि चांगला विषय आज सभागृहापुढे मांडण्यात आलेला आहे. हयाच्याआधी माझ्या पत्नी नगरसेविका होत्या आणि गेली दिड वर्षापासून आम्ही सुध्दा कारभार चालवत आहोत. आताच आमच्या आदरनीय अश्विनीताई चिंचवडे असतील, आमचे अंबरनाथभाऊ कांबळे असतील, त्याचप्रमाणे आमच्या बोबडेताई असतील, आमचे सचिनभाऊ चिंचवडे असतील. शहरातील एक समस्यारुपी आणि सर्व सामान्यांच्या ज्या व्यथा आहेत त्या त्यांनी आपल्या सभागृहामार्फत महापौर साहेब तुमच्यासमोर मांडलेल्या आहेत. एक चार ते पाच दिवसा पासून किंवा एक १५ ते २० दिवसांआधीपासून लोकमत असेल, पुढारी असेल, सकाळ असेल, लोकसत्ता असेल, आज का आनंद असेल अशी सर्वच वर्तमानपत्रे यांनी शहरातील खड्डयांच्याविषयी आणि दैनंदिन नागरीकांच्या विषयी वेळोवेळी वर्तमानपत्राच्या माध्यमातून आपल्यासमोर सर्व सामान्य नागरीकांच्या व्यथा मांडलेल्या आहेत. खरतर याठिकाणी सर्व नगरसेवक आणि नगरसेविका बोलत असताना महापौर साहेब कुठेतरी प्रशासनाने याची काळजी घेतली पाहिजे. काही दिवसापूर्वी एक महिलेचा मृत्यू रस्त्यावर गाडी चालवीत असताना खड्डयामुळे झालेला आहे. आपल्याला पुर्ण पिंपरी चिंचवड शहराला माहीत आहे. कधीतरी आपण प्रशासन या नात्याने पावसाळा यायच्या आधी हे खड्डे व्यवस्थितपणे बुजविण्याचे काम ही संपुर्ण जबाबदारी प्रशासनाची आणि सर्व नगरसेवकांची सुध्दा जबाबदारी आहे. परंतु काही एजन्सी आणि काही संस्था अशा आहेत आणि त्यांच्यामागे या संस्थेना दिले गेलेले काम आहे ते गुंडगिरी प्रवृत्तीची जी लोक आहेत, भाईगिरी करणारी जी लोक आहेत ती कोणत्याही सन्मा. नगरसेवकांना अजिबात विश्वासात घेत नाहीत. आणि त्या

अधिका-यांना तर कुत्र्यासारखी वागणूक देतात. अधिकारी तर सोडा  नगरसेवकाना सुध्दा ती लोक विचारत नाहीत. आज रस्ता झाला की उदया खोदत बसायच आम्ही त्या अधिका-यांना फोन करायचा की कारे बाबा काल तो रस्ता डांबरीकरण केलेला आज तू खोदतोय तुम्हाला माहीत आहे का? तर तो अधिकारी म्हणतो साहेब, मला काहीच माहिती नाहीय. मग आम्ही पुन्हा घेऊन त्यांना जायच आणि पुन्हा भाई, दादाचा फोन येणार की आमची लोक आहेत सांभाळून घ्या. सन्मा. महापौर किती दिवस आपण लोकांना वेठीस धरणार आहेत. काही तरी लगाम या सर्व संस्थांना लागला गेला पाहिजे. आज सभागृहापुढे जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. खरतर सचिन भाऊंनी जे सांगितलं एमएनजीएल कंपनी असेल, ज्या कोणी संस्था असतील खोदाई करण्यापूर्वी महापालिकेची जी काय त्यांनी परमिशन घेतली गेली असेल त्याचा कालावधी ठरला गेला पाहिजे.  आणि ठरल्यानंतर जे कोणी संबंधित जे.ई. असतील, डेप्यूटी इंजिनिअर असतील आणि सन्मा. जे कोणी नगरसेवक असतील. त्यांच्या हातामध्ये तो चार्ट दिला गेला पाहिजे. की बाबा हा रस्ता येथून पुढे आम्ही खोदत आहोत. जर आम्हाला अंदाज लागला की हा रस्ता खोदणार आहे तर आम्ही नक्कीच आमच्या अधिका-यांना सांगू ती प्रोव्हीजन करु की बाबा हया ठिकाणी एवढा रस्ता खोदणार आहे. आम्हाला एवढ डांबर लागणार आहे. ते डांबर आम्ही माग ठेऊ शकतो. परंतु असा कोणत्याही प्रकारचा निर्णय, कोणत्याही प्रकारचा अधिकार किंवा कोणत्याही प्रकारचा आळा या शासनावर बसलेला नाहीय. सन्मा. महापौर कोणीही येतेय काहीही खोदतेय आणि त्याचा काहीही उपयोग होत नाही. आणि नंतर त्याचा फटका सर्वसामान्य नागरीकांना होतो. महापौर साहेब, आपण आता स्मार्टसिटीमध्ये प्रवेश केलेला आहे. २९ वा नंबर आपला आहे. कुठेतरी या गोष्टीची आपण दखल घेतली पाहिजे. सन्मा. महापौर साहेब, विदयुत लाईन्स असेल, पाणीपुरवठा असेल, हे सुध्दा ज्यावेळेस आपण एखादा ठेका एखादया ठेकेदाराला आपण देतो आणि ज्यावेळेस तो खोदायला सुरुवात करतो तो बघत नाही की त्या बीएसएनएलच्या लाईन आहेत का एमएसईबीच्या लाईन आहेत, जेसीबी लावला की जे तोडत जातो आणि ते तोडल्यानंतर त्याच फक्त एकच काम असत की कधी माझ काम पुर्ण होईल. कधी माझ टेंडर कंम्प्लेट होईल पण त्याच्यानंतर बीएसएनएलच्या लाईन अजिबात जोडायला येत नाहीत किंवा पाणीपुरवठयाच्या लाईन जोडायला येत नाही आणि तो सांगत सुध्दा नाही की इथं लाईन तुटली आहे किंवा इथ वायर तुटलेली आहे. असं कोणत्याही कर्मचा-यांना, अधिका-यांना तो सांगत नाही. आणि त्याच्यानंतर तो अधिकारी बीएसएनएलचा येतो आणि बिचारा आख्खा

रस्त्याची परत चाळण करतो. की कुठे वायर तुटली किंवा कुठे लाईन तुटलेली आहे. आणि त्याच्यानंतर मग एक ते दोन हस्यानंतर किंवा एक महिन्यानंतर सर्व सामान्य नागरीकांचे जेवढे सर्व बीएसएनएलचे जेवढे कॉल्स असतील तेवढे थांबविले जातात. वायरर्स तुटलेल्या असतात तोपर्यंत कोणीही बुजवायाला येत नाही. सन्मा. महापौर साहेब, याचा काहीतरी क्रायटेरिया ठरलेला आहे. त्याची अंमलबजावणी व्यवस्थितपणे व्हायला पाहिजे. आणि जो कोणी व्यक्ती, जी कोणी संस्था  तुम्हाला आणि आम्हाला विश्वासात घेतल्याशिवाय काम करु शकत नाहीय त्यांच्यावर कायदयाने गुन्हा दाखल झाला पाहिजे. मग तो कोणीही असो त्याला न जुमानता कायदयामार्फत त्याच्यावर शासनाने कारवाई केली पाहिजे. एवढ मी बोलतो. सन्मा. महापौर आजचा विषय खूप चांगला आहे. याच्यामध्ये सन्मा. महापौर साहेब, आपण एक अट नक्कीच टाकली पाहिजे की इंजिनिअर यांनी नगरसेवकांना व्यवस्थितपणे कळविले गेले पाहिजे. आणि पावसाळयाच्या आधी कमीत कमी दोन ते तीन महिने आधी हयाची सगळयांची प्रोसेस कंप्लीट केली पाहिजे. नाहीतर पावसाळा तोंडावर येतो आणि आपल खोदकाम चालू राहतं त्याच्यानंतर डांबर करायला सुध्दा वेळ मिळत नाही नंतर मग आपण जो नागरीकांना त्रास दयायचा तो देत असतो सन्मा.महापौर याच्याबाबत व्यवस्थित  काळजी घ्यावी आणि मग निर्णय घ्यावा, धन्यवाद.

**मा. मीनल यादव -** मा.महापौर साहेब, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक, सन्मा. सभागृह. आता  खड्डयांचा प्रश्न ऐरणीवर असताना हे जिओचे, रिलायन्सचे लाईन्स टाकण्याचे जे काम चालू आहे ते एकदम मोठया प्रमाणावर आहे. जे तुमच्याकडून परमिशन घेतात. त्या परमिशनची त्या त्या प्रभागातील नगरसेवकांना काहीही माहिती नसते. कोणीही उठते आणि स्वत:च्या बापाचा रस्ता असल्यासारखा खोदकाम चालू करत. पाण्याच्या लाईन तुटतील, ड्रेनेजच्या लाईन तुटतील याच त्यांना काही देणंघेणं नसतं. फक्त त्यांच काम झालं बाकीच आणि हयांच काम ते फक्त शनिवार, रविवार किंवा सुट्टीच्या दिवशी चालू असतं. त्यादिवशी बाकीचे अधिकारीवर्ग आहेत किंवा नाहीत की ज्या तुटलेल्या लाईन्स आहेत की त्या दुरुस्त करु शकतो. सणावाराच्या दिवशी हयांच काम असतं. अस तुम्ही त्यांना एक नियम लावून दया की वर्कींग ऑवर्समध्ये तुमचं काम झालं पाहिजे सकाळी १० ते ५ मध्ये. हे सहानंतर काम चालू करतात रात्री दहा-दहा वाजता पाण्याच्या लाईन्स तुटतात. अशा वेळेस लोक आमच्याकडे आले की आम्ही आयत्या वेळेस कसे काय त्यांचं  हे सॉल्व्ह करायचं. मध्यंतरी

आमच्या प्रभागामध्ये पाडव्याच्या आदल्या दिवशी रात्री ९.३० वाजता जिओच्या लाईन्सचे काम झाले. मोठी पाईपलाईन तुटली. दुस-या दिवशी सणासुदीच्या दिवशी कोणालाच पाणी मिळाले नाही. ते जिओचे लोक कुठलीच जबाबदारी घ्यायला तयार नाहीत. काही सांगायला तयार नाहीत. त्याच्यानंतर ४ दिवस आलेच नाहीत. जो राडारोडा पडला होता. त्याठिकाणी तीन वेळा एक्सीडेंट झाले खंडोबा माळच्या तिथं. मेनरोडला जिओच्या लाईनचे काम झालं होते. तेथे गोदावरी शाळा आहे, उर्दू शाळा आहे. आणि गजबजलेला एरिया आहे. त्या एरियामध्ये कितीवेळा एक्सीडेंट झालेले आहेत. कितीवेळा संबंधित अधिका-यांना सांगितलं. पण त्यांना बाकीच्याच कामाचा लोड इतका असतो की हे काम ज्यांना दिलय त्यांनी त्याचा फालोअप घेतला पाहिजे. जिओचे लोक वर्षातून किती वेळा हे खोदतात, त्यांच काम आहे हे. महिन्यापूर्वी खोदलेले असते परत दुसरा महिना चालू करतात. म्हणजे त्यांना काहीतरी नियम लावून दया की पाच वर्षामध्ये एकदाच हा रस्ता खोदला पाहिजे. काय करायच ते एकदाच करा. माझ्या प्रभागामध्ये जिओचा अनधिकृत टॉवर बांधलेला होता. म्हणजे कुठलीही परमिशन न घेता टॉवर बांधलेला होता. अस कस काय? त्याच्यावर कारवाईसाठी कितीवेळा बोलणं झालं. शेवटी सहा महिन्यांनी तो टॉवर उतरवला. एखादया वेळी तुम्ही अनधिकृत बांधकामे काहीही असतील त्यांच्यावर कारवाई करता. मग हे असं अनधिकृत टॉवर आहे. ज्या लाईन टाकतात त्याच्यावर का कारवाई करीत नाही. बाकीच्या जर एखादया गरजूला पाण्याच नवीन कनेक्शन दयायच असेल तर चार वेळेला प्रभागामध्ये तुम्ही चक्रा घालायला लावता. त्यावेळेस तुम्हाला सगळे कागदपत्रे सगळे नियम अटी सगळे लागतात आणि जेव्हा अशा काही लाईन्स टाकतात त्या वेळेला तुमचे सगळे अधिकारी प्रशासन काय झोपा काढतात का. तेव्हा कुठे जातात तुमचे सगळे नियम. त्याच्यामुळे माझी नम्र विनंती आहे की वर्कींग ऑवर्समध्येच हे काम झाले पाहिजे. सुट्टीच्या दिवशी हे काम करायला परमिशन नाही मिळाली पाहिजे. सोमवार ते शुक्रवार पाचच दिवसांमध्ये आणि पावसाळयाच्या आधी. पावसाळयाचे पुर्ण ४ महिने हे काम करायला बिलकुल त्यांना परवानगी मिळाली नाही पाहिजे. मे महिन्याच्या आत ही सगळे काम झालीच पाहिजेत. आणि पुढचे चार महिने हे पुर्ण थांबले पाहिजे आणि एका भागात एकाच वर्षात डबल खोदकाम केलं तर त्यांना फाईन दया धन्यवाद.

**मा. निलेश बारणे -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक. सन्मा. सभागृह. मा. महापौर साहेब, याच्यामध्ये काही त्रुटी आहेत. त्या त्रुटी आपल्याला मी सांगू इच्छितो. ४ नंबरचा जो विषय आहे. महापौर साहेब आपल्याकडे वाहतूक विभागाची स्थापना नाही. आम्ही आयुक्तांना असे सांगू इच्छितो की आपण पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये वाहतूक विभागाची स्थापना करुन त्याच्यावर क्लास वन अधिकारी आपण नेमावा. महापौर साहेब, याच्यामध्ये ७ नंबरमध्ये अस दिलय की आपण दुप्पट त्याच्यावर दंड आकारावा. तर महापौर साहेब माझी आपल्याला एक विनंती आहे. त्याच्यावर आपण तिप्पट आकारला पाहिजे. महापौर साहेब, आताच सन्मा. सदस्यांनी विनंती केली की खोदकाम करतानी ते रात्रीचे वेळी खोदकाम करतात. मा. महापौर साहेब, आपल्याला विनंती करतो की हे खोदकाम करीत असताना सुर्यास्तानंतर हयांना कुठलीही खोदाईची परवानगी देऊ नये. जर कोणी खोदले तर हयांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत ही विनंती करतो. मा.महापौर साहेब, मागच्या एक महिन्यापूर्वीच पेपरमध्ये ॲड आली होती की महापालिकेच्या कार्यालयाला इंटरनेट सुविधा पुरविण्यासाठी. रिलायन्सला तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. नीलकंठ पोमण साहेबांकडे मी पत्रव्यवहार केला होता की, शासनाचा आणि केंद्र सरकारचा एक नियम आहे की दोन एमबीपीएस बँडविडथ हे प्रत्येक शासकीय कार्यालयाला सुविधा पुरविल्या पाहिजेत. तर मा. महापौर आणि मा. आयुक्त आपल्या कुठल्याही शासकीय कार्यालयाला त्यांनी सुविधा न दिल्याचे नीलकंठ पोमण यांनी कबूल केलेले आहे. तर नवी मुंबई महापालिका हयांना बंदी घालू शकते. मग आपण का बंदी घालू शकत नाही महापौर साहेब. का घालू शकत नाही आपण जर २८ लाख रुपये त्यांना तीन महिन्यांसाठी मोजतो. तर आपल्याला त्या सुविधा दिल्या पाहिजेत. तर त्या सुविधा आपल्याला देत नाहीत. तर मी पहिली आपल्याला विनंती करतो की नीलकंठ पोमण यांनी त्याचा खुलासा करावा. त्या सुविधा का देत नाहीत ते आपल्याला. आणि आपण त्यांना कमी दरामध्ये खोदण्याची परमिशन देतो. खोदायच्या परमिशन बाबत आम्ही जर त्यांना विचरायला गेलो की बाबा तू का खोदतोय तुला कुठल्या साईडची परमिशन आहे का मी हयाचा भाचा, मी त्याचा काका, मी त्याचा पुतण्या, असं सांगीतल जात त्यामुळे सन्मा. नगरसेवकांना शांत बसावे लागते. का असं करायचं. याच्याआधी महापालिकेत खोदाईची कामे झाले नाहीत का. महापालिकेत खोदाईची कामे झाली परंतु त्यावेळेस कोणाचा भाचा, कोणाचा पुतण्या, कोणाचा मामा या महापालिकेमध्ये काम करीत नव्हता. मग आता भाचा, पुतण्यांना जर काम करायच असेल तर आम्ही

नगरसेवक घरी बसतो. भाचा, पुतण्यांनाच सभागृह चालवू दया ना. आम्ही का काम करायच या महापालिकेमध्ये. काय झालं तरी अधिका-यांना दम. अधिका-यांना कुठल्या दम दिला की एक एक दिवसामध्ये मंजुरी घेऊन त्यांचे अधिका-यांची बदली करता. का काम करायची अधिका-यांनी. नगरसेवकांचे कोण ऐकतय. भाचा, पुतण्यांचे ऐकायला इथ सगळे जण बसलेत. आमचं ऐकायला कोणी नाही या महापालिकेत मा. महापौर साहेब. मी आपणांस विनंती करतो की हे जे आपणांस सांगितलय याचा आपण गांभिर्याने विचार करावा. आणि हे जे कोण रिलायन्स असतील, व्होडाफोन असेल, एअरटेल असेल शासनाने, केंद्र सरकारने महापौर साहेब जे धोरण ठरवून दिलेय त्या धोरणाची अंमलबजावणी करावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

**मा. निता पाडाळे -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक. सन्मा. सभागृह. मा. महापौर साहेब, माझी एक आपल्याला विनंती आहे की गेल्यावर्षी काळेवाडीमध्ये व्होडा फोनवाल्यांनी रस्ता खोदलेला आहे तर अजूनही दुरुस्ती झालेली नाही तर अशावेळी काय करायचं. ज्यावेळेस जाधव साहेब आयुक्त होते त्यावेळेस सुध्दा असाच विषय आला होता. आयुक्त साहेबांनी त्यावेळेस मला वाटत की जनरल बॉडीमध्ये सांगितल होतं की ज्या वॉर्डात जेवढी खोदकाम होतील आणि त्याचे पैसे आपण त्या रिलायन्स, व्होडा फोनवाल्यांकडून घेऊ. त्या वॉर्डात त्याचं सेपरेट असं टेंडर काढले जाईल. परंतु मला असं काहीच दिसत नाही की टेंडर काढलेले आहे. तर महापौर साहेब, माझी आपल्याला एक विनंती आहे की आपण ही जी सेवा आहे आता रिलायन्स, जिओ वगैरे ही सेवा अत्यावश्यक सेवेत येते की नाही याचा पहिला अधिका-यांनी खुलासा करावा. जर अत्यावश्यक सेवेत येत असेल तर आपण त्यांना फक्त जुन, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबरपर्यंतच परवानगी देणार का. त्यांची अत्यावश्यक सेवा असेल तर आपल्याला कधी पण परवानगी दयावी लागेल. असं मला तरी इथं वाटतयं. दुसरी गोष्ट म्हणजे आपण त्यांच्याकडून जे पैसे भरुन घेतो तर ते पैसे आपण त्यांनी जेवढं खोदलय तेवढेच भरुन घेतो का, इथ बसलेले आपले अधिकारी मॅनेज होऊन दोन किलोमीटर खोदले असेल तर दिड किलोमीटरचेच पैसे पालिकेत येतात बाकीचे अर्धा किलोमीटरचे पैसे जातात कुठे याचा पण आपण खुलासा करावा. प्रत्येक ठिकाणी आपला जे.ई. मोजतो का साहेब, मोजत नाही. फक्त सगळं कागदोपत्री चाललेले असतं. कागदी घोडे इकडचे तिकडे नाचविले जातात परंतु तिथं वास्तविक पाहता आपल्या जे.ई.ला सुध्दा माहीत नसतं त्यांनी

नक्की किती खोदलय. जे.ई. आपला अंदाजे फक्त सांगतो आणि मध्येच मॅनेज होऊन पाकीटे जे.ई.च्या खिशात जातात आणि ते सगळ अशा प्रकारे मॅनेज व्हायच चाललेले असते. आयुक्त साहेब, माझी आपल्याला अजून एक विनंती आहे. हा विषय तर खरच खूप चांगला आहे. तुम्ही चांगल धोरण निश्चित केलेले आहे. परंतु आपल्याला त्याच्यातून पालिकेच्या उत्पन्नाचा स्त्रोत सुध्दा आहे. पण आपण फक्त एक काळजीपूर्वक लक्ष ठेवून नक्की तेवढे पैसे कार्पोरेशनला भेटतात का याच्याकडे जास्त लक्ष दयावे आणि प्रत्येक वॉर्डाचा जो इथ विषय चाललेला आहे की खोदकाम, खोदकाम पण आपण जर त्यांनी खोदल्याच्यानंतर पैसे भरलेले असतात तर त्याच्यातून आपण त्या वॉर्डामध्ये एक महिन्याच्या आतच काम केले तर इथं मला वाटत नाही की सभागृहातले कोणतेच नगरसदस्य आरडाओरडा करतील तरी आपण हयाच्याकडे लक्ष दयावे थांबते, धन्यवाद.

**मा. ज्ञानदेव थोरात -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक. सन्मा. सभागृह. हा विषय अत्यंत चांगला आहे. तुम्ही बघितले असेल की बॉम्बे-पुणे रोडला सुध्दा खोदकाम होते. ते खोदकाम करीत असताना नक्की किती होत, काय होतं. आता सन्मा. सदस्यांनी सुध्दा सांगितलं. हा विषय शहराच्या दृष्टीने फार महत्वाचा आहे. आपल्या शहराबाबत आताच अंबरनाथ कांबळेंनी सांगितलं की पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे एक वेगळया दृष्टीने पाहिले जाते. एक आदर्श महानगरपालिका म्हणून या पालिकेकडे पाहिले जाते. इथला कामगारवर्ग असेल, व्यापारीवर्ग असेल, वेगळया दृष्टीने शहरामध्ये येतो आणि त्याचा उदयोग व्यवसाय करतो आणि त्याची चांगली भरभराट होते. आता यावर्षी कामे झालेली आहेत. परंतु रोजची कामे होत असताना जे खोदकाम होते. कुठल्याही हयाच असेल तर ते होताना एक्च्यूअली नक्की किती आहे हे पण कळत नाही. आणि जो खोदकाम करतो त्या कॉन्ट्रॅक्टदाराने तिथं पाटी लावली पाहिजे. की माझ इथं एक किलोमीटर खोदकाम आहे, अर्धा किलोमीटर आहे. आणि जस सन्मा. सचिन चिखलेंनी सांगितल की तिथं ज्या पाईप लाईन येतात, किंवा केबल येतात त्याचा कुठलाही विचार न करता ते तोडतात. आणि ती पाईप लाईन तुटली की ती परत आपल्या पालिकेच्या खर्चातून केली जाते आणि काम त्यांचे होते. आपला तिथला विदयमान नगरसेवक असेल एखादया ठिकाणी पाणीपुरवठा बंद झाला असेलतर तो आपल्या अधिका-याला सांगतो. तो खर्च आपल्या पालिकेच्या खर्चातून होतो. तर माझी एक रिक्वेस्ट आहे तुम्हाला की त्या खोदकाम करणा-याने तिथं एक बॅनर लावला

पाहिजे, पाटी लावली पाहिजे. की माझ  हे खोदकाम किती होणार आहे. आपण आता एक मुद्दा इथं मांडला आहे की खोदकामाला परवानगी देताना आपण दुरुस्तीसाठी २५ टक्के रक्कम अनामत म्हणून घेणार आहोत. माझ्या मते तर एक रुपया खर्च येत असेल दुरुस्तीला आणि जर आपण त्यांच्याकडून २५ पैसे  घेत असेल तर तो दुरुस्त करुन देईल का. चालढकल करेल किंवा बुडवेल. तर माझं मत आहे की अनामत रक्कम म्हणून ५० टक्के घ्यावे.  म्हणजे त्या कॉन्ट्रॅक्टदारावर दबाव येईल आणि तो झालेले काम लगेच पटकन करेन तरी ही माझी अशी सूचना आहे, रिक्वेस्ट आहे. २५ टक्केचे जागेवर तुम्ही ५० टक्के करावे. आणि जे खोदकाम चालतं त्याला एक नियम करावा आणि त्या नियमात दुसरी एक सूचना करतो की प्रायव्हेट सेक्टरमध्ये असं होतं की आपली एक पाण्याची  पाईप लाईन असते. अंतर्गत रोडला काही नाही पण बॉम्बे-पुणे रोडला, नाशिक रोड आहे या नाशिक रोडला आपण साईडला एक पाईप लाईन अशी करावी त्या पाईप लाईनमधून  येणारे नंतर जे चेंज होते त्याच्यामध्ये टाकून दयावे कायमस्वरुपी. आणि त्याला चेंबर सिस्टीम करावी म्हणजे जेणेकरुन भविष्यामध्ये  ते खोदकाम होणार नाही. त्या पाईप लाईनमधून या सगळया वायर असतील त्या येतील. म्हणजे वारंवार होणारे आपले खोदकाम टळेल आणि रोडची खराबी सुध्दा होणार नाही. एकदा रोड खोदला की जरी पॅचअप दिला तरी तो पॅचच असतोना त्याच्या शेजारुन रस्ता खराब व्हायला सुरुवात होते. आणि त्यामुळे पिंपरी चिंचवडमध्ये येणा-या मोठया रोडच नुकसान होतं. येणेकरुन ते खड्डे पडतात. कालच कासारवाडीमध्ये खड्डा पडला त्याच्यात सुध्दा एक अपघात झाला तर ते होऊ नये म्हणून माझी रिक्वेस्ट आहे की कायमस्वरुपी आपल्याला पाईपलाईन टाकून येणा-या नंतरच्या या सुधारणा आहेत त्या पाईपलाईनद्वारे कशा करता येतील त्याच्यावर विचार करावा, धन्यवाद.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक. सन्मा. सभागृह खरतर केबल या विषयासंदर्भात मी गेली पाच वर्षापुर्वी याच सभागृहामध्ये लेखी स्वरुपामध्ये प्रश्न उपस्थित केलेले होता. हा प्रश्न सातत्याने २२ ते २५ वर्षापासून या सभागृहामध्ये अतिशय गंभीरपणे चर्चिला जातो. आणि त्याच गांभीर्य त्या सभेपुरतेच मर्यादित राहते. नंतर मात्र प्रशासन आपल्या नियमानुसार म्हणजे त्यांच्या नियमानुसार त्यांना आवडणा-या गोष्टीनुसार, सवयीनुसार काम सातत्याने त्याच पध्दतीने आपण कितीही ओरडलो तरी त्याच पध्दतीने चालू असते. कोणताही व्यवसाय हा जेव्हा गुन्हेगारी पध्दतीने केला जातो त्याला

माफीया असा शब्द संबोधला जातो. आम्ही वर्तमानपत्रामध्ये वाचतो की वाळू माफीया आहे, भूमाफीया आहे तसं केबल माफीया पण आहे. केबल माफीया हा इतका जबरदस्त याच्यामध्ये व्यवसाय आहे. निलेश बारणेंनी व्यक्त केलेल्या भावनांशी मी निश्चित काही गोष्टींशी सहमत आहे. भाचे, पुतणे यासंदर्भात नाही पण त्यांच्या शब्दांशी मी सहमत आहे. राजकारणामध्ये भाचे, पुतण्याचेच दिवस असणार. व्यवसायामध्ये पण असतात. परंतु ते कशा पध्दतीने करतात, कृतीने करतात की गुन्हेगारी पध्दतीने करतात. याच संशोधन घेण्याचा मी देखील अनेक वर्षे सातत्याने प्रयत्न करीत आहे. अधिकारी इतके जबरदस्त ताकदीचे आहेत की कसं योग्य आहे ते कागदावर इतक चांगल्या पध्दतीने रेखाटतात. कोणत्याही नगरसेवकांने जर त्याठिकाणी प्रश्न विचारला तर अतिशय शुध्द गंगेत बुडविल्याप्रमाणे प्रयत्न करुन त्यांना बरोबर सांगतात. हयांना कुठेतरी इथ जवळपास गंगा नदी असती ना खरच बुडविले असते. पवना नदीत तरी नेले पाहिजे. हया परिस्थितीमध्ये नीट गांभर्याने हा विषय घ्या. याठिकाणी पाडाळेताईंनी अतिशय चांगल्या पध्दतीने त्यांच मत मांडल, बरोबर आहे. १०० टक्के बरोबर आहे ताई तुमचं. दोन किलोमीटरची परवानगी घेतात. आता जर अधिका-यांना चॅलेंज असेल तर आता माझ्याबरोबर चला. एक तर मी राजकीय जीवनाचा ताबडतोब राजीनामा देईन नाहीतर त्यांनी तरी राजीनामा दयायचा. चला आता माझ्याबरोबर. कोणी किती केबलची परवानगी घेतलेली आहे आणि कोणत्या पध्दतीने घेतलेली आहे. आणि लेखी स्वरुपामध्ये किती आहे. पाच पाच किलोमीटर ४५ लाख रुपये मारतात ही लोकं, हे पैसे कुठे जातात. योजना आणल्यात, नियम आणलेत. नियमावली आम्ही थोडीही बनवतो. अधिकारी आणतात आणि आपण ते बरोबर आहे म्हणतो. ही काही जगातील सगळयात कौतुकास्पद गोष्ट नाही आणलेली. नियमावली आपणच कोण तरी आणत अशा पध्दतीने. सगळं पार ते जिओचे काम ते. नुसतं जिओ और जिने दो. नुसतं जिओच चाललेले आहे. आख्खं वाटोळं झाल्यानंतर आता विषय आणलेला आहे. सगळी खोदाई झालेली आहे. आख्खं वाटोळं झालेले आहे शहराचे. खड्डे बुजवा नंतर सेल्फी काढा ते बरोबर आहे. मेल्यानंतर ही चर्चा करण्यात काय अर्थ आहे. हे सातत्याने चालू आहे. याठिकाणी केबल माफिया आहे आणि जो कोण माफिया असेल मी व्यक्त केल्याबद्दल त्याला शंका असेल तर मी कुठे पण भेटायला तयार आहे. कारण का माझी भागीदारीच नाही त्याठिकाणी. या परिस्थितीचे भान प्रशासनाने घेतले पाहिजे. नगरसेवकांनी पण एकत्र राहिले पाहिजे. निलेश बारणे कोणत्या पक्षाचा आहे तो काय व्यक्त करतो त्यापेक्षा ते व्यक्त केलेले कोणत्याही

गोष्टीसाठी गांभीर्याने घेणे गरजेचे आहे, हे फार महत्वाचे आहे. सगळे नगरसेवक जर एकत्र झाले ना तर केबलवाले दिसणार पण नाहीत. मग बाकीचे तर सोडून दया कोण काम करतय काय काम करतयं. हयांना सोप्या पध्दतीने कमी वेळेत जास्त पैसा कमवायचा असेल तर हाच मार्ग आहे. आणि म्हणून परिस्थितीचे भान मात्र प्रशासनाला नाही. प्रशासनाला काय करावे हेच सुचत नाही यांना ते शॉक असतात ना ते शॉक दिले पाहिजेत. हे सगळे शॉर्टसर्कीट झालेले आहेत. हयांची सगळी केबल उध्वस्त झालेली आहे. लीक झालेली आहे केबल यांची. हयांना सगळयांना महिन्यातून एकदा एकतर वाराणसीला किंवा कुठेतरी नेऊन डुबवून आणले पाहिजे साहेब. हे सगळे जागेवर राहतील. नगरसेवकांचा सन्मान करतील. नगरसेवकांनाच माहिती नसते. कधी कधी तर पहाटे तीनला उठून काम करीत असतात. किती झपाटयाने विकास चाललेला आहे बघा. पहाटे काही लोकांना किती चांगली झोप लागलेली असते आणि हे रस्त्यावर असतात आणि हया परिस्थितीमध्ये हे चाललेले आहे. मी हे सगळं नगरसेवकांसाठी बोलत आहे. अधिका-यांना काही फरक पडत नाही. कारण त्यांची दुकाने चाललेली असतात. कुणाचा तरी फोन येतो. फोनची सुध्दा वर्गवारी असते. जस प्राण्यामध्ये गाढव, खेचर आणि घोडा तसे माणसाच्या वर्गवारीनुसार ते ऐकतात. त्यामुळे हया सगळया परिस्थितीचे भान ठेवून ब-याच वेळेला आम्ही इतके जोरात बोलत असतो आमचच काय चाललय हेच कळत नाही. हया सगळया गोष्टी आयुक्त साहेब, जरा गांभीर्याने घ्या. एक दिवशी उद्रेक होतो. एखादया विचाराचा उद्रेक झाला ना, आम्ही सोडून दया आम्हाला मतांचं राजकारण करायचं. हे बसता बसता कुठेही कार्यक्रम करतील. कुठे कुठे घडलय कुठे कुठे काय चालल आहे. कुठेही खोदतात, बीनधास्त खोदतात. कोणीही विचारत नाही, यांना मालकच नाही कोणी. कोण मालक आहेत हयांचे शोधा म्हणायला लागेल, जसं खडडा शोधायला लागेल. मालक कोण यांचे. प्रचंड व्यवहार आहेत यांचे. आणि आता भाषणे भिषणे करुन हयांचा सगळयांचा कार्यक्रम झालेला आहे. अधिका-यांचा कार्यक्रम झालेला आहे. हयांची येणारी दिवाळी अगोदरच झालेली आहे. त्यामुळे या सगळया परिस्थितीमध्ये गांभीर्याने घ्या. आणि नगरसेवकांची पण एनओसी घ्या. त्यांना आनंद होईल वा वा काय सुंदर खड्डा आहे. त्याला तर त्यातले काहीच कळत नाही. हया सगळया परिस्थितीमध्ये चांगली संकल्पना आहे. यादी पण खूप चांगली आहे. पण त्याच्यामध्ये एकच घ्या की नगरसेवकांची एनओसी घेतल्याशिवाय परवानगी मिळणार नाही. एवढीच मागणी करतो. थांबतो. उपसूचना घ्या,

उपसूचना काय पूर्वी तानाजी मांडायचे आता संताजी, धनाजी तयार झाले आहेत. ढाके संताजी आणि मडिगेरी धनाजी. आमची उपसूचना घ्या बाबा.

**मा.मंगला कदम -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. सभागृह. टीव्ही चालू केला की खड्डेच खड्डे. सगळीकडे खड्डे. आता गाणी पण खड्डयावर यायला लागली आहेत. आज मराठी ॲक्टर्स सगळे गाणी म्हणतात खड्डयावर. आख्या महाराष्ट्राची दुर्देशा. सगळे मराठी कलाकार टीव्हीवर खड्डयावर गाणी म्हणतात. पिंपरी चिंचवड शहरामध्ये कुठेही अशी दुर्देवी घटना घडू नये मुंबईमध्ये पाच अपघाती मृत्यू खड्डयांमुळे झालेले आहेत. मगाशी एक सहकारी सांगत होते त्यांनीही सांगितले की खड्डयामध्ये पडून किंवा अपघातामुळे मृत्यू झाला. मा. महापौर साहेब, आम्ही आता इथं खरच चर्चा करीत होतो. त्यावेळेला असंच बोलता बोलता निष्पन्न होत असतं की त्या दृष्टीकोणातून या सगळयांची खरतर सगळे जेवढे खडडे खोदणारे आहेत हयांची एक मिटींग लावा. म्हणजे रिलायन्स असेल, जिओ असेल, जेवढे केबलधारक आहेत. इंटरनेटचे जेवढे केबल टाकणारे आहेत नवीन असतील जुने असतील, तेवढया सगळयांची. त्याच्यानंतर आपला पाणीपुरवठा असेल, ड्रेनेज विभाग असेल, विदयुत असेल या सगळया अधिका-यांचे एक चांगल्या पध्दतीचे चार दिवसांचे चर्चासत्र घ्या. त्यांचे सगळे लोकं बोलवा. आणि एक तीन महिन्यांचा कार्यक्रम तुम्ही तीन वर्षातून एकदा आपण ज्यावेळेला रस्ते करतो त्यावेळेला तीन वर्षासाठी ते करतो. हया लोकांना तीन वर्षातून एकदा खड्डे खोदायची परवानगी दया. अशी कोणतीही ईमरजन्सी सेवा नाहीये खड्डयांची की तुम्ही आताच खोदले पाहिजे. रस्ता केल्यानंतर त्या रस्त्याचे लाईन तुम्ही कुठूनही मधून जर खोदले तर कुठूनही त्याचे लिकेज होऊ शकतं आणि रस्ता उखडू शकतो. आज शहरामध्ये कितीतरी ठिकाणी चर पडलेले आहेत. जिथे कुठेतरी कनेक्शन घेतले गेलेले आहे. आणि त्या चरीमध्ये खडडेच खडे मोठे खड्डे पडल्यामुळे आज ब-याचशा गाडया स्पीड ब्रेकरवरुन जातात. हे स्पीड ब्रेकर ॲटोमेटकली तयार झालेले आहेत. आणि महापौर साहेब या गोष्टीवर खरोखरच गांभीर्याने विचार केला गेला पाहिजे. की तुम्ही सर्व अधिकारी बसून ठरवा की आपण कोणत्या वर्षी ही सगळी कामे दयायची. मा. उपमहापौर होत्या त्यांना विचारा. त्यांना मी विचारले ताई अहो किती दिवस चाललंय हे काम. मी वॉर्डामध्ये एकदाच सर्व काम करुन घेतलयं. एमएनजीएलला सुध्दा त्यावेळेस बोलावून घेतले तू जर आता काम करणार असशील तर काम करुन घे. मी नंतर करुन देणार नाही. परंतु त्यांना

विचारा मी त्यांना म्हणले ताई एकदा तरी सांगा हो. एकदा २४X७ वाला खोदतोय, एकदा आमका केबलवाला खोदतोय. एकदा तमका केबलवाला खोदतोय  आणि कामाची नंतरची क्वॉलिटी काय आहे माहिती आहे का सिमेंट आणि खडी त्या माणसाने कोणी बुजवावयाचे त्याने बुजवायचे. त्याला क्वॉलिटी पण नाही की खडी एवढी वर येते की विचरायची सोय नाही तेंव्हा ते इतक बेकार काम. ते काम केलेले काय नाही केलेले काय त्याला काही अर्थच नाही. आणि मी असं सांगते महापौर साहेब आपण त्या खड्डयांसाठी पैसे भरुन घेतोना त्यावेळेला त्यांना असं सांगा की तुम्ही ते काम करायचं त्याच टेंडर त्यांनीच त्या कंपनीने काढायचे. आणि ते काम आपल्याला नीट करुन दयायच आणि त्याच्यावर आपल्या अधिका-यांची एक कमिटी ठेवा. साहेब, तुम्ही सांगितले आहेना तीन नंबरचा कॉलम आहे तो बघा. रस्ता खोदाईपोटी प्राप्त झालेले शुल्क त्याच क्षेत्रीय कार्यालयात क्षेत्रीय सेवा वाहिन्या टाकण्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते दुरुस्तीकामी वरील लेखाशिर्षकावर देणेत यावे. निताताईनी आता सांगितले ज्या वॉर्डामध्ये काम आहे त्याच वॉर्डाला ते पैसे मिळणारच नाहीत. सत्य परिस्थिती बघता त्या वॉर्डाला पैसे मिळणार नाहीत. कुठल्या दुस-याच प्रभागाकरीता त्या पैशाचा वापर केला जाईल. आणि म्हणून मला असं वाटतं की ज्याची खोदाई आहे त्याच माणसाला सांगायचे की तूच ते टेंडर काढायचे तूच आमची दुरुस्ती करुन दयायची. आपल्याकडे जेवढी आपल्या पध्दतीची रक्कम  आहे ती कार्पोरेशनने दयावी आणि विषय संपवावा. आणि आपल्या अधिका-यांनी  त्याच्यावर निरीक्षण करावे. आपल्या अधिका-यांची, नगरसेवकांची एनओसी घ्यावी की हे काम झालं म्हणून. गमतीचा भाग सोडून दया. भाऊसाहेबांनी आता सांगितल, हसायलापण आलं, हसायला केव्हा येते कारण खरोखरच अशी परिस्थिती होती की आता खरच सगळ संपलेले आहे, झालेले आहे आणि आता तो विषय आलेला आहे. म्हणून आपल्याला असं वाटतं की, तो सगळा विषय झालेला आहे, सगळं झालेलं आहे आणि आता विषय येऊन काय करणार तुम्ही.  पावसाळयात तुम्ही जेवढे रस्ते खोदाई केलेले आहेत. उखडायचे तेवढे उखडले आहेत. खरच महापौर साहेब, तुम्ही खंडोबा मंदीराच्या इथ येऊन बघा. माझ्या सहका-यांनी सांगितले की वैशालीताई सुध्दा आता त्या वॉर्डाच्या नगरसेविका आहेत. त्या पण बोलत होत्या, कॉर्नरला शेंडेकर इंडस्ट्रीजच्या तिथं. टाका ना मुरुम टाका, खडी टाका, रस्ता करा. कस कोण अडवत बघा बरं. लोकांना खाली उतरता येत नाही. एक चाक असं एक चाक असं. दोन फूट, दिड फूट रस्ता खाली गेलाय. नागरीकांनी गाडी तरी चालवावयाची कशी. गेली कित्येक वर्षे कोणाचा वाद आहे. वाद तो

वाद पण रस्त्यावरचा माणूस किंवा पिंपरी चिंचवड शहराचा नागरीक तिथं मृत्यूमुखी पडणार नाही हयाची तरी काळजी घेतली पाहिजे. आणि अशा माध्यमातून हा जो विषय आलेला आहे महापौर साहेब. दर वेळेला हा विषय येतो. निलेश बारणेंनी आताच नाही, तर पूर्वीही या विषयी सांगितल होतं. माफीयांच्या बाबतीत बोलण्यात आले की केबल आख्खी केबल एक माणसाने इतकी खोदून टाकली. आजपर्यंत आपण कधीही चौकशी केली नाही. म्हणजे याचा अर्थ सभागृहात काय हे. चौकशीचे आदेश दया ना तुम्ही. त्यांनी सांगितलं की पोमण साहेबांनी सांगीतल की मुंबई महापालिका देतात. आपल्याला का देत नाही. अहो दयायला पाहिजे. नुसत बोलण्यानंतर आज महापालिकेची अवस्था कशी आहे. आपल्याला बेनिफीट नकोय का. आपण उत्पन्नाचे स्त्रोत शोधत असतो. तर आपल्याला सुध्दा याठिकाणी त्यांच्या या ज्या गोष्टी मिळतात त्या मिळायला पाहिजेत. महापौर आदेश दया तुम्ही. की नुसत बोलून एखादा सदस्य ते सुध्दा आता सिनिअर झालेत. एखादा सदस्य बोलल्यानंतर त्याच्यावर कार्यवाही होत नाही. नुसते सभागृह चालवायचे आणि पुढे जायचे असं न करता हयाच्यावर चांगल्या पध्दतीने सोलूशन निघाले पाहिजे. आता बरेच दिवस झालेत परवा इथं ते दिलेले आहेत कॉलम. मागील दोन तीन वर्षापासूनच आलेला आहे की बाबा त्याचा व्हिडीओ रेकॉर्डींग काढा, त्याचे फोटो काढा. ते काम झाले की नाही ते बघा. त्या कॉलममध्ये तसेच दिलेले आहे परंतु या गोष्टीचा मा. महापौर साहेब, नुसतेच कागदावर हे विषय येवून उपयोग नाहीय हयाच्यावर कडक असं धोरण आखलं गेल पाहिजे. त्या दृष्टीकोनातून काम करावं अशीच मी विनंती करते. नाहीतर काय उपयोग होईल असं मला वाटत नाही.

**मा.राहुल कलाटे -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. सभागृह. गेली तासभर आदरनीय पिंपरी चिंचवड शहराचे मडिगेरी साहेबांनी जी पॉलीसी आणली आहे त्यावर आपण आभ्यासपुर्ण चर्चा केली. खरतर महापौर साहेब, मंगलाताईंनी सांगितल त्याप्रमाणे सर्व खोदाई संपलेनंतर पॉलिसी आली. मडिगेरी साहेब आपण पुर्ण अभ्यास करुन आणली की कोणाच्या आदेशावरुन आणली. कारण की ही पॉलिसी आणत असताना एका बाजूला आयुक्त साहेब यांनी आठ दिवसांपूर्वी प्रेस घेतली. त्या प्रेसमध्ये सांगितले की आपण शहरामध्ये ४१६ कोटीचे कामे करतो. त्यात १६० कोटीची फायबर ऑप्टीकची कामे करीत आहोत. आणि त्याच्यात तुम्ही डक करता. मडिगेरी साहेब एका बाजूला आयुक्त साहेब सांगतात की १७५ कोटीची डक करणार आणि दुसऱ्या बाजूला तुम्ही ही पॉलिसी आणताय. तर कुठेतरी हा विरोधाभास

आम्हा सर्व नगरसेवकांना समजून सांगा की आमच्या वॉर्डामध्ये खोदाईचे काम संपले आहे. आता काही तिथे तुम्ही  जास्त कोणी मध्ये पडू नका. महापौर साहेब, आपण जर हे पाहिलं तर तुम्ही मागच्या एका वर्षात १२७ परवानग्या दिल्यात. त्याच्यापोटी जवळजवळ २२५.५८ कोटी आहेत. त्यात बीएसएनएल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, खाजगी पाणीपुरवठा पकडून १२७ परवानग्या दिल्यात. त्यांची लांबी २२५ किलोमीटर आणि रक्कम घेतलीय १६५.४ कोटी. खोदाई हा आपल्या महापालिकेचा बिझनेस आहे काय. याचे पण क्लेरीफिकेशन या सभागृहाला पाहिजे. महापौर साहेब, हे अधिका-यांनी दिले गेले पाहीजे. म्हणजे एका बाजूला तुम्ही खोदताय. उदया लांडे साहेबांचे डोक चालेल की याच्यावर अजून कुठेतरी वर्गीकरण टाकतील. म्हणजे खोदाईपोटी २५० कोटी येणार. तेवढी शिल्लक राहणार. आणि ती हयाला देऊन टाका आजच.  कारण विषय सगळे तसेच आहेत. इकडे पैसे शिल्लक राहतील तिकडे देऊन टाकायचे. महापौर साहेब, आपण खोदाई करीत असताना एका बाजूला आयुक्त साहेब सांगतात की आम्ही तीन डक्ट करणार. एक खाजगी कंपनीला देणार आणि एक स्मार्ट सिटी फायबर ऑप्टीकला वापरणार. कुठेतरी आपण डक करणार म्हणतोय दुस-या बाजूला मडिगेरी साहेब अभ्यास करुनच एका बाजूला याचं पुर्ण धोरणचं ठरवा नां. तर हे धोरण ठरवित असताना तुम्ही शासनाच्या गाईडलाईन्स घेतल्या का तुम्ही राज्याच्या गाईडलाईन्स घेतल्या का सेंट्रलच्या घेतल्या. नाहीतर उदया असं होईल की तुम्ही परवानगी नाही दिली की ते तिकडनं घेऊन येतील. आता मला तर अशी माहिती मिळाली की रिलायन्सनं आता असं ठरविलं आहे की, तुम्ही खाली परवानगी देत नाहीना तर आम्ही वरुन वायरी नेतो. हयाची पॉलिसी काय आहे तर त्यांना पण कुठेतरी या धोरणामध्ये पाहिजे.  नाहीतर आपण करायचो खालच धोरण आणि परवानगी यायची वरुन. अधिका-यांना काय ते आपल्याला पटवून देणार, जस भाऊसाहेबांनी आता सांगितलं. ते म्हणणार नाही असं नाही तसं आहे. आणि जेव्हा नगरसेवकांना खरच माहिती पाहीजे असेल, खरी परिस्थिती काय आहे तर राजू मिसाळांना खाजगीत विचारा ते तुम्हांला सांगतील कारण ओपन ते बोलू शकणार नाहीत. निलेश बोलू शकतो भाचे आहेत, पुतणे आहेत. सगळे नाही ना बोलू शकत. जसं भाऊसाहेबांनी सांगितल. सध्या घोडयावरुनच फोन येतात अधिका-यांना. त्यात पेट्रोल, डिझेलचे दर वाढले आहेत ना. त्यामुळे घोडयांची पण क्रेझ पिंपरी चिंचवड शहरात वाढत चाललीय. कुठेतरी ही पॉलिसी तयार करीत असताना ही पॉलिसी शासनाला, राज्य शासनाला, उदया शासनाची जरी परवानगी आणली तरी या सभागृहाची पण परवानगी/मान्यता असू

दया. अशी एक काही तरी इथ उपसूचना दया. नाहीतर वरुन पॉलिसी आली, वरुन पॉलिसी आली. की तुम्ही खोदून दयाल महापौर साहेब. आज शहरामध्ये १६५ कोटी भरुन घेतले असताना २५० किलोमीटरचे रस्ते आपण खोदले तर किती खड्डे पडले. अक्षरश: शहरातील खड्डयांची इतकी अवस्था झालीय की त्या खड्डयामध्ये पडून कोणी गेले तर जबाबदारी कोण घेणार. आणि मी तर म्हणतो की जो अधिकारी परवानगी देईल महापौर साहेब, मडिगेरी साहेब ते पण त्यात ॲड करा की ज्या अधिका-याच्या सहीने परवानगी दिली त्याच्यावर पण गुन्हे दाखल करा. महापालिकेबरोबर करण्याबरोबर पर्सनली त्या अधिका-याला घ्या. काय होतं, परवानगी देतात मडिगेरी साहेब उदया येतात राहुल कलाटे. ते जायचे आतमध्ये. असं नको व्हायला ना. कुठेतरी त्या अधिका-याचे त्या पॉलीसीमध्ये रोल डीफाईन करा. आयुक्त साहेब, आष्टीकर साहेब. नाहीतर आष्टीकर साहेब म्हणतील मी सांगतो आयुक्त साहेबांना. नाहीतर आपल्या चर्चेला काहीच अर्थ राहणार नाही. महापौरांच्या वॉर्डामध्ये पण भरपूर खोदाई चालली आहे. महापौर हे माहिती आहे का आपल्याला. नाहीतर महापौर आतून दु:खी असायाचे त्यांनाही काही बोलता नाही यायचं. त्यामुळे खरचं महापौर साहेब मंगलाताई म्हणतात त्याप्रमाणे तुम्ही चौकशी लावा. कुठेतरी प्रत्येक नगरसेवकांच्या मनामध्ये खदखद आहे. भाऊसाहेबांनी म्हणल्याप्रमाणे कोणीही पुरावा देत नाही. विचाराना त्यांना जो तो आपआपल्या प्रभागाचे पाहतो. सगळे काही तुमच्याआमच्या सारखे जमीनदार नाहीत. प्रत्येकाला विचारले तर ते म्हणतात की अधिका-यांचीच नुसती दिवाळी होत आहे. बरोबर आहे ना भाऊसाहेब कुठेतरी प्रभागातील त्या खोदाईचे पैसे त्याच वॉर्डामध्ये एखादे हेड करुन, मडिगेरी साहेब ते पण ॲड करा. त्या प्रभागात हेड करुन तो पैसा त्याच ठिकाणी ठेवला पाहिजे. पूर्वी आपण अशी मागणी केली होती की टीडीआरचे जे पैसे येतात ते त्याच प्रभागामध्ये खर्च करा. त्यावेळेस लांडे साहेब नव्हते आता लांडेसाहेब आहेत. ज्या त्या प्रभागातले खड्डे खोदाई साठीचा मिळालेला महसूल त्याच प्रभागामध्ये खर्च करा अशी मी एक याठिकाणी आपल्याला दुरुस्ती/ ॲड करायला याठिकाणी सुचवितो. आणि ही पॉलिसी होत असताना महापौर साहेब, अजून एक आपल्याला विनंती करतो. मडिगेरी साहेबांबरोबर आजच तज्ञ लोक घ्या. नाहीतर उदया काय होईल या पॉलिसीचे श्रेय त्यांना जाईल. एक तर सगळी खोदाई संपली आणि त्यानंतर ही पॉलिसी आली. हयाच्या बरोबर तुम्ही शासनाचा, राज्य शासनाचा, केंद्र शासनाचा याच्यामध्ये अंतर्भाव करा. या शहराचे चांगले अधिकारी चांगले म्हणजे टेक्निकली चांगले अधिकारी त्यांचाही त्यात अंतर्भाव करा. या सभागृहामध्ये

भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले. मंगलाताईंनी सांगितले. आता मी सांगितले. अजित गव्हाणेनीं जे सांगितले, अश्विनी ताईंनी जे सांगितलं या सगळया गोष्टींचा उपसूचनामार्फत अंतर्भाव करा. नाहीतर काय होईल एकतर हाल्ली सगळे गाववाले खोदायला लागले आहेत. त्यामुळे आम्हाला कोणाला काय बोलता येत नाही. गावावाल्यांना काही काम नव्हती ती आता त्यांनी अंगावर खोदाई घेतलेली आहेत. आता सगळेच पाहुणेरावळे एक असल्यामुळे आम्ही काही कुठल्या भाच्या, पुतण्याची नावे सांगणार नाही. आमच्याकडे रेकॉर्डींग पण आहे ये, सांगीतलनां भाचा आहे. ही खोदाई झाली पाहिजे. ही पॉलिसी केली तर ती पॉलीसी अशी करा उदया कोणीही येऊ दया काय होत रिलायन्सवाला राहतो बाजूला. खोदणारे दुसरेच असतात काय बोलणार त्याला आपण. तुम्ही ज्या ठिकाणी खोदत असता त्याठिकाणी संबंधित कंपनीचा जो कोणी असेल कळू दया ना कोण खोदतय. नाहीतर पूर्वी काय व्हायचं काही बोलता येत नाही. आणि आता नात्यात काही बोलता येत नाही. महापौर साहेब, एक वर्षभरामध्ये १२७ परवानग्या दिलेल्या आहेत. २५० किलोमीटरची खोदाई केली आहे. ते म्हणतात ना "ज्ञाना रचिला पाया तूका झालास कळस". तसं झाले आहे. राष्ट्रवादीने रचला पाया बीजेपीने कळस करुन टाकला आहे. एका वर्षात सव्वाशे परवानग्या, २५० किलोमीटरची खोदाई केली आहे. सांगाबर एखादया नगरसेवकांनी की माझ्या प्रभागामध्ये एवढ खोदलय. आणि हयाच्यामध्ये एक दुसरी गंमत मी एक परवानगी काढली, मे. रिलायन्स जिओ इन्फोटेक लि., प्राईम व्हेन्चर, वाकड चौक १०० मीटर. असं ब-याच ठिकाणी आहे. आष्टीकर साहेब संशोधनाचा विषय आहे. सगळयांच्या परवानग्या आहेत. हे अंतर कसं मोजलय साहेब. विशाल नगर ते प्रोटोन पॉवर कंट्रोल २५० मीटर, पिंपळे निलख ते गणेश मंदीर ३५० मीटर. हे अंतर कशाने मोजले आहे. महापौर साहेब, या पॉलिसीमध्ये जो अधिकारी परवानगी देईल ना त्या अधिका-याला पर्सनली घ्या. नाही तर तो जातो बदलून. आपण दुस-यावर धपाटे मारत बसण्यापेक्षा अशा ज्या काही सुचना सर्वांनी सभागृहामध्ये सुचविल्या आहेत त्याचा अंतर्भाव करावा राज्य शासनाच्या, केंद्र शासनाच्या काही गाईडलाईन्स असतील त्या घ्याव्यात. मडिगेरींसारखे अजून काही तज्ञ लोक या क्षेत्रामधील आहेत त्यांचा अंतर्भाव करावा. पुन्हा एकदा ही पॉलिसी फायनल करुन या सभागृहापूढे आणावी आणि वरची पण आणावी. नाहीतर जमिनीतूल खोदायचे धोरण करायचो आणि वायर वरुन जायच्या असं याठिकाणी व्हायला नको.

**मा.नामदेव ढाके** - मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक. सन्मा. सभागृह खर म्हणजे खोदाईच्या धोरणामधल याठिकाणी पूर्वीचे जे धोरण होते. आणि आता आपल्या सदस्यांनी विलास मडिगेरी आणि सागर आंगोळकर यांनी स्थायी समितीमध्ये हे धोरण याठिकाणी मंजुर केले. माझ्या माहितीनुसार गेल्या दहा महिन्यांमध्ये आमचे सन्मा. सदस्य विलासभाऊ मडिगेरी जे पूर्वी एखादया रस्त्याच्या खोदाईचे काम घेतलं आणि आपलं मंजुरी किती असते आणि त्याच एक्चूयल काम किती करीत होता. त्या संदर्भामध्ये सन्मा. विलासभाऊ मडिगेरी यांनी गेल्या पाचसहा वर्षामधली माहिती याठिकाणी घेतली. आणि मला असं वाटत की जे धोरण याठिकाणी या खोदाईच्या संदर्भामध्ये आणलेले आहे. बरेच सन्मा. सदस्य या सभागृहामध्ये बोलले. आणि या विषयामध्ये जर का आपण बघितल तर धोरणामध्ये १० मुद्दे आणि अटीमध्ये १० मुद्दे म्हणजे प्रत्येक एक एक मुद्दा जर आपण या ठिकाणी बघितला तर ज्यांनी ज्यांनी याठिकाणी शंका उपस्थित केलेल्या आहेत. मला असं वाटत की या संपुर्ण धोरणामध्ये जे काही विषय जास्तीत जास्त विलासभाऊ मडिगेरी आणि त्यांनी घेतलेले आहेत. खर म्हणजे या सदस्यांचे याठिकाणी कौतुक केले पाहिजे कारण जर का आपण पूर्वी एखादया ठेकेदाराने रस्ता खोदला किंवा त्याने काम घेतलं आणि जर का त्याठिकाणी काम केल्याच्यानंतर महानगरपालिकेला तो किती रक्क्म भरीत होता. या संदर्भामध्ये सुध्दा मागच्या काळामध्ये आणि आताच्या या धोरणानंतर या महानगरपालिकेला किती फायदा होणार आहे. मला असं वाटत की या महानगरपालिकेच्या तिजोरीमध्ये या खोदाईच्या धोरणाच्या माध्यमातून जे काही पैसे जमा केले जाणार आहेत. त्यामध्ये जे काही वाढीव खोदाईच्या संदर्भामध्ये दंडाची रक्कम असेल ती दुप्पट करणे असेल. मगाशी माझ्या सहका-यांनी याठिकाणी उल्लेख केला की त्या खोदणा-या ठेकेदारावरती आणि त्या संबंधित अधिका-यावरती याठिकाणी गुन्हा दाखल व्हायला पाहिजे आणि मला असं वाटत की त्या संदर्भामध्ये या धोरणामध्ये हा मुद्दा त्यांनी नक्की केलेला आहे. दुरुस्तीच्या पोटी जे काही २५ टक्के अनामत रक्कम या ठिकाणी ठेकेदाराच्याकडून घेतली जाते. त्याचा सुध्दा या ठिकाणी त्या धोरणामध्ये उल्लेख केलेला आहे. एकूणच आपण जर का बघितल असेल तर खर म्हणजे हे धोरण आहे गेल्या वर्षभराच्या काळामध्ये आपल्या महानगरपालिकेला गेल्या अनेक वर्षापासून म्हणजे आता गेल्या एक वर्षभरामध्ये फक्त एक वर्षामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सेवा वाहिन्या किंवा खोदण्याचे काम याठिकाणी चालू आहे अस काही नाही. मागच्या कालखंडामध्ये सुध्दा गेल्या पाच-सात वर्षाच्या कालखंडामध्ये जर का आपण

बघितल तर अनेक ठिकाणी रस्ते खोदले गेले अनेक ठिकाणी सेवावाहिन्या टाकल्या गेल्या. अगदी आम्ही २०१७ च्या निवडणुकीच्या अगोदर जर का बघितलं तर त्यावेळेस सुध्दा रिलायन्स कंपनीचे काम आमच्या प्रभागामध्ये चालू होतं. त्यावेळेला आम्ही सुध्दा बघितल की त्यावेळेस रिलायन्सचा जो काही ठेकेदार त्याठिकाणी खोदतो आणि ते जे काही बुजविण्याचे काम करतो आणि बुजवून गेल्याच्यानंतर सेवावाहिन्या किंवा त्याठिकाणच्या विदयुतच्या तारा, एखादयाचे कनेक्शन, पाण्याची पाईप लाईन किंवा एमएसईबीच्या कनेक्शन त्याठिकाणी तोडण्याचे काम होत होतं. आणि मला असे वाटत की या धोरणाच्या माध्यमातून म्हणजे कुठेतरी चुकीचे काम होणार नाही. आणि चुकीचं सुध्दा या धोरणामध्ये उल्लेख केलेला आहे. आणि मगाशी मी सांगितल जर आपण हा पाचवा मुद्दा एचडीडी चा आहे Horizontal Direction Drill पध्दतीचं. पूर्वीच्या काळामध्ये १० किलोमीटरला १५ लाख रुपयांचा गोंधळ होता. आपण हे खोदाई करण्याचे काम आम्ही गेल्या अनेक महिन्यापासून याठिकाणी माहिती जमा केली आणि खोदण्याचे किलोमीटर एक किलोमीटरला परमिशन असायची. आणि ती अंडर एचडीडी च्या माध्यमातून घेतलेली असायची. आणि खोदाई मात्र ओपन पध्दतीने याठिकाणी केली जायची. एक अर्थाने महानगरपालिकेकडे येणारी जी काही रक्कम त्यांच याठिकाणी नुकसान होत होतं आणि ख-या अर्थाने या धोरणाच्या माध्यमातून या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये सुध्दा या धोरणाच्या माध्यमातून काही अंशी याठिकाणी फायदा होणार आहे असं मला वाटतय. मगाशी आमचे सहकारी सिनियर सदस्य आहेत भाऊसाहेब भोईर यांनी याठिकाणी उल्लेख केला आणि तात्या खरंच आहे संताजी-धनाजीची याठिकाणी तुम्ही आम्हाला उपमा दिली असेल. परंतु संताजी आणि धनाजींनीच शिवाजी महाराजांना याठिकाणी विजय मिळवून दिलेला आहे. त्या पध्दतीने या सभागृहामध्ये आम्ही सर्व सदस्यांच्यासाठी या ठिकाणी उपसूचना दयायची किंवा जे काही काम करायच असेल ते काम आम्ही करतोय. शिवाजी महाराजांसाठी म्हणजे सर्व सदस्यांसाठी याठिकाणी उपसूचना किंवा या पिंपरी चिंचवडचा विकास लक्षात घेता सर्व विभागांमध्ये याठिकाणी सगळयांना समतोल करण्याचे काम याठिकाणी विलासभाऊ असतील आम्ही असेल याठिकाणी केलेले आहे असं मला याठिकाणी वाटतं आणि खरच मगाशी आपण उल्लेख केला की पाच वर्षापासून मी खोदाईच्या संदर्भामध्ये करतोय. परंतु असं धोरण आज याठिकाणी महापालिकेच्या सभेसमोर येतय. असं धोरण जर का पाच वर्षापूर्वी आपण सत्तेमध्ये होता त्यावेळेला जर का याठिकाणी आणल असत तर मोठया प्रमाणामध्ये या

महानगरपालिकेला फायदा झाला असता असं याठिकाणी मला वाटतं. एकूणच या खोदाई धोरणाच्या माध्यमातून जस आपण केबल माफियांच्याबद्दल बोलला मला असं वाटत की लूट करणारे या खोदाई धोरणाच्या मागे जे कोणी कलाकार होते. त्यांना थांबविण्याचे काम याठिकाणी विलासभाऊ मडिगेरी आणि सागर आंगोळकर यांनी केलेले आहे. त्यांचे मी याठिकाणी अभिनंदन करतो. करणारे ज्या पध्दतीने सांगितलं. राहुलदादा याच्यामध्ये शुटींगचे काम आहे. शुटींग केल्यानंतर तरी आपल्याला दिसणार आहे ना तो काय काम करतोय आणि म्हणून येणा-या काळामध्ये सुध्दा अशाच पध्दतीचे धोरण येणार आहे. मग त्यामध्ये कोण माफिया, कोण काम करतय हे सर्व याठिकाणी उभे होतील आणि याठिकाणी जे काही धोरण विलासभाऊ आणि त्यांच्या सहका-यांनी आणलेले आहे. मी दोन्ही सदस्यांचे याठिकाणी अभिनंदन करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.जावेद शेख -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक. सन्मा. सभागृह ढाके साहेब आपण आता जे बोलला, फार चांगल्या पध्दतीने रिलायन्सवाल्यांनी, व्होडाफोनवाल्यांनी कामे केली. कदाचित तुमच्या भागामध्ये केली असतील. मी नाही म्हणणार नाही. कारण आमच्या भागामध्ये काम करीत असताना व्होडाफोनने ज्या पध्दतीने काम केले एकतर फोनवर त्यांचा फालोअप करुन करुन आम्ही वैतागयायचो आणि त्यांच्या घाईगडबडीमध्ये त्यांनी जे उखडलेले खड्डे आहेत काही ठिकाणी ब्लॉक बसविले किंवा काही ठिकाणी डांबर टाकले. तुम्ही आज येऊन तिथली परिस्थिती बघा. सगळे खड्डे पडलेले आहेत. दुकानदारांच्या दुकानासमोर पाण्याचा खडडा झाला आहे. वाकडतिकडं झाले आहे. म्हणजे जे काही आपण करारनाम्यामध्ये करतोय. की त्यांनी कुठल्या पध्दतीने केले पाहिजे. त्या पध्दतीने त्यांनी अजिबात केलेले नाही. उलट महापालिकेचे याच्यामध्ये नुकसान होणार आहे. डबल पध्दतीने आता परत काम करावे लागणार आहे. दुस-या ठेकेदारांकडून आम्हांला काही काही ठिकाणच डबल पध्दतीने काम करावे लागणार आहे. आणि महापौर साहेब, महत्वाचे सांगायचय तुम्हाला या खडडयाच्या विषयाबद्दल की आपण २४X७ मध्ये पाण्याचे कनेक्शन देण्याचे काम सुरु केलेले आहे. याच्यामध्ये ठेकेदारांकडून इतकी दिरंगाई होती इतकी दिरंगाई होती खड्डे बुजविण्याची की विचारू नका. एक्चूयली २४X७ मध्ये आपण कनेक्शन देतो. याच्यानंतर एवढा जो चौकोनी ब्लॉक असेल किंवा काय असेल तो जर उकरून काढला असेल आणि तो उकरुन काढलेनंतर तो रिपेअर करायचा असतो तर त्यांची माणसे लवकर रिपेअर

करायला येत नाहीत. त्यांच्या डोक्यात कस आहे की जर आज खड्डा केला तर उदया बुजवावयाला पाहिजे. जोपर्यंत त्यांचे टारगेट पुर्ण होत नाही तोपर्यंत त्यांचा माणूस रिपेयर करायला येत नाही. आणि या माध्यमातून नागरीकांचे फोन येऊन येऊन आम्ही इतके वैतागून जातो. आयुक्त साहेब, शेवटी ते काम आम्हाला स्थापत्याकडून करुन घ्यायला लागले. अशी किती तरी उदाहरणे आहेत. वाटलेच तर आयुक्त साहेब तुम्ही एक स्पेशल अधिकारी नेमा त्याच्यावर आणि त्यांना माझ्याबरोबर पाठवा. तुम्हाला मी दाखवितो की २४X७ चे जे ठेकेदार होते त्यांची कितीतरी कामे आपल्या स्थापत्य विभागाकडून आम्ही करुन घेतलीत. आमचे अधिकारी मी आता नाव घेत नाही त्यांना मी बोललो. की बाबा तुम्ही हयांच्यावर का कारवाई करीत नाही. हयांच्यावर का अक्शन घेत नाही तर म्हणे मंत्री साहेबांच्या पीएचा फोन आहे की हा आमक्या मंत्र्यांचा माणूस आहे. साहेब, त्याच्यामुळे आम्हाला धड हयाला बोलताही येत नाही आणि हयाला दाबताही येत नाही. आणि तेच २४X७ कंपनीमध्ये पहिला मुख्य अधिकारी अन्थोंनी होता आता तो अधिकारी गायब झालेला आहे. त्याच्या जागेवर दुसरा कोण आलेला आहे तो तर फोनही घेत नाही आणि भेटत ही नाही. त्याच्या खाली दुसरा माणूस गायकवाड होता. खड्डे खणताना दुसरा माणूस. आता बुजवावयाची वेळ आली तर तो दुसरा माणूस म्हणतो मेरे को नही मालूम मेरे सामने नही हो गया है साहबजी. मै नया हू मै कैसा करेगा. अजुनही माझ्या भागामध्ये पाठवा माणूस तुम्हाला अजुनही दिसतील किती कामे पेंडींग आहेत. आपण आपली पारदर्शकता यात म्हणता ना पण तसं नाहीय. जे काम चांगल झालं असेल ना त्याला आम्ही चांगलच म्हणणार. त्याला वाईट अजिबात बोलणार नाही. परंतु नागरीकांचा रोष पुर्ण आम्हाला घ्यावा लागतोय. आयुक्त साहेब, महापौर साहेब, हयाच्यावरती तुम्ही व्यवस्थित चौकशीचे आदेश दया एवढच तुम्हाला मी विनंती करतो. धन्यवाद.

**मा.वैशाली घोडेकर -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक. सन्मा. सभागृह याठिकाणी अतिशय चांगले धोरण तुम्ही आणलेले आहे. आमचे काही दुमत नाही. पण हे चांगले आहे की काय आहे. हे थोडेसे आधीचे नियम काय होतं ते आम्हाला अज्ञानी लोकांना सांगितलंतर बरं होईल. मग असेच परवानगी दयायचे का. काहीच नियम नव्हते का असे परवानग्या दयायचे खोदायचे असेच होत होते का. याच्याआधी काय नियम होते. फोटो काढले जात होते का परत २५ टक्के अनामत रक्कम तुम्ही घेत होते का. याचा एक खुलासा

महापौर साहेब याठिकाणी झाला पाहिजे. की हया आधी काय नियम होते आणि आता काय नवीन आणले आहेत म्हणजे कळेल की कंपनीला हे जाचक आहे का महापालिकेला यामध्ये तोटा आहे की फायदा आहे. याठिकाणी दुसरे एक सांगेन की दुरुस्ती शुल्काचे आपण २५ टक्के घेतो तर दुरुस्ती शुल्क आणि परवानगी शुल्क याच्यामध्ये सर्वात जास्त शुल्क कोणते आहे. मग जे काही जास्त शुल्क आहे त्याच्यापेक्षा २५ टक्के जास्त घेतले पाहिजे. तर तसं आहे का. म्हणजे परवानगी शुल्क हे जास्त येते की दुरुस्ती शुल्क हे जास्त येते. याचाही खुलासा महापौर साहेब याठिकाणी दिला गेला पाहिजे. तसेच आताच सर्वांनी याठिकाणी सांगितल की नवीन कार्यकारी अभियंता आणि कनिष्ठ अभियंता या दोघांचा अहवाल घेतल्याशिवाय याठिकाणी पुर्णत्वाचा अहवाल त्यांना देऊ नये आणि ती अनामत रक्कम त्यांना दिली जाऊ नये. तर याठिकाणी सगळयांची अपेक्षा अशी आहे की या दोन्ही अभियंत्यांनी नगरसेवकांचा अहवाल घेतल्याशिवाय तो पुर्णत्वाचा अहवाल देऊ नये. याठिकाणी एक उपसूचना सगळयांनीच सांगितलेली आहे ती तुम्ही घ्या. अशी मी या ठिकाणी पक्षनेते आणि मडिगेरी साहेब यांना विनंती करेन. की आमच्या सगळयांचा अहवाल घेतल्याशिवाय त्यांनी त्या त्या वॉर्डामध्ये पुर्णत्वाचा अहवाल दिला गेला नाही पाहिजे. आणि आताच सांगितल की आपल्याकडे अभियंताना एक माहिती आहे की प्रत्येक वॉर्डामध्ये रस्ते आपण कधी करतो. ते रस्ते दुरुस्त करणेच्या आधी त्याठिकाणी खोदाईची परमिशन दिली पाहिजे. याठिकाणी तुम्ही तीन महिने म्हणले फॉर्मचे. पण परमिशन चालू बारा महिने राहणार का? का चालू पण फक्त तीनच महिने राहणार का याचाही एक खुलासा त्याठिकाणी दयावा. एवढच मी सांगेन की कंपनी कोणाची आहे काय आहे याच्याशी आम्हाला नगरसेवकांना काही घेणं-देणं नाही. आमच्या वॉर्डामध्ये फक्त खोदल्यानंतर लगेच एक तासात, दोन तासांत, एका दिवसांत ते दुरुस्त झाले पाहिजेत. यामध्ये अभियंत्यांला काही त्रास नाही परंतु सर्वात जास्त प्रश्न जर का कोणाला विचारले जात असतील आणि सर्वात जास्त त्रास कोणाला होत असेल तर तो नागरीकांतर्फे नगरसेवकांना होत असतो. माझ्या वॉर्डामध्ये असं झाल की एक महिन्यापूर्वी आपण तिथं रस्ता केला आणि लगेच त्याठिकाणी येऊन रिलायन्सने तो खोदला. काहीच करता आले नाही साहेब. महापौर साहेब, तुम्हाला माहिती असेल की यशवंतनगर चौकामध्ये त्याठिकाणी लगेच रिलायन्स वाल्यांनी खोदले. याठिकाणी देखील त्या कंपनीला तुम्ही का दंड मारले. आणि जसा आधीचा रस्ता होता तसाच त्यांनी केला का? आणि त्याच्यामध्ये शुल्क त्यांच्याकडून घेतले का. याचे ही अधिका-यांनी पण

त्याठिकाणी काहीच माहिती नाहीय की आपण शुल्क काय घेतल आणि काय केलय. आता जे दुरुस्ती शुल्क आहे या दुरुस्ती शुल्कामध्ये जे वॉटरलाईन खराब होतात. जी वॉटरलाईन तुटते. एमएसईबीची केबल तुटते, आपल्या लाईनच्या केबल तुटतात याचे देखील शुल्क याठिकाणी आहे का याचा देखील खुलासा महापौर साहेब झाला पाहिजे. माझे हे पाचसहा प्रश्न आहेत त्याचा खुलासा महापौर साहेब झाला पाहिजे. नंतर मला परत बोलायचे आहे.

**मा.सिमा सावळे -** मा. महापौर, मा.आयुक्त, सर्व सन्मा. सभागृह. मा. महापौर साहेब वरातीमागून का होईना एकदाचे घोडे नाचायला सुरुवात झालेली आहे. हे खरे आहे की संपूर्ण शहरामध्ये खोदाई झालेली आहे आणि त्यानंतर आपले धोरण आलेले आहे, हरकत नाही. हे धोरण आणताना आताच जस वैशालीताई म्हटल्या, मगाशी भाऊसाहेब बोलले. राहुल बोललेत की त्याचा अभ्यास करा आणि अभ्यासपूर्ण धोरण तुम्ही आणा. धोरण आणायला प्रशासनातल्या अधिका-यांकडे क्षमता नसेल तर त्यांनी त्याठिकाणी सल्लागार नेमायला हरकत नाही. अनेक ठिकाणी आपण सल्लागार नेमलेले आहेत. तर त्यासाठी पण सल्लागार नेमा. एकीकडे केंद्र शासन डिजीटल इंडियाकडे जातेय. फायबर टू होम. घरोघर केबलचा नवीन एक उपक्रम येतोय. पर्यावरणपूरक म्हणून एमएनजीएलची लाईन प्रत्येक घराघरापर्यंत गेली पाहिजे म्हणून केंद्र शासन, राज्य शासन अहारोत्र झगडतयं. स्मार्ट सिटीमध्ये आपण डक्ट टाकण्याचे ६०० कोटी रुपयाचे टेंडर फ्लोट केलेय आणि त्यानंतर रस्ते खोदाईवरती आपण धोरण आणले आहे. एकतर ठरवून घ्या की केंद्र शासनाला, राज्य शासनाला, आपल्याला ऐकायचच नाही. ते काय म्हणतात त्यांच्याशी आपल्याला काही घेणं-देणं नाही. जर का तुमचा फायबर टू होम आज जर का तुम्ही कुठेही गेला तर बँकेमध्ये तुम्हाला कुठलाही व्यवहार करायचा असेल तर तुम्हाला इंटरनेटची सुविधा लागत नसेल आणि आपल्याच गर्व्हनमेंटने हे केले, या भारत देशाच्या भारत सरकारच्या गर्व्हनमेंटने हे केलेले आहे आणि त्यांनी जर त्याठिकाणी नोटा चलनामध्ये कमी वापराव्यात म्हणून एक अभ्यासपूर्ण पाऊल जर भारत देशाच्या प्रधानमंत्र्यानी उचलले असेल आणि त्यामध्ये जर का आपण अशा प्रकारच्या अटी शर्ती टाकणार असू तर मला वाटत आपल्या गाडीची खिळ आपणच काढतोय. मगाशी मी सगळयांची भाषण ध्यान लावून ऐकत होते. राहुल दादा म्हटले की काही लोक घोडयावरुनच फोन करतात. राहुलदादा घोडयाची सवारी राजाची सवारी होती है. “राजा कौन है, आप भी जानते, हाम भी जानते है” फोन कुठूनही येऊ दया पण येतो त्याला महत्व आहे. काही लोक तर फोनच करीत नाही. आऊट ऑफ कव्हरेज आहे.

आज जर एखादया फोनची रेंज जर का गेली, आज आम्ही सगळे जण आयडियाचेच नंबर वापरतो. या महानगरपालिकेमधले नगरसेवक २००७ पासून आम्ही वाटेल तेवढया शिव्या खातो. शहर खोदले जातेय का. खड्डे होतात का. खड्डे जागोजागी झाले आहेत. आता काही लोकांनी सुचना पण मांडल्या. काय केले पाहिजे काय नाही केले पाहिजे. काही स्वागतार्ह पण आहेत. पण म्हणून तुम्ही एकदा ठरवावे लागेल. या सभागृहाने पण ठरवायला लागेल. एकीकडे नोटबंदी आणली. नोटबंदी आणून तुम्ही नोटांचा वापर कमी केला. दुसरीकडे तुम्ही पुरस्कार करताय डिजीटल इंडियाचा आणि तिसरीकडे तुम्ही काय करताय. तुमच्या धोरणाला तुम्हीच खो घालताय. चार महिने खोदाईचे दयायचे. भाऊसाहेब मगाशी मी माहिती घेतली असता राहुलदादानीं सांगितलं चार महिन्यांमध्ये १६५ कोटी रुपये जमा झालेत. महापौर साहेब, महापालिकेचे उत्पन्न वाढले की कमी झाले. ज्या चो-या होत होत्या, त्या चो-या होत नाहीत. असं मी म्हणणार नाही त्या आजही होतात. परंतु १६५ कोटी रुपये या चार महिन्यांमध्ये जमा झाले असतील तर या वर्षभरामध्ये किती जमा होतील याचा सुध्दा विचार झाला पाहिजे. तुम्ही सांगा की एसटीडीला पैसे जास्त लागतात की रस्ता खोदाईला पैसे जास्त लागतात. रस्ता खोदाईला ना. आता यांचे असं म्हणणे आहे की रस्ता खोदाईचे पैसे वाचवा आणि एसटीडी करतो. तर एसटीडीला तर सोप आहेनां एका ठिकाणी मशीन लावली केंबल टाकला दहा किलोमीटरपर्यंत केबल ओढली. ज्या गोष्टीची आपल्याला माहिती नाही. त्या गोष्टीमध्ये किती बोलावे. यालाही मर्यादा असल्या पाहिजेत. एकीकडे तुम्ही बंधन घालता. या देशाच्या घटनेने मोबाईल आणि कायदयाने मोबाईल ही अत्यावश्यक सेवेमध्ये इनक्ल्यूड केलेले आहे. अत्यावश्यक सेवेमध्ये ट्राय सारखी एक संस्था. संस्था म्हणजे केंद्र शासन स्वतः याच्यावरती निगरानी करते. ट्रायने जे काही नियम घालून दिलेले असतील. एखादया मोबाईल कंपनीला सांगितले असेल की तुमचे हे फोरजीच लायसन वर्षभराच्या आतमध्ये इंम्प्लीमेंट झाले पाहिजे. हे वन टू थ्री फोर या शहरासाठी ट्रायने घालून दिलेले जे काही नियम असतील ते नियम त्या त्या मोबाईल कंपनीला बंधनकारक असतात. तिथे सुध्दा कोटयावधी रुपये भरावे लागतात. त्याचा कोणी विचार करायचा. एकीकडे पेपरलेस कारभार करायचा म्हणून बोंबा मारायच्या आणि दुसरीकडे कागदी घोडेच नाचवायचे. धोरणाला विरोध नाही महापौर साहेब, परंतु धोरण आणताना आपण एकदा तरी आपल्याच गर्व्हनमेंटच्या बाबतीतले एकदा त्यांनी जी काही जे आता कर्ते भांडतात, घौडदौड जी चालू आहे प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वामध्ये या देशाची त्याला आपण कुठेना कुठे तरी खीळ घालण्याचा

प्रयत्न करतो का असं मला तरी हे धोरण वाचल्यानंतर वाटतं. शहरामध्ये हे खड्डे आहेत ते खड्डे आजचे नाहीत महापौर साहेब. मागच्या वेळेसच्या राष्टवादीच्या नगरसेविका आशाताई सुपे या पडल्या होत्या त्या खड्डयामध्ये. तुमच्याच भागातल्या आणि त्यांचा पण विषय झाला होता सभागृहामध्ये. सांगाना, की यांच सरकार होत म्हणून खड्डे होते आणि आमचं आलं म्हणून खड्डे नाही असं अजिबात नाही. पाऊस आहे, नैसर्गिक आपत्ती आहे खड्डे होतील. परंतु त्याची जबाबदारी नाकारणे मात्र योग्य नाही. जबाबदारी घेतली पाहीजे कारण जशी सत्ता भोगण्याची जबाबदारी आमची आहे. त्याच्यावरती येणारे जे काही आरोप असतील त्याचसुध्दा निरसन करण्याची आणि ती जबाबदारी उचलण्याची जबाबदारी सुध्दा आमचीच आहे. ती जबाबदारी आम्ही अजिबात नाकारत नाही. आमच्याकडून अधिका-यांना यावेळेस नाही सुचना दिल्या गेल्या, खडडे बुजवा म्हणून. साडेआठ कोटीच टेंडर झालेले आहे मा. महापौर साहेब. ज्याप्रकारची शहरामध्ये घोषणा केली गेली खड्डा दाखवा आणि १०० रुपये मिळवा. विरोधी पक्षनेत्यांनीच काढलेल आहे. त्यांच्याच प्रभागात मागच्या वर्षीपण, पंचवार्षिकला आणि या वर्षीपण असंख्य खड्डे आहेत. गेली दहा-पंधरा वर्षामध्ये आम्ही बरोबरच काम करतो. साहेब, मला असं वाटत की पहिलं बक्षीस त्यांना स्वतःलाच घ्याव लागेल, स्वतःच्याच वॉर्डातला खडडा दाखवून. त्यामुळे ते आता इथं नाहीत वारीला गेले आहेत, देव देव करायला गेलेत. त्यामुळे त्यांच्याबद्दल मी काही बोलणार नाही. परंतु खडडयांची जबाबदारी निश्चितपणे आपली आहे मा. महापौर साहेब. ही जबाबदारी नाकारुन चालणार नाही. एकीकडे आपण जर का या धोरणामध्ये काही बदल करणार असाल तर मला अस वाटत की ही जी अट आपण लावलेली आहे की चारच महिन्यांमध्ये त्यांनी आपल्याकडे परवानगी मागायची पण ती तस न ठेवता, ट्रायने काय सांगीतल, राज्यशासनाने काय सांगितलं. त्यांची परवानगी किती दिवसांची आहे. थ्रीजी आलं त्यावेळेस किती दिवसांची परवानगी घेतली होती. फोरजी आलं असेल तर त्याची परवानगी किती दिवसांची आहे. फायबर टू होम असेल तर त्याची परवानगी किती दिवसांची आहे. हया सगळयांच्यासाठी त्यांच्या परवानग्याचा सुध्दा तुम्हाला विचार करावा लागेल. आणि त्याही पेक्षा महत्वाचे म्हणजे असं आहे की आता सांगितल की अधिका-यांच्या एनओसी घ्या. त्यांच्या एनओस्या असतातच. मी तर म्हणेल यात भ्रष्टाचार आहे का तर शंभर टक्के भ्रष्टाचार आहे, रस्ता खोदाईमध्ये. मी आज बोलत नाहीतर मी मागच्या २०१० पासून या विषयावर बोलतेय, आहे त्यामध्ये भ्रष्टाचार. हिंमत आहे का तर शहर आपण खोदून काढायच. आपण दिलेल्या

परवानग्या आणि त्यांनी टाकलेले केबल जर मोजल्या तर हजार कोटीचा फायदा या महानगरपालिकेला होणार आहे. हे डेअरींग करणार कोण. हे डेअरींग मा. महापौर साहेब आपल्यालाच करावे लागणार आहे. आणि हयांच्यावरती नियंत्रण ठेवण्याच काम सुध्दा आपल्याला कराव लागणार आहे. फक्त यामध्ये या ज्या काही आपण चार महिन्याच्या बाबतीत माझ्या सहका-यांनी इथं उपसूचना वाचत होते. त्यामध्ये काही वाढ करणार आहेत म्हणून. तर त्यामध्ये वाढ करीत असताना मला असं वाटतं की त्यांच्या परवानग्या आपण जोपर्यंत लक्षात घेत नाहीत तोपर्यंत अशा प्रकारचे लादू नका. लादले की तिथे चोरी होते आणि चोरी झाली की आपणच त्याठिकाणी त्रास करुन घेतो. मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, आता शहरभरामध्ये २४X७ चे काम चालू आहे. २४X७, ड्रेनेजचे वॉर्डामध्ये वेगवेगळया ठिकाणी रस्त्यांचे काम चालू आहे. या सगळया कामांमध्ये कुठेही सुसूत्रता नाही. त्यावरती खरतर एखादे धोरण या सभागृहामध्ये येणे गरजेचे आहे. ते धोरण आणले पाहिजे की तुम्ही रस्ता करीत असाल तर तीथं खाली केबल आहे की नाही डक्ट टाकलाय की नाही. पाण्याची पाईप लाईन आहे की नाही, ड्रेनेज लाईन आहे की नाही. स्ट्रॉम वॉटरलाईन आहे की नाही. दुर्दैव काय आहे कमिशनर साहेब या महानगरपालिकेचे. स्ट्रॉम वॉटर लाईनवरती कोटयावधी रुपये आम्ही खर्च केलेले आहेत. दुर्दैव असं की सगळया ड्रेनेज लाईन या स्ट्रॉम वॉटर लाईनला जोडल्यात आणि पावसाचे पाणी जायला कुठे रस्ता नाही. आणि म्हणून रस्त्यावरती गुडगाभर पाणी, कमरे इतके पाणी साचलेल होते. त्याच्याकडे लक्ष दयाना. त्याच्यावरती काहीतरी धोरण आणा. मोबाईल कंपन्या चो-या करतात का तर १०० टक्के चो-या करतात. कोण कोण सामील आहे, कोणाकोणाची नावे घ्यायची. इथं माफिया आहेत, सगळच आहे. परंतु तरीपण बोलायचे कोण काही थांबतय का. वैशालीताई म्हणाल्या की नगरसेवकांची पण एनओसी घ्या. ताई विचारतच नाहीत नगरसेवकांना एनओसी तर लांबच राहिली. विचारल तर पाहिजे. तुम्हाला सांगितल तर पाहिजे की तुमच्या भागामध्ये ही खोदाई होणार आहे. सांगतच नाहीत आणि म्हणून जास्त गैरसमज निर्माण होतात आणि गैरसमज झाला की नगरसेवक जाऊन उभा राहतो आणि नगरसेवक समोर उभा राहिला की मग समोरचा सांगतो मागणी करतो पण त्यानी काय केलं हे सांगत नाही. तर त्यासाठी मा. महापौर साहेब ज्या ज्या वेळेस अशा प्रकारची रस्ते खोदाई होणार असेल तर त्याची माहिती त्याची एक प्रत संबंधित नगरसेवकांना सुध्दा जाणं अत्यंत गरजेचे आहे. की जेणेकरुन त्याठिकाणी गैरसमज निर्माण होणार नाहीत. आता काही जणांनी सांगितल की रात्रीची

खोदाई. आपण मुंबई-पुणे हायवेला गेलोत ज्या ठिकाणी ट्रॅफीक प्रचंड मोठया प्रमाणात आहे त्याठिकाणी दिवसा खोदाई करणे अत्यंत अडचणीचे होतं आणि म्हणून त्याठिकाणी रात्रीची परवानगी दया. मेट्रो साठी मी स्वत: दोनतीन वेळा स्टॅण्डीग चेअरमन असतानी मेट्रोची खोदाई आम्ही बंद केली. त्याने काय केले होतं की जेसीबी जो होता तो सर्व्हिस रोडला उभा केला आणि आतमध्ये खोदाई चालू केली. जेणेकरुन तो खोदाई करु शकला असता पण त्याचे काही टेक्नीकली नियोजन नव्हतं आणि म्हणून ट्रॅफिक जाम होतं. आपण आता हिंजवडीच्या भागामध्ये गेलोतर महापौर साहेब तीन तीन तास एका ठिकाणी गाडया उभ्या असतात. रस्त्यावर खड्डे होते का ? खड्डा नव्हताच तरी ट्रॅफिक जाम होते. पावसामुळे असेल किंवा अजून कसल्या कारणामुळे असेल, आता सांगतात की आपण ट्रॅफिकची पण परवानगी घ्यायची, नवीन एक घर ओपन करतो. का, ते तर येतातचनां ते तर आपण २४X७ ची पाण्याची पाईपलाईन अत्यावश्यक सेवा असेल तिथे येऊन ते उभे राहतात त्याचा काय संबंध आहे, त्यांचा काहीच संबंध नाही. जबाबदारी आपली आहे महानगरपालिका म्हणून आपली जबाबदारी आहे. आपण सांगतोय तेथे. त्यांची पण मी परवानगी घ्यायची. मी त्यांची परवानगी घेण्याचा काही अर्थ नाही. मा. महापौर, त्यामुळे आपण त्यांची परवानगी घ्यायची कारण नाही. ते त्यातून काढून टाका अशी मी विनंती करते. दुसरे असे की आता ज्या ज्या ठिकाणी कामे चालू असतील त्या सगळया कंपन्या मोठया आहेत. एअरटेल आहे, व्होडा फोन आहे, आयडिया आहे, खूप कंपन्या आल्यात या मोबाईल क्षेत्रामध्ये. या सगळयांना अभ्यास करणे फार गरजेचे आहे. ज्या ज्या ठिकाणी टॉवर लागले जातात, ७० टक्के टॉवर या शहरामध्ये अनधिकृत बिल्डींगवरती लागलेले आहेत. टॉवर काढायला सांगितले तर त्यांनी सुप्रिम कोर्टाची ऑर्डर दाखविली की टॉवर काढता येत नाही. प्राधिकरणामधील किती रहिवासी आहेत ती गेली अनेक वर्षे त्या टॉवरसाठी भांडतात. सुप्रीम कोर्टाने स्टे दिला. तुम्ही धोरण आणताना फुलप्रूपॅ आणा, चांगल आणा आणि आपल्या कार्यक्रमाला आपणच गालबोट लावू नका एवढीच आपल्याला महापौर साहेब विनंती करते. तुम्ही विषय मंजुर करणार आहात. आम्हाला तर सांगताना सांगितलं होतं की तो विषय फेटाळणार म्हणून. तुम्ही विषय जर मंजुर करणार असाल तर या ज्या काही दोन तीन दुरुस्त्या सांगितल्या आहेत त्या दुरुस्तीसह विषय करावा. आणि नगरसेवकांच्या बाबतीत नगरसेवकांना संबंधित लोकांना पत्र देऊन संबंधित अधिका-यांनी पत्र देवून तो रस्ता किती दिवस आधी झालेला असेल त्याची सुध्दा माहिती घ्यावी. त्याचबरोबर या ठिकाणी ज्या कंपन्याचा जो कोणी अधिकारी आहे

त्यांचा मोबाईल नंबर असेल तो पण दया. आता रात्रीच्या वेळी तिथं खोदाई कामाला गेलं तर तिथं कोणतरी येतो आणि काम बंद करतो. २४X७ च्या सुध्दा नॉनस्टॉप अशा तक्रारी येतात. पाणीपुरवठयाच्या विषयाच्या सुध्दा तर त्याच्यावर सुध्दा आपल्याला कुठेतरी बंधन आणणे फार गरजेचे आहे. या सभागृहात राष्ट्रवादीचे दोन नगरसेवक होते. मंगलाताई आहेत इथं. त्यांना दुसरं काहीच काम दयायच नाही. उपसूचना वाच, विषय वाच, उपसूचना वाच, विषय वाच. सिमाताई बोलल्या की सोड तीच्या अंगावर, तेवढच होतं त्यामुळ फार भूषणाच नाही ते. ते तुम्ही डोक्यातून काढून टाका. मा. महापौर साहेब, नवीन लोकांना ते भारी वाटलं म्हणून मी आपलं सांगितलं. तुमचं जे धोरण होतं ते सांगितलं फक्त. त्यांना जे काही वाटेल की आता विषय वाचायला सांगतात. उपसूचना वाचायला सांगतात आपण भारी आहोत. भारी नाही हे सांगते फक्त त्यांना. मा. महापौर साहेब, आपण खोदाईच्या धोरणासंदर्भात मला असं वाटतं की हे जे धोरण असेल तर कमिशनरांच्या वतीने येऊ दया. या संदर्भात ज्या ज्या वेळेस तशी अडवणूक होईल आता जसे निलेश बारणे म्हणाले की पुतण्याचा फोन येतो, भाच्याचा फोन येतो. ये बाबा निलेश तुला कुठला भाचा नाहीय का. भांडण करायचे ना तर डायरेक्ट करायचे. नाहीतर करायचेच नाही. कोण काय नावच घ्यायला तयार नाही. नावच घ्या मजा बघा मग. कोण कशाला, नावच घ्यायचे डायरेक्ट. नाव घेऊन बोला. मा. महापौर साहेब, याठिकाणी आपण धोरण आणताना मला असं वाटत की कमिशनराचे सुध्दा मत घेणे फार गरजेचे आहे. ते मत घेऊन जे जे अधिकारी कॉन्फीडंटली काम करतात त्यांचे सुध्दा मत घ्यावे आणि ज्या काही दोनतीन दुरुस्त्या सुचविल्या आहेत. त्याच्यावर सुध्दा आपण अंमलबजावणी करावी एवढच बोलून याठिकाणी थांबते.

**मा.एकनाथ पवार -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक. सन्मा. सभागृह उपसूचना मंगलाताई उपसूचना वाचायला लावू का मी वाचलेली चालेल.

**मा. विलास मडिगेरी** - मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक. सन्मा. सभागृह मला ही खर या संदर्भात भाषण करायच होतं. पक्षनेते ते म्हणतात फक्त उपसूचना वाचा. पक्षनेत्यांचे सभागृहात ऐकायला लागते. या संदर्भात याठिकाणी सूचना आहे, दुरुस्ती उपसूचना आहे. जुन, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर असे चार महिने अर्ज स्वीकारावेत अशा प्रकारे सुरुवातीला मांडल होते त्याच्यामध्ये दोन महिन्याची वाढ करुन ऑक्टोबर आणि नोव्हेंबर थोडंस बोलताना त्याच्यामध्ये दोन गोष्टींचे मी स्पष्टीकरण देतो. हे सहा महिने करण्याचा हा उद्देश आहे की आपलं बजेट बनत नोव्हेबर/डिसेंबरमध्ये. ते सादर होतं जानेवारी

फेब्रुवारीमध्ये आपल्या सन्मा. स्थायी समितीमार्फत या सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेकामी येते. आपण या धोरणामध्ये की आतापर्यंत जे काही पैसे जमा होत होते. तर ते फक्त् म्युन्सिपल फंड मध्ये ते पैसे जात होते. त्यामुळे आपण आता याच्यामध्ये एक शिर्षक तयार करावे जे काही खोदाईचे माध्यमातून महापालिकेत पैसे येतात. ते पैसे त्या त्या क्षेत्रीय कार्यालयामध्ये ज्या प्रभागामध्ये खोदणार आहेत त्या त्या प्रभागाच्या खोदण्याच्या संदर्भात निविदा काढून ते रस्ते दुरुस्त करावेत अशा प्रकारचा हा उद्देश आहे. ते जर सेपरेट लेखाशिर्षक तयार झाले तर ते काम करण्यासाठी पुढच्या फायनान्शिअलमध्ये ते काम निघेल आणि ते दुरुस्तीचे काम वेळेत होईल. हा एक त्या संदर्भातला आपण सहा महिने घ्यावे. पुढे त्यांना कसे दयायचे काय दयायचे ते प्रशासनामार्फत त्यांना खोदाईचा परवाना देण्यात यावा. दुसरे परवानगी पत्र देण्यापूर्वी संबंधित वाहतूक विभाग या विभागाचे नाहरकत दाखले प्राप्त करुन घेण्यात येऊन ते शहर अभियंता कार्यालयाकडे तांत्रिक विभागास दिल्यानंतरच परवानगी देण्यात यावी. पूर्वी परवाना दिल्यानंतर वाहतुक विभागाचा परवाना घेतला जायचा. पण वाहतुक विभागाचा परवाना घेऊन आपण यामध्ये परवानगी दयावी अशा प्रकारचा थोडासा बदल आपण सुचविला आहे. दुसरं परवानगी पत्र देण्यापूर्वी संबंधित क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विदयुत विभाग, पाणीपुरवठा विभाग, जलनि:सारण विभाग हे आपले महापालिकेचे तीन विभाग आहेत. या तीनही विभागांचे नाहरकत दाखले संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य विभागाने प्राप्त करुन घेऊन संपूर्ण प्रकरण नाहरकत दाखल्यांसह पुढील कार्यवाहीसाठी शहर अभियंता कार्यालयाकडे तांत्रिक विभागाकडे पाठविण्यात यावे. पूर्वी परवाना दिला जायचा. एनओसी संबंधित जो कोणी ठेकेदार असेल त्यांनी आणायचा अशा प्रकारचे त्याच्यामध्ये होतं. परवानाधारक याच्यामध्ये एकूण खोदाईच्या दुरुस्तीपोटी येणा-या शुल्काच्या २५ टक्के रक्कम अनामत म्हणून परवानगी देणेपूर्वी बँक गॅरंटीद्वारे दयावी. मूळ प्रस्तावामध्ये डीडी किंवा आरटीजीएसद्वारे असं आपण केले होतं. पण बँक गॅरंटी आपण २५ टक्के सुचविली. पूर्वी कोणत्याही प्रकारचे पत्रक घेतले जात नव्हतं. दुसरं सदर खोदाई मगाशी बोलताना अनेक सन्मा. सदस्यांनी मांडल की रात्रीच्या वेळी करु नये. दिवसा करु नये. परंतु त्याच्यामध्ये आपण सुचविलं होतं की ऑफिस ऑवर्समध्येच खोदण्यात यावे परंतु त्यांच्यामध्ये अशी दुरुस्ती केली की सदर रस्ता खोदाईचे काम हे वाहतूक परवानाप्रमाणे दिलेल्या वेळेतच करावे.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- खाली नमुद अनुक्रमांकामधील दुरुस्तीस मान्यता देण्यात यावी त्या व्यतिरीक्त बाकी अनुक्रमांकात काही बदल नाही, सदर दुरुस्तीस मान्यता देणेत यावी.

**अ) धोरण-**

१) सेवा वाहिन्या टाकणा-या संस्थेकडून रस्ते खोदाईसाठी परवानगी मागण्यासाठी करण्यात येणारे अर्ज प्रत्येक वर्षी जुन, जुलै, ऑगष्ट व सप्टेंबर या चार महिन्यामध्येच स्विकारणेत यावेत **या ऐवजी**

सेवा वाहिन्या टाकणा-या संस्थेकडून रस्ते खोदाईसाठी परवानगी मागण्यासाठी करण्यात येणारे अर्ज प्रत्येक वर्षी जुन, जुलै, ऑगष्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर या सहा महिन्यामध्येच स्विकारणेत यावेत.

**४)** परवानगी पत्र देणे पुर्वी संबंधित क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत विदयुत विभाग, पाणीपुरवठा विभाग, जलनिःसारण विभाग, वाहतुक विभाग या विभागांचे नाहरकत दाखले प्राप्त करून घेण्यात येऊन, ते शहर अभियंता कार्यालयाकडील तांत्रिक विभागास दिले नंतरच परवानगी पत्र देण्यात यावे. **या ऐवजी**

**४अ)** परवानगी पत्र देणे पुर्वी संबंधित वाहतुक विभाग या विभागांचे नाहरकत दाखले प्राप्त करून घेण्यात येऊन, ते शहर अभियंता कार्यालयाकडील तांत्रिक विभागास दिले नंतरच परवानगी पत्र देण्यात यावे.

**४ब)** परवानगी पत्र देणे पुर्वी संबंधित क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत विदयुत विभाग, पाणीपुरवठा विभाग, जलनिःसारण विभाग या तीन्ही विभागाचे नाहरकत दाखले संबंधित क्षेत्रीय कार्यालयातील स्थापत्य विभागाने प्राप्त करुन घेऊन संपुर्ण प्रकरण दाखल्यासह पुढील कार्यवाहीसाठी शहर अभियंता कार्यालयाकडील तांत्रिक विभागाकडे पाठविण्यात यावे.

**६)** परवाना धारक याच्याकडून एकूण खोदाईच्या दुरूस्ती पोटी येणा-या शुल्काच्या २५% रक्कम अनामत म्हणून परवानगी देणे पुर्वी डी डी/आर.टी.जी.एस. द्वारे मनपा कोषागारात भरून घ्यावी. **या ऐवजी**

परवाना धारक याच्याकडून एकूण खोदाईच्या दुरूस्ती पोटी येणा-या शुल्काच्या २५% रक्कम अनामत म्हणून परवानगी देणे पुर्वी बँक गॅरंटीव्दारे घ्यावी.

**ब) अटी-**

सेवा वाहिन्याचे रस्ते खोदाईचे परवाना देताना खालीलप्रमाणे अटीचा
समावेश करावा.

**९)** सदर रस्ता खोदाईचे काम हे मनपाच्या कार्यालयीन वेळेतच (सकाळी १०.०० ते संध्या.५.४५) पर्यंत करावे. **या ऐवजी**

सदर रस्ता खोदाईचे काम हे वाहतुक परवानाप्रमाणे दिलेल्या वेळेत करावे. वरीलप्रमाणे दुरुस्तीस मान्यता देणेत यावी.

**मा.बाबासाहेब त्रिभूवन -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.एकनाथ पवार -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक.सन्मा. सभागृह खरतर सगळयाच वक्त्यांनी कोणी सांगितल की उशिरा आपण हे धोरण आणलं, कोणी काही चांगल्या सुचनाही मांडल्या या विषयामध्ये. तर मला असं वाटत की थोडया फार फरकाने सगळयांच्या मनामध्ये खोदाईच्या धोरणामध्ये कमीजास्त सगळीकडे असेल. म्हणजे सगळयाच गोष्टी या धोरणामध्ये १०० टक्के बसल्यात. तर मला असं वाटत की सन्मा. सदस्यांनी विलास असेल किंवा सागर असेल या दोघांनी प्रयत्न तर निश्चितपणे केलेला आहे. त्यामुळे तो काय प्रयत्न दोघ जण हातात कागद, पेन घेऊन लिहीत बसलेत अशा पध्दतीचा प्रयत्न १०० टक्के झालेला नाही. म्हणजे सन्मानीयांनी त्या त्या विभागाच्या अधिका-यांच्याबरोबर चर्चा करुन या शहरामधल्या खोदाईच्यामुळे जो त्रास या शहराला होतोय त्याला आळा घालण्यासाठीचा हा प्रयत्न आहे. मला कल्पना आहे सर्व सन्मा. सदस्यांच्या मनामध्ये म्हणजे ज्यांनी ज्यांनी भाषण केले. त्यांच्या म्हणण्यामध्ये केबल माफिया असतील, खड्डे माफिया असतील. हा खरतर चांगल्या शब्दांचा उपयोग केला गेला आणि खरतर त्यासाठीचा एक प्रयत्न आहे हे लक्षात ठेवा. या शहरामध्ये सगळी खोदाई संपली आणि हे धोरण आणले. खरतर हे धोरण अनेक वर्षानुवर्षे पुढच्या काळामध्ये ज्या ज्या वेळेस रस्त्यावर खोदण्याचे काम होणार आहे त्याला प्रतिबंध घालण्यासाठीचा हा प्रयत्न आहे हे सगळयांनी मनामध्ये लक्षात ठेवले पाहिजे. हयाच्यामध्ये किती पैसे मिळाले. काही सन्मा. सदस्यांनी हयांच्यामध्ये बोलता बोलता हा ही उल्लेख केला की खोदाईच्या धोरणामधून आपण महापालिकेला पैसे मिळविण्याचे आपले धोरण आहे का तशीही परिस्थिती नाही जे रस्ते खोदले जातात ते चांगल्या पध्दतीने बुजविले गेले पाहिजेत. आणि ते बुजविण्यासाठी जे जे करता येईल ते केले पाहीजे. कारण एखादा विषय काही कायम संपत नाही. एखादा विषय आज मांडला

पुढच्या काही दिवसांच्या कालावधीनंतर त्याच्यामध्ये बदल करायचा खरतर या सभागृहाच्या माध्यमातून आपण विषय बदलू शकतो. खरतर ज्यांनी ज्यांनी सांगितल की जे ठेकेदार कोण आहेत खरतर ठेकेदार कोण आहेत याच्यावर जर का या सभागृहामध्ये चर्चा केली तर माझ्याकडे ठेकेदारांची यादी होती लक्षात ठेवा. गेल्या अनेक वर्षापासून या खडडयाच्या संदर्भामध्ये मगाशी भाऊसाहेब तुम्ही सांगितल की सेल्फी वुईथ खडडा ताईंनी मगाशी सांगितल की खड्डयांची जबाबदारी आम्ही १०० टक्के घेतली पाहिजे का, घेतलीच पाहिजे. खडडयाची जबाबदारी आपण नाकारत नाही. परंतु खडडयावरुन जे आपण राजकारण करतो. म्हणजे खरतर अधिका-यांच्या संदर्भामध्ये अनेक वेळा चर्चा झाल्या. बैठका झाल्या. खरतर आपल्या शहरामध्ये पहिल्या दिवशी ज्या पध्दतीने पाऊस झाला. खडडे पडणे नॅचरल होतं. पण ज्या खडडयावरुन आपण राजकारण करतोय त्याला कुठेतरी आपण विरोध केला पाहिजे ना. खडडयाचे राजकारण खरतर आपण असे प्रश्न केले तर आरोप प्रत्यारोपांचे फायरींग करुन या शहरामध्ये आपण खडडयांवरचं राजकारण करतोय. या शहरामधले विकासाचे राजकारण आपण करतोय. या संदर्भामध्ये आपण चर्चा केली पाहिजे. खरतर एचबीटीच्या माध्यमातून किती महापालिकेला म्हणजे मागच्या काळामध्ये मलाही माहिती नाही लक्षात ठेवा. एचबीटीच्या माध्यमातून एका किलोमीटरला जर १५ लाख रुपये मिळत असतील तर आपण जर खड्डा खोदला तर ८० लाख रुपये भरावे लागतात. म्हणजे काही चालाख मंडळी आहेत या शहरामध्ये. म्हणजे एचबीटीच्या माध्यमातून राहुलदादा १५ लाख रुपये एका किलोमीटरला आणि जर खोदाई आपण फिजीकली केली तर ८० लाख भरावे लागतात. तर एचबीटीची परवानगी घ्यायची आणि पैसा मिळवायचा म्हणजे पैसा मिळविण्याचा हा गोरख धंदा आहे. खरतर या संदर्भामध्ये मला अधिक बोलायचे नाही. पण मला मात्र एक गोष्ट सांगायची आहे लक्षात ठेवा. म्हणजे जे धोरण करण्याचा प्रयत्न पुढच्या काळामध्ये होणा-या काळामध्ये आपल्याला करायचाय. या शहरामधले रस्ते हे चांगले राहिले पाहिजेत. जे लोक केबलच्या माध्यमातून या ठिकाणी खोदण्याचे काम करतात. त्यालाही चाप बसला पाहिजे. खरतर डिजीटल इंडियाच्या माध्यमातून ब-याचशा माझ्या अनेक सदस्यांनी एक गोष्ट निश्चित केली की स्मार्ट सिटीच्या माध्यमातून आपण ६०० कोटीचे नाही ४०० कोटीचे टेंडर जरी काढत असलो तर मला अस वाटत की जर ते जरी केले तर अनेक ठिकाणी खडडे खोदण्याचे काम पुढच्या काळामध्ये होतेय त्याला कुठेतरी थांबविले पाहिजे, प्रतिबंध केला पाहिजे. आणि जे चुकीच्या पध्दतीने या शहरामध्ये रस्ते खोदाईच्या माध्यमातून खडडयांचे राजकारण जी

मंडळी करतायत. मला असं वाटत की त्यालाही कुठेतरी चाप बसला पाहिजे आणि एक प्रामाणिक प्रयत्न या नगरसेवकांनी केला, मला या सभागृहाच्या माध्यमातून या सगळयांना एकच विनंती करायची खरतर हे शहर खडडे मुक्त झाले पाहिजे. या शहराचा खरतर पुढच्या काळामध्ये अजुनही चांगल्या पध्दतीचा विकास झाला पाहिजे. आणि ते विकास करीत असताना सगळयांच्या माध्यमातून खरतर राहुल कलाटेंचे अभिनंदन केले पाहिजे. भाऊसाहेबांनी सांगितलं. मंगलताईंनी सांगितल की प्रयत्न तरी करते. योगेशभाई या सभागृहामध्ये नाहीत, पण त्यांनीही सांगितले. सचीन तुम्ही ही सांगितलं. एक चांगल धोरण हया माध्यमातून आपण आणले आहे. मला अस वाटत की या पुढच्या काळामध्ये एखादं धोरण येईल पुढे त्याचा कायदा झाला. आणि त्या कायदयामध्ये आपल्याला बदल करायचा नाही अशा पध्दतीची परिस्थिती कधीच नसते. माझी या निमित्ताने तुम्हाला विनंती आहे की आपण या धोरणामध्ये वेगवेगळया पध्दतीच्या माध्यमातून ज्या ज्या वेळेस गरज भासेल अशा पध्दतीचे धोरण आणून आपण पहिल्यांदा धोरण आणायला निश्चितच सुरुवात केली. मागच्या काळामध्ये  धोरण जर आणले असते तर मला अस वाटत की ब-याच वेळा या खडडे खोदणा-या माफियांना आपण चाप बसविण्याचे काम केले असते. पण उशिरा का होईना हा एक चांगला प्रयत्न आपण या सगळयांच्या माध्यमातून करतोय. आणि भाऊसाहेबांनी म्हटलय, ताईंनी म्हटले की बरेचसे या सभागृहातील सन्मा. नगरसदस्य नवीन आहेत. कदाचित संताजी धनाजीची ही व्याख्या ही खरतर त्यांना येत असेल की शिवाजी महाराजांच्या इतिहासामधला असेल. आपण पॉझीटीव्ह अर्थाने घ्यायचो. मागच्या काळामध्ये मागच्या सभेमध्ये काय झालं, अन् काय संताजी धनाजी नाहीत. परंतु एक निश्चित आहे की संताजी धनाजीनी सुध्दा इतिहास केला. त्यांनी तो इतिहास आपल्या शिवाजी महाराजांना जिंकण्यासाठी निश्चितच केला आणि मला असं वाटत की कुठल्याही अर्थाने संताजी धनाजीचे नांव घ्या. परंतु संताजी धनाजी हे शिवाजी महाराजांचे सेनापती होते. चांगल्या पध्दतीचे लढवय्ये कार्येकर्ते होते. आणि मला असं वाटत की दोनच नाही या महापालिकेच्या सभागृहामध्ये आम्ही ताई सगळे मावळे संताजी धनाजीसारखे पुढची लढाई जिंकण्यासाठी सज्ज आहोत. मला माहीत आहे हे लक्षात ठेवा. पुढच्या काळामध्ये एखादी गोष्ट आपण चांगली करण्याचा प्रयत्न केला तर आमच्यामध्ये चांगले आहे त्यामुळे चिंता करण्याची गरज नाही. मागच्या तुमच्या काळामधले संताजी धनाजी काय होते हे या सभागृहामधील अनेक नवीन सदस्यांना माहीत नाही. पण चांगले संताजी धनाजी या शहराच्या विकासासाठी निर्माण

व्हावेत अशाच पध्दतीचा प्रयत्न आपल्याला पुढच्या काळामध्ये करायचा आहे. मला असं वाटत की विलास असेल, सागर असेल, किंवा ज्या ज्या सदस्यांनी या संदर्भामध्ये आपले मत व्यक्त केलेय. चांगल्या पध्दतीचे धोरण आणण्याचा प्रयत्न केला. ते परिपुर्ण नसेल पण पुढच्या काळामध्ये त्या धोरणामध्ये आपल्याला ज्या ज्या वेळेस गरज भासेल त्या त्या वेळेस आपण दुरुस्त करुन या शहरामधले ज्या चुकीच्या पध्दतीने रस्ते खोदले जातात त्याला पायबंद घालण्यासाठी प्रयत्न करुयात. मा.महापौर, हा विषय उपसूचनेसह मंजुर करावा. आणि पुढचा विषय घ्यावा, धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके-** मा.महापौर साहेब, उपसूचना स्वीकारली आहे.

**मा. महापौर -** उपसूचनेसह विषय मंजुर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता ---

ठराव क्रमांक- २३५ विषय क्रमांक- १
दिनांक - २०/७/२०१८ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.विलास मडिगेरी व मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२६४६ दि.९/०५/२०१८
३) मा.महापालिका सभा ठराव क्र. २०७ दि.२२/०६/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते विविध सेवा वाहिन्यां टाकण्यासाठी दर वर्षी रस्ते खोदले जातात. सदर रस्ते खोदल्यानंतर ते पूर्ववत दुरुस्ती करणेकामी बराच कालावधी जातो. खोदलेले रस्ते लवकरात लवकर पूर्ववत (दुरुस्ती) करणेकामी धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

**अ) धोरणः-**

**१)** सेवा वाहिन्यां टाकणा-या संस्थेकडून रस्ते खोदाईसाठी परवानगी मागण्यासाठी करण्यात येणारे अर्ज प्रत्येक वर्षी जुन, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या चार महिन्या मध्येच स्विकारणेत यावेत.

**२)** महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये अ,ब,क,ड,इ,फ,ग, ह व बीआरटीएस अशा प्रत्येक क्षेत्रिय कार्यालय/विभागानुसार सेवावाहिन्या टाकण्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते पूर्ववत करण्यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करावे.

**३)** रस्ता खोदाईपोटी प्राप्त होणारे शुल्क, त्याच क्षेत्रिय कार्यालयाच्या क्षेत्रातील सेवा वाहिन्या टाकण्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते दुरुस्तीकामी वरील लेखाशिर्षावर देणेत यावे.

**४)** परवानगी पत्र देणे पुर्वी संबंधित क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत विदयुत विभाग, पाणीपुरवठा विभाग, जलनिःसारण विभाग, वाहतुक विभाग या विभागांचे नाहरकत दाखले प्राप्त करून घेण्यात येऊन, ते शहर अभियंता कार्यालयाकडील तांत्रिक विभागास दिले नंतरच परवानगी पत्र देण्यात यावे.

**५)** एच डी डी (**Horizontal Direction Drill)** पध्दतीने खोदाईची परवानगी यापुढे कायमस्वरुपी देणेत येऊ नये.

**६)** परवाना धारक याच्याकडून एकूण खोदाईच्या दुरूस्ती पोटी येणाऱ्या शुल्काच्या २५**%** रक्कम अनामत म्हणून परवानगी देणे पुर्वी डी डी/आर.टी.जी.एस. द्वारे मनपा कोषागारात भरून घ्यावी.

**७)** या पुढे शहरामध्ये विनापरवाना खोदकाम केल्याचे आढळल्यास/तक्रारी प्राप्त झाल्यास,सदर तक्रार स्थळाचा पंचनामा संबंधित क्षेत्रिय कार्यालय (स्थापत्य) विभागाने करून, खोदाई शुल्काच्या रक्कमेच्या दुप्पट रक्कमेचा दंड आकारणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर भागातील उपअभियंता यांनी अनधिकृत खोदाई करणा-यावर **F.I.R.** दाखल करावा.

**८)** दररोज काम सुरू करणे पुर्वी संबंधित कनिष्ठ अभियंता यांना परवानाधारक संस्था यांनी काम सुरू करणेबाबत कळविणे आवश्यक असून, संबंधित कनिष्ठ अभियंता किंवा स्थापत्य सहाय्यक यांनी दैनंदिन पाहणी करून, कामाचे फोटो व चलचित्र खोदाई काम सुरु करणे अगोदर तसेच खोदाई चालू असताना व बुजविलेनंतर संपुर्ण फोटो व चलचित्र **(Video shooting)** संकलित करून नस्तीबध्द करावेत.

**९)** फक्त दुरुस्तीसाठी तातडीने रस्ता खोदणे आवश्यक असल्यास, मनपाकडील व खाजगी सेवावाहिन्यांची १०० मीटर पर्यंतचीरस्ते खोदाई शहर अभियंता यांची

परवानगी घेवून करणेत यावी व त्यापुढील अंतरासाठी मा.आयुक्त यांची रितसर परवानगी घेण्यात यावी. (सदर तातडीचे कामासाठी **NOC** घेणे व्यतिरिक्त इतर सर्व अटी बंधनकारक राहतील.)

**ब) अटीः-**

**सेवा वाहिन्याचे रस्ते खोदाईचे परवाना देताना खालीलप्रमाणे अटींचा समावेश करावा.**

१**)** काम करण्याच्या ठिकाणी कामाच्या माहितीबाबत फलक लावणेत येवून त्यामध्ये कामाचे नाव, कामाची मुदत, एजन्सीचे नाव, एकूण रस्ता खोदाई करणेत येणारे अंतर, कामाचे ठिकाण, संबंधित एजन्सीच्या प्रतिनिधीचे नाव व मोबाईल नंबर व त्या प्रभागातील कनिष्ठ अभियंत्याचे नाव व मोबाईल नंबर इत्यादी माहितीचा समावेश असावा. तसेच फलक प्रत्येक दिवशी काम सुरू होणा-या ठिकाणी ते त्या दिवशीच्या काम पुर्ण होणा-या ठिकाणी तसेच किमान ४०० मी. अंतरावर असावा.

२**)** काम सुरू करणेपुर्वी संपुर्ण खोदाईचा बार चार्ट परवानगी धारक संस्था यांनी संबंधित कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांना सादर करावा.

३**)** वाहतूक पोलीस विभागाकडून परवाना घेणेत येऊन, सदर परवान्याची प्रत संबंधित कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांच्या कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

४**)** खोदाई काम सुरू करणेपुर्वी महाराष्ट्र नॅचरल गॅस (**MNGL)**, एम.एस.ई.बी., बी.एस.एन.एल. तसेच एम.आय.डी.सी यांना संबंधित परवाना सादर करून त्याची पोहोच संबंधित कार्यकारी अभियंता स्थापत्य विभागात देणे बंधनकारक राहील. (सदरची बाब त्यांनी त्यांचे सेवा वाहिनीची खोदाई काम चालु असताना दक्षता घेणेसाठी आवश्यक आहे.)

५**)** ज्या एजन्सीला खोदाई कामाची परवानगी दिली आहे त्यांनी कामाचे फोटो व चलचित्र (Video Shooting**)** खोदाई काम सुरु करणे अगोदर तसेच खोदाई चालू असताना व बुजविलेनंतर काढणे आवश्यक आहे व त्याच्या प्रती स्थापत्य विभागास काम पूर्ण झालेनंतर सादर करणे बंधनकारक राहील.

**६)** काम पुर्ण झालेनंतर परवानगी पत्राप्रमाणे काम झाल्याचा, संबंधित स्थापत्य कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित केलेला दाखला, अर्जदार एजन्सीने अनामत रक्कम परतावा अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

**७)** काम संपल्यानंतर परवाना धारक यांनी अनामत रक्कम परत मिळणेसाठी ४५ दिवसांच्या आतपरवाना देणा-या ठिकाणी अर्ज करणे बंधनकारक राहील. अन्यथा, कोणतीही पुर्व सुचना न देता अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

**८)** दिलेल्या परवानगी व्यतिरिक्त जादा खोदाई आढळल्यास वाढीव खोदाईस दुप्पट दराने दंड आकारून त्याची वसुली करणेत यावी.

**९)** सदर रस्ता खोदाईचे काम हे मनपाच्या कार्यालयीन वेळेतच (सकाळी १०.०० ते संध्या ५.४५) पर्यंत करावे.

**१०)** रस्ता खोदाईची परवानगी देताना मनपा कडून परवानगी पत्रात असणा-या यापुर्वीच्या अटी व शर्ती कायम राहतील.

तसेच ज्या वर्षात सेवावाहिन्या टाकण्यासाठी रस्ता खोदाईची परवानगी दिली जाईल, त्याच वर्षी सदर रस्ते पूर्ववत करण्याचे काम अंदाजपत्रकात ठेवून, पुरेशी तरतुद करुन काम पूर्ण करावे. मा.आयुक्त यांनी सर्व विभागास सदर धोरणानुसार कार्यवाही करणेचे परिपत्रक काढावे. सबब वरीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच खाली नमुद अनुक्रमांकामधील दुरुस्तीस मान्यता देण्यात येत आहे त्या व्यतिरीक्त बाकी अनुक्रमांकात काही बदल नाही, सदर दुरुस्तीस मान्यता देणेत येत आहे.

**आ) धोरण-**

२) सेवा वाहिन्या टाकणा-या संस्थेकडून रस्ते खोदाईसाठी परवानगी मागण्यासाठी करण्यात येणारे अर्ज प्रत्येक वर्षी जुन, जुलै, ऑगष्ट व सप्टेंबर या चार मह्न्यिामध्येच स्विकारणेत यावेत **या ऐवजी**

सेवा वाहिन्या टाकणा-या संस्थेकडून रस्ते खोदाईसाठी परवानगी मागण्यासाठी करण्यात येणारे अर्ज प्रत्येक वर्षी जुन, जुलै, ऑगष्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर या सहा महिन्यामध्येच स्विकारणेत यावेत.

**५)** परवानगी पत्र देणे पुर्वी संबंधित क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत विदयुत विभाग, पाणीपुरवठा विभाग, जलनिःसारण विभाग, वाहतुक विभाग या विभागांचे नाहरकत दाखले

प्राप्त करून घेण्यात येऊन, ते शहर अभियंता कार्यालयाकडील तांत्रिक विभागास दिले नंतरच परवानगी पत्र देण्यात यावे. **या ऐवजी**

**४अ)** परवानगी पत्र देणे पुर्वी संबंधित वाहतुक विभाग या विभागांचे नाहरकत दाखले प्राप्त करून घेण्यात येऊन, ते शहर अभियंता कार्यालयाकडील तांत्रिक विभागास दिले नंतरच परवानगी पत्र देण्यात यावे.

**४ब)** परवानगी पत्र देणे पुर्वी संबंधित क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत विदयुत विभाग, पाणीपुरवठा विभाग, जलनिःसारण विभाग या तीन्ही विभागाचे नाहरकत दाखले संबंधित क्षेत्रीय कार्यालयातील स्थापत्य विभागाने प्राप्त करुन घेऊन संपुर्ण प्रकरण दाखल्यासह पुढील कार्यवाहीसाठी शहर अभियंता कार्यालयाकडील तांत्रिक विभागाकडे पाठविण्यात यावे.

**६)** परवाना धारक याच्याकडून एकूण खोदाईच्या दुरूस्ती पोटी येणाऱ्या शुल्काच्या २५**%** रक्कम अनामत म्हणून परवानगी देणे पुर्वी डी डी/आर.टी.जी.एस. द्वारे मनपा कोषागारात भरून घ्यावी. **या ऐवजी**

परवाना धारक याच्याकडून एकूण खोदाईच्या दुरूस्ती पोटी येणाऱ्या शुल्काच्या २५**%** रक्कम अनामत म्हणून परवानगी देणे पुर्वी बँक गॅरंटीव्दारे घ्यावी.

**ब) अटी-**

सेवा वाहिन्याचे रस्ते खोदाईचे परवाना देताना खालीलप्रमाणे अटीचा
समावेश करावा.

**९)** सदर रस्ता खोदाईचे काम हे मनपाच्या कार्यालयीन वेळेतच (सकाळी १०.०० ते संध्या.५.४५) पर्यंत करावे. **या ऐवजी**

सदर रस्ता खोदाईचे काम हे वाहतुक परवानाप्रमाणे दिलेल्या वेळेत करावे.

वरीलप्रमाणे दुरुस्तीस मान्यता देणेत येत आहे.

**अनुकूल**- ८१ **प्रतिकूल -०**

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा**.** महापौर यांनी प्रकट केले**.**

------

**मा.अनुराधा गोरखे -** मा. महापौर साहेब विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- २

दिनांक - २०/७/२०१८ विभाग - मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र

क्र.लेखा/६/कावि/७१७४/२०१८ दि.१८/६/२०१८

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२८२४ दि.१९/०६/२०१८

३) मा.सभापती स्थायी समिती यांचे दिनांक २०/६/२०१८ चे पत्र.

४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक २३० दि.२२/०६/२०१८

शहर अभियंता अ व फ क्षेत्रिय कार्यालय यांनी दि.१५/०६/२०१८ चे प्रस्तावान्वये सन २०१७-१८ अखेर सुमारे ७२५ कोटी रुपये शिल्लक राहिले असल्याची शक्यता आहे. यापैकी सुमारे ५०० कोटी रुपये विविध कामांसाठी अधिच वितरित करण्यात आलेले आहे. वार्षिक लेखे अंतिम व्हावयाचे असलेने उर्वरित रक्कम निश्चितपणे निर्धारित करता येत नसली तरी सुमारे २२५ कोटीची रक्कम शिल्लक राहणेचे शक्यता आहे. प्रभाग/मुख्यालयातील भांडवली/ महसुली/विशेष योजना/प अंदाजपत्रक यातून रक्कम रुपये २११,५६,८३,१००/- वर्गीकरण करणे शक्य आहे तरी अ व फ क्षेत्रीय कार्यालयासाठी प्रस्तावात नमूद प्रमाणे वर्गीकरण करून मिळणेची विनंती केली होती. त्यानुसार शहर अभियंता यांनी प्रस्तावित केलेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०१ नुसार अखर्चीत निधी र.रू.२२५ कोटी आरंभीचे शिलकेत वाढ करून कलम १०३ अनुसूची ड मधील प्रकरण ७ तरतूद २ (१) नुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे त्या त्या कामांसमोर वाढ/घट करणेस व सन २०१८-१९ च्या भांडवली अंदाजपत्रकात कामाचा समावेश करणेस भांड्वली/महसूली प अंदाजपत्रकातील विभागांच्या अंतर्गत वर्गीकरण असल्याने सन २०१८-१९ ची तरतूद अ व फ क्षेत्रीय र.रू.२११,५६,८३,१००/- वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.२११,५६,८३,१००/-)

**मा.शैलजा मोरे -** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सिमा सावळे -** मा. महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- मा. महापालिका सभा ठराव क्र. २३०, दि. २२/६/२०१८ मधील प्रस्तावात नमुद केले प्रमाणे अनुक्रमांक

५,६,७ ची कामे वगळून त्या त्या कामासमोर वाढ घट करणेस व सन २०१८-१९ च्या भांडवली अंदाजपत्रकात कामांचा समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा. महापौर साहेब, उपसूचनेला मी अनुमोदन देते.

**मा.अनुराधा गोरखे -** मा. महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.राहुल कलाटे -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक. सन्मा. सभागृह या विषयामध्ये खाली वाढ/घट र.रु. २११,५६,८३,१००/- दि.२०/७/२०१८ चे सभेत घेण्याचे निणर्याप्रमाणे. जगताप साहेब, हे लक्षात आले नाही.

**मा.नगरसचिव -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक. सन्मा. सभागृह सन्मा. कलाटे साहेबांनी मुद्दा उपस्थित केला. हा जो विषय आहे याच्यामध्ये वेगवेगळे वाढ/घट लेखाशिर्ष दिलेले आहेत. त्याची एकूण जी रक्कम आहे ती खाली वाढ/घटीमध्ये आपण दर्शवितो आणि खाली जो दि. २०/७/२०१८ चे सभेत घेण्याचे निणर्याप्रमाणे आहे तो मागच्या सभेचा तहकूबीचा निर्णय आहे. तहकूबीचा निर्णय याप्रमाणे आपण खाली मांडतो.

**मा.राहुल कलाटे –** मा.महापौर साहेब, पण मागच्या सभेत तर या विषयामध्ये अमाऊंट जास्त होती.

**मा.नगरसचिव -** मागचा विषय सेम जसाचा तसाच आलेला आहे त्यात काही बदल नाही. आता ताईंनी उपसुचनेव्दारे त्याच्यातली अमाऊंट कमी केली आहे.

**मा.राहुल कलाटे -** महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आम्ही पण सभागृहामध्ये सांगितलं होतं की विषयाबाबत तुम्ही जागेवर जाऊन चौकशी करा ना. ते रस्ते चांगले आहेत की चांगले नाहीत. तुम्ही सरळ ताई भांडल्या म्हणून ती तरतूद कमी केली. परंतु तुम्ही शहरात सगळीकडेच केलेले आहे. आयुक्त साहेब, आम्ही काय म्हणत होतो तुम्हाला तुम्ही टेंडर काढायचे म्हणून या रकमा नका घालू. जे रस्ते जागेवर आहेत त्याची वस्तुस्थिती तुम्ही जाऊन पाहिली का. तुम्ही चौकशी केली का. तुम्ही फक्त ताई भांडल्या म्हणून तिथले रस्ते कमी केले. बाकीच्या प्रभागांचे काय. आम्ही पण आमच्या वार्डाचे काही रस्ते सांगितले होते ते तुमच्या बजेटमध्ये दिसतात. हे ही रस्तेवर जागेवर चांगले आहेत. ते ही तुम्ही त्या कॉक्रींटीकरणासाठी घेतले गेलेले होते. तुम्ही मागच्या वेळी या विषयाला उपसूचना दिली तुम्ही मंजुर म्हणले परत आता हे खाली लिहलय. कदाचित आम्ही अज्ञानी आहोत. तुम्ही मागच्या वेळेस उपसूचना देऊन मंजुर म्हणले. मग आज का परत आणला. तुम्ही त्याच काय केलं.

**मा.एकनाथ पवार -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक. सन्मा. सभागृह. खरतर जगताप साहेब तुम्ही हा विषय नीट बघितला नाही. हा विषय २२१ कोटींचा होता. याच्यामध्ये २२१ कोटी प्रशासनाने दिलेले आहेत. त्यामुळे ही प्रशासनाची चूक असल्यामुळे आपल्याला हा विषय या सभेच्या समोर घ्यावा लागला. तुम्ही म्हणताय की रस्ते कुठले घेतले. ताई म्हणल्या म्हणून नाही, आपण सगळेच रस्ते म्हणजे जे जे वर्गीकरण केले. कुठल्या रस्त्याची गरज आहे. कुठला रस्ता अत्यंत गरजेचा आहे. कुठला रस्ता अगोदर केला पाहिजे. कुठल्या रस्त्याची परिस्थिती काय आहे. हे बघूनच आपण काम करणार आहोत. त्यामुळे मनामध्ये असं नका ठेवू.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, तुम्ही सगळयाच रस्त्यांची पाहणी करुन अंमलबजावणी करावी.

**मा.एकनाथ पवार –** मा.महापौर साहेब, आपण तसंच १०० टक्के करणार आहोत. त्यानंतरच अंमलबजावणी करणार आहोत त्यामुळे चिंता नका करु.

**मा.महापौर -** विषय क्रमांक २ उपसूचनेसह मंजुर करणेत येत आहे. आणि त्याची पाहणी करावी.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता--

ठराव क्रमांक- २३६ विषय क्रमांक-२
दिनांक- २०/७/२०१८ विभाग - मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.लेखा/६/कावि/७१७४/२०१८ दि.१८/६/२०१८
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२८२४ दि.१९/०६/२०१८
३) मा.सभापती स्थायी समिती यांचे दिनांक २०/६/२०१८ चे पत्र.
४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक २३० दि.२२/०६/२०१८

शहर अभियंता अ व फ क्षेत्रिय कार्यालय यांनी दि.१५/०६/२०१८ चे प्रस्तावान्वये सन २०१७-१८ अखेर सुमारे ७२५ कोटी रुपये शिल्लक राहिले असल्याची शक्यता आहे. यापैकी सुमारे ५०० कोटी रुपये विविध कामांसाठी अधिच वितरित करण्यात आलेले आहे. वार्षिक लेखे अंतिम व्हावयाचे असलेने उर्वरित रक्कम निश्चितपणे निर्धारित करता येत

नसली तरी सुमारे २२५ कोटीची रक्कम शिल्लक राहणेचे शक्यता आहे. प्रभाग/मुख्यालयातील भांडवली/ महसुली/विशेष योजना/प अंदाजपत्रक यातून रक्कम रुपये २११,५६,८३,१००/- वर्गीकरण करणे शक्य आहे तरी अ व फ क्षेत्रीय कार्यालयासाठी प्रस्तावात नमूद प्रमाणे वर्गीकरण करून मिळणेची विनंती केली होती. त्यानुसार शहर अभियंता यांनी प्रस्तावित केलेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०१ नुसार अखर्चीत निधी र.रू.२२५ कोटी आरंभीचे शिलकेत वाढ करून कलम १०३ अनुसूची ड मधील प्रकरण ७ तरतूद २ (१) नुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे त्या त्या कामांसमोर वाढ/घट करणेस व सन २०१८-१९ च्या भांडवली अंदाजपत्रकात कामाचा समावेश करणेस भांडवली/महसूली प अंदाजपत्रकातील विभागांच्या अंतर्गत वर्गीकरण असल्याने सन २०१८-१९ ची तरतूद अ व फ क्षेत्रीय र.रू.२११,५६,८३,१००/- वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.२११,५६,८३,१००/-) तसेच वरील मा. महापालिका सभा ठराव क्र. २३०, दि. २२/६/२०१८ मधील प्रस्तावात नमुद केले प्रमाणे अनुक्रमांक ५,६,७ ची कामे वगळून त्यात्या कामासमोर वाढ घट करणेस व सन २०१८-१९ च्या भांडवली अंदाजपत्रकात कामांचा समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.तुषार हिंगे :-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- २३७ विषय क्रमांक- ०३
दिनांक- २०/७/२०१८ विभाग - मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र
क्र.भूजी/ट्रेसर-८/कावी/१२२/२०१८
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक २८०७, दि.१३/०६/२०१८

पिंपरी चिंचवड शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्त कार्यालयाकरीता मनपा मालकीची चिंचवड येथील स.नं.१६५ व १६६ सि.स.नं.३२५० मधील आ.क्र.१९४ येथील प्रेमलोक पार्क

शाळा इमारत भाडयाने मिळणेबाबत मा.पोलीस आयुक्त यांनी दि.०८/०५/२०१८ अन्वये मागणी केलेली आहे. त्यानुसार सदर शाळा इमारत

G+ 2 तळमजला + दोन मजले,

भुखंडाचे क्षेत्रफळ एकूण ४४२७.५० चौ.मी.,

तळमजला ७६१.८४ चौ.मी.,

पहिला मजला ७३१.२९ चौ.मी.,

दुसरा मजला ७१२.०० चौ.मी.,

शाळेसमोरील मोकळया मैदानाचे क्षेत्रफळ ३६६५.१६ चौ.मी.,

प्रत्येक मजल्यावर ७ वर्ग खोल्या आहेत व एक सभागृह आहे.

सबब पोलीस आयुक्त कार्यालयास पिं.चिं.मनपा नियम/अटीशर्ती नुसार चिंचवड येथील प्रेमलोक पार्क शाळा इमारतीची जागा भाड्याने देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.संदीप कस्पटे -** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेस आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.शर्मिला बाबर-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ४

दिनांक - २०/०७/२०१८ विभाग- मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र

क्र. लेखा/६/कावि/६९७६/२०१८ दि.१३/०६/२०१८

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक २८२१ दि.१९/०६/२०१८

सह शहर अभियंता, बीआरटीएस विभाग यांनी दि.०४/०६/२०१८ चे प्रस्तावान्वये क्र.१ कामामधील आवश्यक असलेली तरतूद शिल्लक ठेवून उर्वरीत रक्कम क्र.२ कामासाठी उपलब्ध करून देणेकामी प्रस्तावित केलेले आहे. तरी प्रस्तावात नमूद प्रमाणे

र.रू.१,००,००,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी फक्त) विभागांतर्गत वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.१,००,००,०००/-)

**मा.कमल घोलप -** मा. महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.सचिन चिखले -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक. सन्मा. सभागृह महापौर साहेब बीआरटीएसचा एक विषय आपल्यासमोर आहे. आणि संपूर्ण पिंपरी चिंचवड शहराचं जे लक्ष लागलेल आहे ते म्हणजे निगडी भक्तीशक्ती बीआरटीएस ते दापोडी पर्यंतचा बीआरटीएसचा रस्ता. तिथे आपले मेट्रोचे काम चालू आहे आणि गेली कित्येक दिवसापासून हा विषय रखडलेला आहे. सन्मा. महापौर साहेब, त्याच्यावर अनेक अपघात, अनेकांची वाहतूक कोंडी अशा भरपूर गोष्टी अवलंबून आहेत. मी संबंधित बीआरटीएस विभागांना विनंती करतो की हयाच्या संदर्भात आता सध्या न्यायालयीन प्रक्रीयेमध्ये कुठपर्यंत प्रोसेस आहे आणि हा बीआरटीएस कधी चालू करायचा आहे याची सर्व माहिती नगरसदस्यांना देण्यात यावी. कारण की महत्वाच्या रस्त्यावर हे काम चालू आहे. आणि किती दिवस लागतील आणि याचे काय स्टेटस आहे ते जरा सांगावे.

**मा.राहुल कलाटे -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. सभागृह. महापौर क्रमांक १ मधील आवश्यक असलेली तरतूद क्रमांक २ काम. क्रमांक १ म्हणजे कुठले काम. प्रस्तावान्वये क्रमांक १ कामामधील आवश्यक असलेली तरतूद शिल्लक ठेवून उर्वरित रक्कम क्रमांक २ कामासाठी उपलब्ध करुन देणेकामी प्रस्तावित केलेले आहे. कामे तर कळू दया कुठली आहेत. दु.सरे काम कुठले आहे.

**मा.लांडगे सारीका** - मा. महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- पिंपरी चिचवड महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा ठराव क्र. १७७ दि२०/०४/२०१८ मधील 'प्रभाग क्र. ६ धावडेवस्ती मधील आरक्षण क्र. ४३२ ला सिमाभिंत बांधणे व स्थापत्य विषय कामे करणे' या कामामध्ये खालील प्रमाणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेत व कामाच्या नावांत बदल करणेस व प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | अंदाजपत्रकीय | | लेखाशिर्ष | मुळ प्रशासकीय मान्यता | कामाचे सुधारित नाव | सुधारित प्रशासकीय मान्यता | सन २०१८-१९ ची मूळ तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ६ धावडेवस्ती मधील आरक्षण क्र.४३२ ला सिमाभिंत बांधणे व स्थापत्य विषयक काम करणे. | ५० | २१/९ | विशेष योजना | १६,००,००० | प्रभाग क्र. ६ धावडे वस्ती मधील आरक्षण क्र. ४३२ विकसीत करणे | ४०,००,००,००० | १०,७१,००० |

तसेच अंदाजपत्रकात समाविष्ठ खालील कामांस आवश्यक तरतूद शहर विकास आराखडा या लेखाशिर्षामधून वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | प्रशासकीय र.रु. | पान क्र. | अनु.क्र. | उपलब्ध तरतूद र.रु. | आवश्यक तरतूद र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ६ मधील दिवाबत्ती व्यवस्थेचे नुतनीकरण करणे. | सार्वजनिक सुरक्षितता | २००००००० | ३०४ | ४२ | ० | १००००००० |
| २ | प्रभाग क्र. ६ मधे विविध ठिकाणी | सार्वजनिक सुरक्षितता | २००००००० | ३०४ | ४२ | ० | १००००००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | CCTV बसविणे | | | | | | |
| | एकूण | | ४००००००० | | | ० | २००००००० |

तसेच खालील कामाचे नाव अंदाजपत्रकात नव्याने समाविष्ट करुन प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | अंदाजपत्रकीय | | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | मनपाचे वायसीएम हॉस्पिटलसाठी फर्निचर पुरविणे व व्यवस्था करणे. | -- | -- | विशेष योजना | २,५०,००,०००/- |

**मा.मनिषा पवार -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा. शर्मिला बाबर** - मा. महापौर साहेब, उपसूचना स्वीकारली आहे.

**मा. महापौर-** मूळ विषयाची माहिती दया.

**मा. राजेश लांडे (मुख्यलेखापाल)** - मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. सभागृह. इथे मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे ते भक्तीशक्ती चौकापर्यंतचा ४५ मीटर रस्ता विकसित करणे याच्यातील एक कोटी रुपयाची घट करुन ती टेल्को रस्त्यावरील थरमॅक्स चौक ते दुर्गानगर चौक पर्यंतचा रस्ता विकास आराखडयानुसार विकसित करणे यामध्ये एक कोटी रुपये वाढविणे असा प्रस्ताव आहे. ४५ मीटर मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे ते भक्तीशक्ती चौकापर्यंत.

**मा. महापौर** - उपसूचनेसह विषय क्रमांक ४ मंजुर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेस आला असता—

ठराव क्रमांक- २३८ विषय क्रमांक- ४

दिनांक- २०/०७/२०१८ विभाग- मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र. लेखा/६/कावि/६९७६/२०१८ दि.१३/०६/२०१८
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक २८२१ दि.१९/०६/२०१८

सह शहर अभियंता, बीआरटीएस विभाग यांनी दि.०४/०६/२०१८ चे प्रस्तावान्वये क्र.१ कामामधील आवश्यक असलेली तरतूद शिल्लक ठेवून उर्वरीत रक्कम क्र.२ कामासाठी उपलब्ध करून देणेकामी प्रस्तावित केलेले आहे. तरी प्रस्तावात नमूद प्रमाणे र.रू.१,००,००,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी फक्त) विभागांतर्गत वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.(वाढ/घट र.रू.१,००,००,०००/-) तसेच पिंपरी चिचवड महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा ठराव क्र. १७७ दि२०/०४/२०१८ मधील 'प्रभाग क्र. ६ धावडेवस्ती मधील आरक्षण क्र. ४३२ ला सिमाभिंत बांधणे व स्थापत्य विषय कामे करणे' या कामामध्ये खालील प्रमाणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेत व कामाच्या नावांत बदल करणेस व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | अंदाजपत्रकीय | | लेखाशिर्ष | मुळ प्रशासकीय मान्यता | कामाचे सुधारित नाव | सुधारित प्रशासकीय मान्यता | सन २०१८-१९ ची मूळ तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ६ धावडेवस्ती मधील आरक्षण क्र.४३२ ला सिमाभिंत बांधणे व | ५० | २१/९ | विशेष योजना | १६,००,००० | प्रभाग क्र. ६ धावडे वस्ती मधील आरक्षा | ४०,००,००,००० | १०,७१,००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थापत्य विषयक काम करणे. | | | | | क्र. ४३२ विकसीत करणे | | |

तसेच अंदाजपत्रकात समाविष्ठ खालील कामांस आवश्यक तरतूद शहर विकास आराखडा या लेखाशिर्षामधून वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | प्रशासकीय र.रु. | पान क्र. | अनु.क्र. | उपलब्ध तरतूद र.रु. | आवश्यक तरतूद र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ६ मधील दिवाबत्ती व्यवस्थेचे नुतनीकरण करणे. | सार्वजनिक सुरक्षितता | २००००००० | ३०४ | ४२ | ० | १००००००० |
| २ | प्रभाग क्र. ६ मधे विविध ठिकाणी CCTV बसविणे | सार्वजनिक सुरक्षितता | २००००००० | ३०४ | ४२ | ० | १००००००० |
| | एकूण | | ४००००००० | | | ० | २०००००० |

तसेच खालील कामाचे नाव अंदाजपत्रकात नव्याने समाविष्ट करुन प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | अंदाजपत्रकीय | | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | मनपाचे वायसीएम हॉस्पिटलसाठी फर्निचर पुरविणे व व्यवस्था करणे. | -- | -- | विशेष योजना | २,५०,००,०००/- |

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.भिमाबाई फुगे-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- २३९ विषय क्रमांक- ५

दिनांक- २०/०७/२०१८ विभाग- मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र

क्र.नरवि/कावि/०९/६१/२०१८, दि.२७/०४/२०१८

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.७ दि.१२/०६/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे वाकड पिंपळे निलख, थेरगाव या भागातील वाढती लोकसंख्या विचारात घेता व मुळा नदीच्या प्रदुषणाचा विचार करता, सदर भागात मौजे पिंपळे निलख स. नं. ६५ येथे असलेल्या अस्तीत्वातील मैलाशुद्धीकरण प्रकल्पाची क्षमता कमी पडत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी नवीन प्रकल्प उभारणे आवश्यक आहे. मौजे पिंपळे निलख येथील स.नं. ६४ व ६५ मधील आ. क्र. ३७४ (उद्यान) करीता ४.५० हेक्टर क्षेत्र आरक्षित असून ४.०० हेक्टर क्षेत्र मनपाचे ताब्यात आलेले आहे. सदरच्या ताब्यातील ४.०० हेक्टर क्षेत्रामधील काही क्षेत्रामध्ये सध्या मैलाशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित आहे. सध्याच्या मैलाशुद्धीकरण केंद्र प्रकल्पाची क्षमता वाढविणेबाबतची जलनि:सारण विभागाची मागणी असून त्याकरीता एकूण २.५० हेक्टर जागा मैलाशुध्दीकरण केंद्रासाठी लागणार आहे. त्यामुळे उद्यानाच्या जागा वापर मध्ये फेरबदल करून मैलाशुद्धीकरण (STP), उद्यान (G) असा फेरबदल करणेकरीता मंजुर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास तसेच फेरबदलाची विहीत कार्यवाही करून प्रस्ताव शासन मंजूरीस्तव सादर करण्यास मा.महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा. घुले नानी उर्फ हिराबाई** - मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.तुषार कामठे** - मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. सभागृह. आज आपण एसटीपीचा जो विषय सभेमध्ये घेतलेला आहे. याच्याआधी २० एमएलडीचा एक प्लांट आमच्या पिंपळे

निलखमध्ये असून तिथे व्हीटेक बाबा या कंपनीला आपण ते काम मेटेंनन्सचे दिले होते. त्या कामाची क्वॉलिटी चांगली नसल्यामुळे आपण त्याला ब्लॅकलिस्टला पण टाकले होते. त्याच्या जागी डब्ल्यूडी या कंपनीला ते काम दिले होते. आज पण व्हिटेक बाबाची लोक या प्लांटमध्ये काम पाहतात. आणि डब्ल्यूडी यांनी फक्त मध्यस्थी केलेली आहे. हा प्लांट २४ तास चालू नसतो फक्त १० तास प्लांट चालतो. आठ दिवसातले तीन दिवस हा प्लांट बंद असतो. तिथे जाताना येताना त्या वासाने नको नको होत असते. पहिल्याच प्लांटची आपली ही अवस्था असताना नवीन प्लांट तिथे आपण आणताय ते कशा पध्दतीचे आपले नियोजन आहे हे आपण आम्हाला सांगावे व पहिला प्लांट हा व्यवस्थित चालविल्याशिवाय तिथे नवीन प्लांट घेऊ नये अशी आमची विनंती आहे. आमचा एसटीपी प्लांटला अजिबात विरोध नाही. पण पहिला जो प्लांट आपण घेतलाय तो व्यवस्थित चालू नसताना हा कशाला घेताय. हि आमची आपल्याला विचारणा आहे याच्याबद्दल आपण आम्हाला खुलासा दयावा. ज्या कंपनीला आपण ब्लॅकलीस्टला टाकलय त्याच कंपनीची लोक आज तिथे असतात तेच प्लांट चालवितात. त्याच्यामागचे कारण काय हे आपण येथे आम्हाला सांगावे हि विनंती, धन्यवाद.

**मा.संदिप कस्पटे :-** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. सभागृह. प्रभाग क्रमांक २६ मधील वाकड ते पिंपळे निलख मौजे पिंपळे निलख येथील सर्व्हे नंबर ६४ व ६५ यामध्ये आरक्षण क्रमांक ३७४ हे उदयानाकरीता एकूण साडेचार हेक्टर जमीन आरक्षित आहे. त्यापैकी चार हेक्टर जागा महापालिकेच्या ताब्यात आहे. काही क्षेत्रामध्ये मैला शुद्धीकरण प्रकल्प आता कार्यान्वीत आहे व उर्वरित जागेवर उदयानाचे प्रस्तावीत आहे. महापौर साहेब, वाकड आणि पिंपळे निलख हा भाग झपाटयाने विकसित होत आहे. मोठे मोठे गृहप्रकल्प याठिकाणी उभे होत आहेत. या भागामध्ये लक्षनीयरित्या नागरीकरण वाढत आहे. भविष्यातील लोकसंख्येचा विचार करता व मुळा नदीच्या प्रदूषणाचा देखील विचार करुन मौजे पिंपळे निलख येथील आरक्षण क्रमांक ३७४ मधील मैला शुध्दीकरण केंद्राची क्षमता वाढविण्यासाठी आडीच हेक्टर जागेची जलनि:सारण विभागाची मागणी आहे. त्यामुळे उद्दयानाच्या जागा वापरामध्ये फेरबदल करुन एसटीपी व गार्डन असा फेरबदल करुन एसटीपी व गार्डन असा फेरबदल सेक्शन ३७ अन्वये विहीत कार्यवाही करुन प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करणेत यावा अशी मी याठिकाणी मागणी करतो.

**मा.संदीप वाघेरे-** मा. महापौर साहेब, अनुमोदन आहे.

**मा.महापौर-** हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

**मा.एकनाथ पवार-** मा. महापौर साहेब, या विषयाला उपसूचना दयायची होती.

**मा.महापौर-** विषय मंजूर केला आहे. आता सदर उपसूचना पुढील विषयाला दयावी.
मुळ विषय मंजूर करणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.सुनिता तापकीर -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ६

दिनांक - २०/७/२०१८ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/१५/१७५/२०१८, दि.१९/०६/२०१८
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११ दि.२/०७/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र.पीसीसी/३०९६/१८०१/सीआर–२६१/नवि-२२, दिनांक–११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसुचना क्र.टीपीएस–१८०५/१०५०/सीआर–७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि.१८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिध्द केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून शासन निर्णय क्र.टीपीएस/१८१२/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२/ईपी मंजूरी/नवि-१३, दिनांक ०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागाच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे.

मौजे चिखली येथील पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्ता / आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | आ. क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | गट नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | चौ.मी. |
| १. | - | मंजूर विकास योजनेतील १८ मी. रुंद रस्ता | सि.स.नं. ६५, ६६, ६७, ८८ व ६८९, तसेच गट नं. १२३ व गट नं. १६४३ | ४२००.०० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.निर्मला कुटे**- मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.महापौर-** हा विषय उपसूचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, या विषयाला उपसूचना दिली नाही.

**(**सभा कामकाज नियमावलीमधील नियम क्रमांक ११३ नुसार नगरसचिव यांनी वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिल्यानंतर आणि मा.सभागृहनेता यांची विनंती विचारात घेवून मा.महापौर यांनी नियमानुसार उपाययोजना करणेच्या दृष्टिने खालील प्रमाणे उपसूचना दाखल करुन घेण्यास आणि त्याबाबतची रितसर नोंद सभावृत्तांतात घेण्यास मान्यता दिली.**)**

**मा.सागर आंगोळकर -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मौजे वाकड येथील प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ठ करण्यात आलेल्या स.नं. १८७ या मिळकतीमध्ये आ.क्र. एम.४७ माध्यमामिक शाळेचे आरक्षण आहे. सदरच्या भागात मोठया प्रमाणात शाळा कार्यरत आहेत. आ.क्र. एम ४७ यांचे एकुण क्षेत्रफळ १६,००० चौ.मी. असून, त्यापैकी ६२०० चौ.मी. क्षेत्रावर "युरोस्कुल" नावाने सद्यस्थितीत शाळा कार्यरत आहे. त्यामुळे आ.क्र. एस ४७ माध्यमिक शाळा मधील उर्वरित आरक्षणाचे क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये "खेळाचे मैदान" या प्रमाणे फेरबदल करण्यास तसेच फेरबदलाची विहीत कार्यवाही करुन प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करण्यास मा.महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजुर विकास योजनेतील तसेच कलम २०५ अंतर्गत घोषीत रस्ते व आरक्षणे इत्यादी महापालिकेमार्फत ताब्यात घेऊन विकसित करणेत येतात. सदरची आरक्षणे रस्ते इत्यादी

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम १२६ अन्वये ( यापुढे उपरोक्त अधिनियम असे संबोधले आहे) ताब्यात घेऊन संबंधित जागा मालकांना एफ.एस.आय/टी.डी.आर/डी.आर. स्वरुपात किंवा खाजगी वाटाघाटीने अथवा भूसंपादनाने जागेचे मुल्य अदा करण्यात येते. खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करण्याविषयी यापुर्वी मा.महापालिका सभेने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. तरी खाजगी वाटाघाटीने मोबदला देणेकामी महानगरपालिकेकडे प्राप्त होणा-या प्रस्तावासाठी उपरोक्त अधिनियमान्वये प्रशासकीय मान्यतेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान केल्यास खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करण्याची प्रक्रिया सुलभ होईल.

तरी महानगरपालिका मंजूर विकास योजनेतील तसेच कलम २०५ अंतर्गत घोषित रस्ते व आरक्षणे इत्यादी क्षेत्र खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेणेकामीचे दाखल होणा-या सर्व प्रस्तावांना उपरोक्त अधिनियमान्वये प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत मंजुर विकास योजनेतील मौजे दिघी येथील ६० मी.रुंद रस्ता (बी.आर.टी.रस्ता) विकसनाचे काम चालु आहे. सदर रस्ता विकसीत झाल्यास पुढे पुणे मनपा हद्दीतील मौजे कळस पर्यंत व पुढे लोहगाव विमानतळापर्यंत जोडला जाणार आहे, पुणे मनपा हद्दीतील मौजे कळस ते विमानतळ रस्ता विकसीत झालेला आहे. तथापि पिंपरी चिंचवड हद्दीतील दिघी व पुणे मनपा हद्दीतील मौजे कळस या मध्ये VSNL चे क्षेत्र आहे, व सदरच्या क्षेत्र दोन्ही महापालिका हद्दीमध्ये समाविष्ठ नाही, त्यामुळे सदर VSNL चे क्षेत्र खाजगी वाटाघाटीने/भूसंपादनाने ताब्यात घेता येत नाही व विकसीत करता येत नाही. पिंपरी चिंचवड मनपा मार्फत सदर VSNL चे क्षेत्र पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत समाविष्ठ करणेसाठी शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे. तथापि त्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे, त्यामुळे मौजे दिघी व मौजे कळस या मधील अंदाजे २.०० कि.मी.रस्ता विकास योजना व्यतिरीक्त असल्याने व मनपा हद्दी बाहेर असल्याने महाराष्ट्र महापालिका अधिनियम व नविन भूसंपादन कायदयानुसार संपादन करणे/खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेण्यास व येणा-या खर्चास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका ठराव क्र. ४५०६ दि. १९/०६/२००१ कृपया पहावा. सदर ठरावाप्रमाणे मौजे चिंचवड येथील लोकमान्य हॉस्पिटल ते दळवीनगर १२.०० मी. रुंद रस्त्यावरील श्री.मल्होत्रा

यांची इमारत सि.स.नं. ३८७८ ही मिळकत वगळून भूसंपादनाच्या कार्यवाहीमुळे त्यांचे झालेले नुकसान भरपाई अधिनियम १८९४ चे कलम ४८ अन्वये परत करणेस तसेच विकास योजने व्यतिरीक्त रस्त्याच्या भूसंपादनाची कार्यवाही पुर्ण करण्यास मान्यता देण्यात आली होती.

सदर ठरावानुसार शेजारील सि.स.नं. ३१९१/१ मधुन १२.०० मी.रस्त्याचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे. तसेच स.नं. ३८७८ येथील घरामध्ये श्री.मल्होत्रा यांचे अजूनही वास्तव्य असून भूसंपादनाची कार्यवाही प्रत्यक्ष स्थानावर करण्यात आलेली नाही. सदर मालमत्तेस धारक म्हणून मल्होत्रा कुटूंबातील चौघांची नावे दखील लागली आहेत, तसेच तेथून आता रस्त्याची गरजही उरलेली नाही. श्री.मल्होत्रा यांनी भूसंपादनाचा मोबदलाही स्विकारलेला नाही.

तेव्हा श्री.मल्होत्रा यांची इमारत सि.स.नं.३८७८ ही मिळकत भूसंपादनातून वगळण्यात यावी हा ठराव विशेष भूसंपादन अधिकारी/जिल्हाधिकारी यांच्यामार्फत विभागीय आयुक्त तसेच शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात यावा आणि भूसंपादन अधिनियम १९८४ च्या कलम ४८ प्रमाणे भूसंपादन कार्यवाही पुर्ण झालेली नसल्याने सि.स.नं.३८७८ बाबत भूसंपादनाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी.

उपरोक्त मिळकत मंजूर विकास योजनेत १२.०० मी. रुंद नियोजीत रस्त्याने बाधीत होत होती. तथापि प्रत्यक्ष जागेवर १२.०० मी. रस्त्याचा विकास करतांना रस्त्याची आखणी बदलून रस्ता विकसित करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर मिळकतीची आता १२.०० मी. विकास योजना रस्त्यासाठी आवश्यकता नाही. सबब १२.०० मी. विकास योजना रस्त्याच्या आखणीत जागेवरील परिस्थितीनुसार फेरबदल करणे आवश्यक आहे. सबब सदरचा फेरबदल महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियामाच्या कलम ३७ अन्वये करणेस महासभा मान्यता प्रदान करीत असून त्यानुसार कलम ३७ अन्वये करावयाची संपुर्ण वैधानिक कार्यवाही पुर्ण करण्यास मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना अधिकार प्रदान करण्यात येत असून त्यानुसार कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यासही मा.आयुक्त यांना या ठरावाव्दारे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. तसेच कलम ३७ ची कार्यवाही पुर्ण करुन आयुक्तांनी शासनास प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करावा. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे कासारवाडी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं.४७५, ४७६, ४७७, ४७८, ४७९, ४८०, ४८१, ४८२, ४८३, ४८४, ४८७, ४८९, ४९०, ४९१, ४९२, ४९३, ४९४, ४९५, ४९६, ६९९ पैकी मधील मंजूर विकास आराखडयातील

३०.०० मी. रुंद उच्च क्षमता द्दतगतीमार्ग (HCMTR) या प्रस्तावित आरक्षणाचा विकास करणे आवश्यक आहे. सदरचे मंजूर विकास  आराखडयातील ३०.०० मी. रुंद उच्च क्षमता द्दतगतीमार्ग (HCMTR) या आरक्षणाचा विकास केल्यामुळे कासारवाडी व परिसरातील वाहतूकीची कोंडी कमी होऊन वाहतूक सुरळीत होणेस मदत होणार सदरचे आरक्षण विकसित होणे गरजेचे आहे. मौजे कासारवाडी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं. ४७५, ४७६, ४७७, ४७८, ४७९, ४८०, ४८१, ४८२, ४८३, ४८४, ४८७, ४८९, ४९०, ४९१, ४९२, ४९३, ४९४, ४९५, ४९६, ६९९ पैकी मधील मंजूर विकास आराखडयातील ३०.०० मी. रुंद उच्च क्षमता द्दतगतीमार्ग (HCMTR) या आरक्षणाखालील जमिनीचे भूसंपादन नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामीचा भूसंपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे कासारवाडी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं. ४७९, ४८०, ४८१, ४८२, ४८३, ४८४, ४८७, ४८९, ४९०, ४९१, ४९२, ४९३, ४९४, ४९५, ४९६, ६९९ पैकी मधील व स.नं. ४८२, ४८३, ४८४, ४८६, ४८७, ४८९, ४९०, ४९१, ४९२, ४९३ पैकी मधील मंजूर विकास आराखडयातील १२.०० मी.रुंद रस्ता या प्रस्तावित रस्त्यांच्या आरक्षणाचा विकास करणे आवश्यक आहे. सदरचे मंजूर विकास आराखडयातील १२.०० मी.रुंद रस्त्याचा विकास केल्यामुळे कासारवाडी व परिसरातील वाहतूकीची कोंडी कमी होऊन वाहतूक सुरळीत होणेस मदत होणार असल्यामुळे सदरचे रस्त्यांचा विकसित होणे गरजेचे आहे. मौजे कासारवाडी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं. ४७९, ४८०, ४८१, ४८२, ४८३, ४८४, ४८७, ४८९, ४९०, ४९१, ४९२, ४९३, ४९४, ४९५, ४९६, ६९९ पैकी मधील व स.नं. ४८२, ४८३, ४८४, ४८६, ४८७, ४८९, ४९०, ४९१, ४९२, ४९३ पैकी मधील मंजूर विकास आराखडयातील १२.०० मी.रुंद रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामीचा भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत यावी.

**मा.एकनाथ पवार –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सुनिता तापकीर –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर-** उपसूचनेसह विषय मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेस आला असता-

ठराव क्रमांक- २४०
दिनांक - २०/७/२०१८

विषय क्रमांक- ६
विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नरवि/कावि/१५/१७५/२०१८, दि.१९/०६/२०१८
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.११
दि.२/०७/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र.पीसीसी/३०९६/१८०१/सीआर–२६१/नवि-२२, दिनांक–११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसुचना क्र.टीपीएस–१८०५/१०५०/सीआर–७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि.१८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिध्द केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून शासन निर्णय क्र.टीपीएस/१८१२/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२/ईपी मंजूरी/नवि-१३, दिनांक ०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागाच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे.

मौजे चिखली येथील पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्ता / आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | आ. क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | गट नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | - | मंजूर विकास योजनेतील १८ मी. रुंद रस्ता | सि.स.नं. ६५, ६६, ६७, ८८ व ६८९, तसेच गट नं. १२३ व गट नं. १६४३ | ४२००.०० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे वाकड येथील प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ठ करण्यात आलेल्या स.नं. १८७ या मिळकतीमध्ये आ.क्र. एम.४७ माध्यमामिक शाळेचे आरक्षण आहे. सदरच्या भागात मोठया प्रमाणात शाळा कार्यरत आहेत. आ.क्र. एम ४७ यांचे एकुण क्षेत्रफळ १६,००० चौ.मी. असून, त्यापैकी ६२०० चौ.मी. क्षेत्रावर “युरोस्कुल” नावाने सद्यस्थितीत शाळा कार्यरत आहे. त्यामुळे आ.क्र. एस ४७ माध्यमिक शाळा मधील उर्वरित आरक्षणाचे क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये “खेळाचे मैदान” या प्रमाणे फेरबदल करण्यास तसेच फेरबदलाची विहीत कार्यवाही करुन प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करण्यास मा.महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजुर विकास योजनेतील तसेच कलम २०५ अंतर्गत घोषीत रस्ते व आरक्षणे इत्यादी महापालिकेमार्फत ताब्यात घेऊन विकसित करणेत येतात. सदरची आरक्षणे रस्ते इत्यादी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम १२६ अन्वये (यापुढे उपरोक्त अधिनियम असे संबोधले आहे) ताब्यात घेऊन संबंधित जागा मालकांना एफ.एस.आय/टी.डी.आर/डी.आर. स्वरुपात किंवा खाजगी वाटाघाटीने अथवा भूसंपादनाने जागेचे मुल्य अदा करण्यात येते. खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करण्याविषयी यापुर्वी मा.महापालिका सभेने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. तरी खाजगी वाटाघाटीने मोबदला देणेकामी महानगरपालिकेकडे प्राप्त होणा-या प्रस्तावासाठी उपरोक्त अधिनियमान्वये प्रशासकीय मान्यतेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान केल्यास खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करण्याची प्रक्रिया सुलभ होईल.

तरी महानगरपालिका मंजूर विकास योजनेतील तसेच कलम २०५ अंतर्गत घोषित रस्ते व आरक्षणे इत्यादी क्षेत्र खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेणेकामीचे दाखल होणा-या सर्व प्रस्तावांना उपरोक्त अधिनियमान्वये प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत मंजुर विकास योजनेतील मौजे दिघी येथील ६० मी.रुंद रस्ता (बी.आर.टी.रस्ता) विकएसनाचे काम चालु आहे. सदर रस्ता विकसीत झाल्यास पुढे पुणे मनपा हद्दीतील मौजे कळस पर्यंत व पुढे लोहगाव विमानतळापर्यंत जोडला जाणार आहे, पुणे मनपा हद्दीतील मौजे कळस ते विमानतळ रस्ता विकसीत झालेला आहे. तथापि पिंपरी चिंचवड हद्दीतील दिघी व पुणे मनपा हद्दीतील मौजे कळस या मध्ये VSNL चे क्षेत्र आहे, व सदरच्या क्षेत्र दोन्ही महापालिका हद्दीमध्ये समाविष्ठ नाही, त्यामुळे सदर VSNL चे क्षेत्र खाजगी वाटाघाटीने/भूसंपादनाने ताब्यात घेता येत नाही व विकसीत करता येत नाही. पिंपरी चिंचवड मनपा मार्फत सदर VSNL चे क्षेत्र पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत समाविष्ठ करणेसाठी शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे. तथापि त्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे, त्यामुळे मौजे दिघी व मौजे कळस या मधील अंदाजे २.०० कि.मी.रस्ता विकास योजना व्यतिरीक्त असल्याने व मनपा हद्दी बाहेर असल्याने महाराष्ट्र महापालिका अधिनियम व नविन भूसंपादन कायदयानुसार संपादन करणे/खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेण्यास व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका ठराव क्र. ४५०६ दि. १९/०६/२००१ कृपया पहावा. सदर ठरावाप्रमाणे मौजे चिंचवड येथील लोकमान्य हॉस्पिटल ते दळवीनगर १२.०० मी. रुंद रस्त्यावरील श्री.मल्होत्रा यांची इमारत सि.स.नं. ३८७८ ही मिळकत वगळून भूसंपादनाच्या कार्यवाहीमुळे त्यांचे झालेले नुकसान भरपाई अधिनियम १८९४ चे कलम ४८ अन्वये परत करणेस तसेच विकास योजने व्यतिरीक्त रस्त्याच्या भूसंपादनाची कार्यवाही पुर्ण करण्यास मान्यता देण्यात आली होती.

सदर ठरावानुसार शेजारील सि.स.नं. ३१९१/१ मधुन १२.०० मी.रस्त्याचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे. तसेच स.नं. ३८७८ येथील घरामध्ये श्री.मल्होत्रा यांचे अजूनही वास्तव्य असून भूसंपादनाची कार्यवाही प्रत्यक्ष स्थानावर करण्यात आलेली नाही. सदर मालमत्तेस धारक म्हणून मल्होत्रा कुटूंबातील चौघांची नावे देखील लागली आहेत, तसेच

तेथून आता रस्त्याची गरजही उरलेली नाही. श्री.मल्होत्रा यांनी भूसंपादनाचा मोबदलाही स्विकारलेला नाही.

तेव्हा श्री.मल्होत्रा यांची इमारत सि.स.नं.३८७८ ही मिळकत भूसंपादनातून वगळण्यात यावी हा ठराव विशेष भूसंपादन अधिकारी/जिल्हाधिकारी यांच्यामार्फत विभागीय आयुक्त तसेच शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात यावा आणि भूसंपादन अधिनियम १९८४ च्या कलम ४८ प्रमाणे भूसंपादन कार्यवाही पुर्ण झालेली नसल्याने सि.स.नं.३८७८ बाबत भूसंपादनाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी.

उपरोक्त मिळकत मंजूर विकास योजनेत १२.०० मी. रुंद नियोजीत रस्त्याने बाधीत होत होती. तथापि प्रत्यक्ष जागेवर १२.०० मी. रस्त्याचा विकास करतांना रस्त्याची आखणी बदलून रस्ता विकसित करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर मिळकतीची आता १२.०० मी. विकास योजना रस्त्यासाठी आवश्यकता नाही. सबब १२.०० मी. विकास योजना रस्त्याच्या आखणीत जागेवरील परिस्थितीनुसार फेरबदल करणे आवश्यक आहे. सबब सदरचा फेरबदल महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियामाच्या कलम ३७ अन्वये करणेस महासभा मान्यता प्रदान करीत असून त्यानुसार कलम ३७ अन्वये करावयाची संपुर्ण वैधानिक कार्यवाही पुर्ण करण्यास मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना अधिकार प्रदान करण्यात येत असून त्यानुसार कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यास मा.आयुक्त यांना या ठरावाव्दारे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. तसेच कलम ३७ ची कार्यवाही पुर्ण करुन आयुक्तांनी शासनास प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे कासारवाडी, ता.हवेली,जि.पुणे येथील स.नं.४७५, ४७६, ४७७, ४७८, ४७९, ४८०, ४८१, ४८२, ४८३, ४८४, ४८७, ४८९, ४९०, ४९१, ४९२, ४९३, ४९४, ४९५, ४९६, ६९९ पैकी मधील मंजूर विकास आराखडयातील ३०.०० मी. रुंद उच्च क्षमता द्रतगतीमार्ग (HCMTR) या प्रस्तावित आरक्षणाचा विकास करणे आवश्यक आहे. सदरचे मंजूर विकास आराखडयातील ३०.०० मी. रुंद उच्च क्षमता द्रतगतीमार्ग (HCMTR) या आरक्षणाचा विकास केल्यामुळे कासारवाडी व परिसरातील वाहतूकीची कोंडी कमी होऊन वाहतूक सुरळीत होणेस मदत होणार सदरचे आरक्षण विकसित होणे गरजेचे आहे. मौजे कासारवाडी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं. ४७५, ४७६, ४७७, ४७८, ४७९, ४८०, ४८१, ४८२, ४८३, ४८४, ४८७, ४८९, ४९०, ४९१, ४९२, ४९३, ४९४, ४९५, ४९६, ६९९ पैकी मधील मंजूर विकास आराखडयातील ३०.०० मी.

रुंद उच्च क्षमता द्रुतगतीमार्ग (HCMTR) या आरक्षणाखालील जमिनीचे भूसंपादन नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामीचा भूसंपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे कासारवाडी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं. ४७९, ४८०, ४८१, ४८२, ४८३, ४८४, ४८७, ४८९, ४९०, ४९१, ४९२, ४९३, ४९४, ४९५, ४९६, ६९९ पैकी मधील व स.नं. ४८२, ४८३, ४८४, ४८६, ४८७, ४८९, ४९०, ४९१, ४९२, ४९३ पैकी मधील मंजूर विकास आराखडयातील १२.०० मी.रुंद रस्ता या प्रस्तावित रस्त्यांच्या आरक्षणाचा विकास करणे आवश्यक आहे. सदरचे मंजूर विकास आराखडयातील १२.०० मी.रुंद रस्त्याचा विकास केल्यामुळे कासारवाडी व परिसरातील वाहतूकीची कोंडी कमी होऊन वाहतूक सुरळीत होणेस मदत होणार असल्यामुळे सदरचे रस्त्यांचा विकसित होणे गरजेचे आहे. मौजे कासारवाडी, ता.हवेली, जि.पुणे येथील स.नं. ४७९, ४८०, ४८१, ४८२, ४८३, ४८४, ४८७, ४८९, ४९०, ४९१, ४९२, ४९३, ४९४, ४९५, ४९६, ६९९ पैकी मधील व स.नं. ४८२, ४८३, ४८४, ४८६, ४८७, ४८९, ४९०, ४९१, ४९२, ४९३ पैकी मधील मंजूर विकास आराखडयातील १२.०० मी.रुंद रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामीचा भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -८१ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.राजापुरे माधवी** - मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- २४१ विषय क्रमांक- ७

दिनांक - २०/७/२०१८ विभाग - मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.लेखा/०६/कावि/६९६८/२०१८, दि.१३/०६/२०१८

शहर अभियंता स्थापत्य (ह क्षेत्रिय कार्यालय) यांनी दि.२९/०५/२०१८ च्या प्रस्तावान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील ह

क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या प्रथम प्राधान्याने करावयाच्या कामासाठी अपुरी तरतुद ठेवण्यात आलेली असल्याने सदर कामांचे तरतुदीमध्ये वाढ करणे अत्यावश्यक असलेचे प्रस्तावित केले होते. सदर तरतूदीत सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील महापौर विकास निधी या लेखाशिर्षातील शिल्लक र.रु.५ कोटीतून उपलब्ध तरतूदीतून देणेबाबत मा.महापौर यांनी दि.२५/०५/२०१८ चे पत्रान्वये शिफारस केलेली आहे. त्यानुसार प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे र.रु. १०,२०,०००/- चे वर्गीकरण करणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली असलेने केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत आले. (वाढ/घट र.रु. १०,२०,०००/-)

**मा.उषा ऊर्फ माई ढोरे -** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेस आला असता--

अनुकूल-८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.नामदेव ढाके -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- २४२ विषय क्रमांक- ८
दिनांक- २०/७/२०१८ विभाग- मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.लेखा/कावि/०६/६९७१/२०१८, दि.१५/०५/२०१८

शहर अभियंता स्थापत्य (क क्षेत्रिय कार्यालय) यांनी दि.२९/०५/२०१८ च्या प्रस्तावान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील क क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या प्रथम प्राधान्याने करावयाच्या कामासाठी अपुरी तरतुद ठेवण्यात आलेली असल्याने सदर कामांचे तरतुदीमध्ये वाढ करणे अत्यावश्यक असलेचे प्रस्तावित केले होते. सदर तरतूदीत सन २०१८ - १९ च्या अंदाजपत्रकातील महापौर विकास निधी या लेखाशिर्षातील शिल्लक र.रु.५ कोटीतून उपलब्ध तरतूदीतून देणेबाबत मा. महापौर यांनी दि.२५/०५/२०१८ चे पत्रान्वये शिफारस केलेली आहे. त्यानुसार प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे र.रु.३,८०,०००/- चे वर्गीकरण करणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली असलेने केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत आले. (वाढ/घट र.रु.३,८०,०००/-)

**मा. सागर आंगोळकर -** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेस आला असता-

अनुकूल -८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.कमल घोलप -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- २४३ विषय क्रमांक- ९

दिनांक- २०/७/२०१८ विभाग- मा. आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त, यांचे क्र.लेखा/६/कावि/६९७३/२०१८, दि.१३/०६/२०१८

शहर अभियंता स्थापत्य (फ क्षेत्रिय कार्यालय) यांनी दि.२९/०५/२०१८ च्या प्रस्तावान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या प्रथम प्राधान्याने करावयाच्या कामासाठी अपुरी तरतुद ठेवण्यात आलेली असल्याने सदर कामांचे तरतुदीमध्ये वाढ करणे अत्यावश्यक असलेचे प्रस्तावित केले होते. सदर तरतूदीत सन २०१८- १९ च्या अंदाजपत्रकातील महापौर विकास निधी या लेखाशिर्षातील शिल्लक र.रु ५ कोटीतून उपलब्ध तरतूदीतून देणेबाबत मा. महापौर यांनी दि. २५/५/२०१८ चे पत्रान्वये शिफारस केलेली आहे. त्यानुसार प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे र.रु.१,३२,४०,०००/- चे वर्गीकरण करणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली असलेने केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत आले. (वाढ/घट र.रु. १,३२,४०,०००/-)

**मा.शर्मिला बाबर** - मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता--

अनुकूल-८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.विलास मडिगेरी -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- २४४ विषय क्रमांक- १०
दिनांक- २०/७/२०१८ विभाग- मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त, यांचे क्र.लेखा/६/कावि/७०५१/२०१८, दि.१४/०६/२०१८

शहर अभियंता स्थापत्य (ड क्षेत्रिय कार्यालय) यांनी दि.०५/०६/२०१८ च्या प्रस्तावान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाच्या प्रथम प्राधान्याने करावयाच्या कामासाठी अपुरी तरतुद ठेवण्यात आलेली असल्याने सदर कामांचे तरतुदीमध्ये वाढ करणे अत्यावश्यक असलेचे प्रस्तावित केले होते. सदर तरतूदीत सन २०१८ - १९ च्या अंदाजपत्रकातील महापौर विकास निधी या लेखाशिर्षातील शिल्लक र.रु.५ कोटीतून उपलब्ध तरतूदीतून देणेबाबत मा.महापौर यांनी दि. २५/०५/२०१८ चे पत्रान्वये शिफारस केलेली आहे. त्यानुसार प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे र.रु.५,००,०००/- चे वर्गीकरण करणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली असलेने केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत आले. (वाढ/घट र.रु. ५,००,०००/-)

**मा.नामदेव ढाके -** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.मंगला कदम -** मा. महापौर, मा.आयुक्त, सर्व सन्मा. सभागृह. खरतर तुम्ही महापौर निधी वाढवून घ्या आणि प्रत्येक प्रभागाला दया. आमच्या अनुराधाताईंवर तुम्ही काय अन्याय केलाय. आम्ही दोन कोटी मागितलेले आहेत. हो आमच्यावर पण अन्याय केलाय. दोन कोटी रुपये आमच्या अ प्रभाग कार्यालयामध्ये आम्ही प्रभाग कार्यालय बांधणार आहोत. फ प्रभागाचे जे ऑफिस आहे महापौर साहेब, सिरीअसली सांगते की फ प्रभागाचे जे ऑफिस आहे ते भाडयाने आपण प्राधिकरणाकडून घेतलेले आहे आणि आपण नव्याने जे अ प्रभागामध्ये मोठे कार्यालय बांधणार आहोत त्याच्यासाठी दोन कोटीची उपसूचना आम्ही मागतोय तुम्हाला, तुम्ही दयायला हवी. भाडे जर आपण एवढ भरीत असेल तर आमची ही उपसूचना मान्य करा ना. महापौराना वाढवून दया कोण नाही म्हणलय आम्ही सभागृहाला सांगतोय महापौरांना अजून दोन कोटी रुपये वाढवून दयावेत. आणि अ प्रभागासाठी दोन

कोटी रुपये हे फ प्रभागाचे नगरसेवक प्राधिकरणामध्ये भाडयाने कार्यालयात बसतात. त्याच्यासाठी तिथे आपले कार्यालय असावे. महापौर त्याला आपले अनुमोदन देते.

**मा.एकनाथ पवार -** मा. महापौर, मा. आयुक्त, सर्व सन्मा. सभागृह. खरतर सगळयांचा मूड चांगला आहे. मला कल्पना आहे पण कधी कधी हे सगळे नगरसेवक प्रयत्न करतात की आपण चांगल काम करावे. आणि मला असं वाटते की एवढया वर्षाचा या सभागृहाचा अनुभव तुमच्याकडे आहे. माझ्यासारख्या एका कार्यकर्त्यांना असं वाटत की नवीन नगरसेवकांना सभाशास्त्रामध्ये चांगले शिकविले गेले पाहिजे आणि तुम्ही तर मास्टर आहात त्याच्यामधले. तुम्ही ज्या पध्दतीने म्हणता की फ प्रभागाला खरच कार्यालय नाही. तर मला असं वाटत की फ प्रभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये चांगली जागा बघून दोन काय पाच कोटी रुपये लागू दया. आपण या सभागृहामधून निश्चितच चांगली तरतूद करुन घेऊ. अ ला आपण भेदभाव नाही करत. मी पहिल्याच दिवशी सांगितल होत की विकास कामामध्ये आम्ही कधी ही भेदभाव करणार नाही. "सबका साथ सबका विकास" हे विकासाचे आमचे धोरणच आहे. त्यामुळे तशी चिंता करायच काही कारण नाही. मा.महापौर, हा विषय मंजुर करावा आणि पुढचा विषय घ्यावा.

**मा.महापौर-** विषय मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.नामदेव ढाके-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ११

दिनांक २०/७/२०१८ विभाग : मा. आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१५/२०१८
दि.२५/०६/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागा मार्फत महानगरपालिका हद्दीमधिल ओला व सुका कचरा संकलन करण्यात येत असून प्रत्येक प्रभाग स्थरावर कचरा

संकलनासाठी ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलन करण्यासाठी छोट्या वाहनांची व्यवस्था महानगरपालिके मार्फत करण्यात आलेली आहे. तथापी ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलन करण्यासाठीची वाहने पार्किंग करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था नाही. त्यामुळे महानगरपालिका हद्दीमध्ये महानगरपालिकेच्या नियोजन प्राधिकरण कक्षेमधिल काही आरक्षित जागांमध्ये “ट्रान्सफर स्टेशन” या प्रयोजनार्थ जागा आरक्षित करणे आवश्यक वाटते. त्यास अनुसरुन मा. आयुक्त यांचा दिनांक २८/०७/२०१७ चा मंजूर प्रस्तावानुसार, तसेच आरोग्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २२/०३/२०१७ चे पत्रान्वये मागणी मौजे भोसरी (कासारवाडी) आ.क्र.३१ एस.टी.पी. अंतर्गत स.नं.५१४, मौजे सांगवी मधिल हरितपट्ट्यातील स.नं.८४, व मौजे भोसरी आ.क्र.४०५ अंतर्गत स.नं.२१० या ठिकाणी ४०० चौ.मी. क्षेत्राची जागा, तसेच मौजे पिंपळे निलख आ.क्र.३७४ गार्डन अंतर्गत स.नं.६५ मधिल ४०० चौ. मी. क्षेत्राची जागा १२.०० मी. रुंद पोहच रस्त्यासह महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये “ट्रान्सफर स्टेशन” या प्रयोजनार्थ आरक्षित करणेचा फेरबदल बाबत सर्व वैधानिक कार्यवाही करुन फेरबदल प्रस्ताव शासनास सादर करणेस मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा. सागर आंगोळकर** - मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.राजेंद्र गावडे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रामणचा ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक- २४५ विषय क्रमांक- ११

दिनांक- २०/७/२०१८ विभाग- मा. आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१५/१८१/२०१८

दि.२५/०६/२०१८

विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.मोरेश्वर शेडगे-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- २४६ विषय क्रमांक- १२

दिनांक - २०/७/२०१८ विभाग- मा. आयुक्त

संदर्भ –१) मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र

क्र.स्वभाअक/३/कावि/२१३/२०१८ दि.०५/०७/२०१८

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतःचे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,८८,९५,०००/- व ९,०७,७५,०००/- असे एकुण र. रु १३,९६,७०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे. प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु.४,०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८,०००/- व मनपा हिस्सा र.रु.४,०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/०६/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिति खालील प्रमाणे

**प्रपत्र “अ”**

| महानगरपालिकेचे नाव | | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | शेरा |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १४०१० | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १३६८१ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ११०१७ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-१०४७३ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण- ६९७१ सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ३५०२ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ४६५ सीटस | महिला–२०३सिटस कामकाज पूर्ण पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ७७४१ लाभार्थी | GOI+GOM=४६४.४६ लाख | GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १५४.८२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **६१९.२८ लाख** | |
| निर्गत करणेत | ६८१७ लाभार्थी | GOI+GOM=४०९.०२लाख | GOI = २०००/-व |

| | | | |
|---|---|---|---|
| आलेला दुसरा हप्ता | | | GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१३६.३४ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५४५.३६ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.तुषार कामठे -** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा. नामदेव ढाके -** मा. महापौर साहेब विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- १३

दिनांक- २०/७/२०१८ विभाग- मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/३६/१७८/२०१८ दि.९/०७/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजनेतील विविध सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित खाजगी जागा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ मधील तरतूदीचा अवलंब करुन महापालिकेच्या ताब्यात घेण्यात येतात. त्यापैकी खाजगी वाटाघाटी हा एक जागा ताब्यात घेण्याचा पर्याय आहे. महाराष्ट्र शासनाचे नोंदणी व मुद्रांक विभागाचे वार्षिक मुल्यदर सूचीमधील दर व सर्वसाधारण मार्गदर्शक सूचनांचे आधारे संपादनाखालील जागेचे मूल्यांकन करण्यात येते.

मा. महापालिका सभा ठराव क्र. ७७४, दिः- २०/११/२०१५ व ठराव क्र. ९१५, दिः- २९/८/२०१६ याव्दारे खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करण्याविषयीचा धोरणात्मक निर्णय आहे. त्यानुसार मिळकतधारकाचे मिळकतीपैकी रस्त्याने / आरक्षणाने बाधित क्षेत्र ३०० चौ.मी. पर्यंत असल्यास रेडीरेकरनुसार होणारे मूल्यांकन अधिक १०० टक्के अतिरिक्त रक्कम, तर रस्त्याने / आरक्षणाने बाधित क्षेत्र ३०० चौ.मी. पेक्षा जास्त असल्यास रेडीरेकनर नुसार होणारे मूल्यांकन अधिक ३० टक्के अतिरिक्त रक्कम मोबदला म्हणून अदा करण्याची प्रचलित पध्दत आहे.

विकास योजनेतील काही आरक्षणे/ रस्ते बाधित खाजगी मिळकती पाटबंधारे विभागामार्फत निश्चित केलेल्या नदी ते निळी पूररेषा यामधील निषिध्द क्षेत्रात आहेत. अशा आरक्षण/ रस्ता बाधित खाजगी मिळकती खाजगी वाटाघाटीने महापालिकेच्या ताब्यात देण्याबाबत प्रस्ताव महापालिकेस प्राप्त होतात. तथापी महाराष्ट्र शासनाचे नोंदणी व मुद्रांक विभागाचे वार्षिक मुल्यदर सूचीत नदी ते निळी पूररेषा (निषिध्द) क्षेत्रातील काही मिळकतींचे खूल्या जमीनीचे दर हे ना विकास विभागाचे मूल्य विभागात नमूद नसून विकसनक्षम (उदा. रहिवास) विभागात नमूद आहे. त्यामुळे नदी ते निळी पूररेषा (निषिध्द) क्षेत्रातील आरक्षण/ रस्ता बाधित मिळकतीवार्षिक मूल्यदर सूचीत विकसनक्षम मूल्य विभागात असल्यास मूल्यांकन करतांना किती दर विचारात घ्यावा याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे.

महाराष्ट्र शासनाचे नोंदणी व मुद्रांक विभागाचे वार्षिक मुल्यदर सूची विषयी असलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील सूचना क्र. २० ह) मध्ये विकास योजनेतील ना विकास/ हरितपट्टा/ शेती विभागातील जमीनीसाठी वार्षिक मूल्य दर तक्त्यात स्वतंत्र मूल्य विभाग/ दर दिले नसल्यास सदर जमीन ज्या मूल्य विभागात समाविष्ट आहे त्या मूल्य विभागाच्या दराच्या ४० % दर व संबंधित जागेचे क्षेत्रासाठी स्थूल जमिनीबाबत असणारी सूचना क्र. १६ अ) येथील कोष्टक वापरुन मूल्यांकन करण्यात यावे असे नमूद आहे. याप्रमाणे नदी ते निळी पूररेषा ( निषिध्द) क्षेत्रातील आरक्षण/ रस्ता बाधित मिळकती वार्षिक मूल्यदर सूचीत विकसनक्षम मूल्य विभागात समाविष्ट असल्यास अशा मिळकतींचे मूल्यांकन त्या मूल्य विभागाच्या दराच्या **४० %** दर विचारात घेऊन मा. महापालिका सभा ठराव क्र. ७७४, दिः-

२०/११/२०१५ व ठराव क्र. ९१५, दिः- २९/८/२०१६ याव्दारे खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करण्याविषयीचे धोरणानुसार करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुरेश भोईर-** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सागर आंगोळकर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.राजेंद्र गावडे -** मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- २४७ विषय क्रमांक- १३

दिनांक- २०/७/२०१८ विभाग- मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/३६/१७८/२०१८ दि.९/०७/२०१८

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.विलास मडिगेरी-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक २४८ विषय क्रमांक १४

दिनांक २०/७/२०१८ विभाग : मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. पअक/३/कावि/२३५/२०१८ दि.९/०७/२०१८

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६७(अ) अन्वये प्रत्येक महानगरपालिकेने लगतपूर्ववर्ती शासकीय वर्षासंबंधिचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल शासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यात येईल,अशा पध्दतीने दरवर्षी ३१ जुलै पूर्वी मा.महापालिका सभेकडे सादर करणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१७-१८ चा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या डी.पी.एस.आय.आर. या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व आवश्यक माहिती संबंधित विविध विभागाकडून संकलित करुन त्यानुसार तयार करण्यात आला आहे. सदर प्रारुप अहवाल मा.महापालिका सभेस सादर करावयाचा आहे.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१७-१८ चा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल मा.महापालिका सभेसमोर ठेवणेत येत आहे.

**मा. बाबासाहेब त्रिभुवन**- मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता--

अनुकूल -८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.उत्तम कैंदळे -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- २४९ विषय क्रमांक- १५

दिनांक- २०/७/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**<u>विधी समिती</u>**

दिनांक ०१/०६/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.संदिप कस्पटे -** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो**.**

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उत्तम कैंदळे -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -२५०　　　　　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक- १६

दिनांक - २०/७/२०१८　　　　　　　　　　　　　　　　　　विभाग- मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिति**

अ) दिनांक १५/०५/२०१८ व ०५/०६/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १९/०६/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.संदिप कस्पटे-** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो**.**

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -८१　　　　　　　　　　　　प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उत्तम केंदळे -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- २५१　　　　　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक- १७

दिनांक- २०/७/२०१८　　　　　　　　　　　　　　　　　　विभाग- मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दिनांक १०/०४/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १०/०५/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.संदिप कस्पटे-** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो**.**

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -८१　　　　　　　　　　　　प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उत्तम केंदळे-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- २५२ | विषय क्रमांक- १८
दिनांक- २०/७/२०१८ | विभाग- मा.नगरसचिव

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

दिनांक २५/०५/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.संदिप कस्पटे-** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो**.**

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करतो.

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/६/कावि/३९०/२०१८
दिनांक - २४/०९/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.